ब्रह्मीभूत

शंकराजी नारायण पंतसचिव

लेखक

कृष्णाजी वासुदेव पुरंदरे, पेठ पुरंदर

पुरंदरे दप्तर भाग १ ते ४,

शिवचरित्र साहित्य खंड १ व ७ या ग्रंथांचे कर्ते.

श. १८७०

किंमत ३ रुपये

ब्रह्मीभूत

शंकराजी नारायण पंतसचिव

लेखक

कृष्णाजी वासुदेव पुरंदरे, पेठ पुरंदर

पुरंदरे दप्तर भाग १ ते ४,

शिवचरित्र साहित्य खंड १ व ७ या ग्रंथांचे कर्ते.

श. १८७०

किंमत ३ रुपये

रु. ३०० चें

शंकराजी नारायण पारितोषिक

या ग्रंथास मिळालें आहे.

त सें च

श्री. **मोरो बळवंत पुरंदरे**, व श्री. सौ. **सरस्वतीबाई पुरंदरे**, यांनीं या ग्रंथास रु. १५५ ची देणगी दिली आहे.

प्रकाशक—
काशिनाथ श्रीकृष्ण गुप्ते
B.A.,LL.B.
६९१ बुधवार पेठ, पुणें.

मुद्रक—
स. रा. सरदेसाई, B.A.,LL.B.
नवीन समर्थ विद्यालयाचा समर्थ भारत
छापखाना, ४१ बुधवार, पुणें २.


श्री.
मोर संस्थानचे संस्थापक
नारायण
यांचे
मोर संस्थानचे अधिपति श्रीमंत
साहेब पंडित पंत सचिव यांनी

वीराग्रणी

शंकराजी नारायण पंतसचिव

मदार-उल-महाम

यांचे पवित्र स्मृतीस सादर अर्पण

निवेदन

आमच्या पूर्वजांनीं शिवशाहींत सतत ३५ वर्षें मोंगल सम्राट औरंगजेब बादशहाशीं लढून विजयश्री खेंचून आणली, त्यांतील एक प्रमुख घटक जो ' शंकराजी नारायण ' यांचें स्फूर्तिदायक चरित्र, श्रीमंत हिज हायनेस राजा बाबासाहेब पंतसाचिव यांच्या प्रेरणेनें व कै. साहित्यसम्राट् तात्यासाहेब केळकर यांच्या अनुज्ञेनें आज इतिहासप्रेमी वाचकांच्या हातीं देण्याचा योग येत आहे. इतस्ततः विखुरलेलीं साधनें वाचून त्यांचें संकलन करणें किती जिकीरिचें असतें याची कल्पना त्या मांडवाखालून जे गेले आहेत त्यांसच येईल. असो.

पुस्तकाची हस्तलिखित प्रत प्रथम कै. तात्यासाहेब केळकर यांनीं वाचली व नंतर ती त्यांनीं श्रीमंतांकडे परीक्षणार्थ पाठविली. श्रीमंतांनीं अत्यंत बारकाईनें व चिकित्सापूर्वक वाचून आपल्या मान्यतेचें शिक्कामोर्तब केलें. याशिवाय परीक्षा कमेटीचे एक सदस्य श्री. बापूसाहेब रानडे यांच्याहि अवलोकनांत ती आली व त्यांनीं ज्या कांहीं सूचना केल्या त्याप्रमाणें जरूर तो फेरफार केला. अशा रीतीनें ' शंकराजी नारायण ' पारितोषिक मंडळास हें चरित्र मान्य झालें व त्यानें नियोजित पारितोषिक (रु. ३००) देऊन मला उत्तेजन दिलें त्याबद्दल मी त्या कमेटीचा अत्यंत आभारी आहें.

आज पंचवीस वर्षें मोठ्या प्रेमानें पाठी थोपटून मजसारख्या सामान्य मराठी शिक्षकाच्या हातून मराठ्यांच्या इतिहासाचें संशोधन व संकलनांचें अत्यंत अवघड काम करवून घेणारे माझे चहाते महामहोपाध्याय प्रा. दत्तो वामन पोतदार यांनीं माझी विनंति मान्य करून प्रस्तावना लिहावी हें त्यांचें कर्तव्यच होय, असें मी समजतों. अशा कर्तव्यनिष्ठ वडीलधाऱ्यांचे आभार मानण्यास मी केवळ असमर्थ होय.

अनेक कामें हातीं असतांहि तीं बाजूला सारून केवळ प्रेमाखातर छपाईचें उत्कृष्ट काम करून दिल्याबद्दल ' श्री समर्थ भारत ' प्रेसचे व्यवस्थापक श्री. दत्तोपंत सरदेसाई यांचे आभार मानावेत तितके थोडेच आहेत.

पुस्तकांत नकाशे, चित्रें, देखावे वगैरे घालून वाचकांची सोय करण्याचें किती जरी मनांत होतें तरी परिस्थितीनें मात करून आम्हास आमची कृति " लंकेची पार्वती " स्वरूपांत वाचकाच्या हातीं द्यावी लागत आहे याचें फार वाईट वाटतें; परंतु उपाय काय ?

माझे एक चहाते श्री. ब. मो. पुरंदरे पर्वतीकर पुढें येऊन पुस्तकाचा आर्थिक बोजा असल्या कठूकाळ दिवसांत शिरावर न घेतें तर आम्हांस इतिहासप्रेमी वाचकांची सेवा खास करितां आली नसती. तसेंच पुस्तकास उदार देणगी देणारे श्री. ब. मो. पुरंदरे यांचे तीर्थरूप, श्री. मामासाहेब व मातुःश्री सौ. वहिनीसाहेब पुरंदरे यांचा मी अत्यंत आभारी आहें.

तसेंच या पुस्तकाचे प्रकाशक श्री. का. श्री. गुप्ते वकील यांनीं मज-वरील प्रेमाखातर स्वार्थत्यागपूर्वक पुस्तकाचें महत्त्व लक्षांत घेऊन जो हात-भार लाविला त्याबद्दलहि मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

शेवटीं ज्या दयाघन प्रभूच्या कृपेनें मी या खडतर दिव्यांतून पार पडूं शकलों त्याला सप्रेम साष्टांग नमस्कार घालून तूर्त लेखणीस रजा देतों.

पुणें
मि॥. वैशाख शु. १३
श. १८७०

आपला
कृष्णाजी वासुदेव पुरंदरे, पेठकर.

———

शंकराजी नारायण

(१) महाराष्ट्राच्या इतिहासाचीं साधनें पुष्कळ प्रसिद्ध झालीं आहेत. तथापि अद्यापि अप्रसिद्ध असें साहित्य पुष्कळच आहे. तें शोधून प्रसिद्ध झालें पाहिजे.

(२) हीं साधनें केवळ मराठी भाषेंतच आहेत असें नाहीं. इंग्रजी, फ्रेंच, फारसी, संस्कृत, कानडी, राजस्थानी वगैरे अनेक भाषांत विखुरलेलीं आहेत. हीं अन्य भाषांतील साधनेंहि विपुल आहेत· आणि तींहि पुष्कळ प्रसिद्ध झालीं असलीं तरी अद्यापि अप्रसिद्ध साहित्य कांहीं कमी नाहीं.

(३) या प्रसिद्ध साधनांचा कसून बारकाईनें अभ्यास करणारांची संख्या अगदीं अल्प आहे. असा अभ्यास केल्याशिवाय साधनांचा खरेखोटे-पणा पारखतां येत नाहीं. कारण साधनें प्रसिद्ध करणारे सर्वच जण असावे तितके जाणिक असतातच असें नाहीं.

(४) साधनांचा खरेखोटेपणा पारखण्याची पात्रता ही एक साधना झाली. परंतु पारखलेल्या साधनांची जुळणी करून त्यांचा अर्थ लावणें आणि प्रसंगरचना करणें ही निराळी साधना आहे. या दोन साधनांनींहि आपलें कार्य पुरें होत नाहीं. फुटकळ प्रसंगांनीं मिळून होणारें समाजाच्या विविध हालचालींचें संकलित वृत्त समजावून सांगणें ही त्यापुढील साधना आहे. या साधनेंत उत्तम यश येण्यासाठीं जागतिक व्यापारांचा सखोल अभ्यास करावा लागतो आणि सामाजिक हालचालींचीं पाळेंमुळें शोधावीं लागतात. ही तत्त्वज्ञानाची अवघड साधना आहे.

(५) या सर्व पुढल्यापुढल्या साधनांचे साधक आपल्या समाजांत अगदींच विरळ आहेत. आणि शिवाय मूळ पारखलेलें साहित्यच अद्यापि अपूर्ण आहे. त्या साहित्याच्या कच्च्या भांडवलावर तर बाकीचा पुढला व्यापार.

(६) 'शंकराजी नारायण' या ग्रंथाचे लेखक श्री. कृष्णाजीपंत पुरंदरे यांचा साधनसाधनेचा व्यासंग निदान पंचवीस वर्षांचा आहे. ते त्या साधनेचे उज्ज्वल तपस्वी आहेत. प्रसंग रंगविण्याचें सामर्थ्यहि त्यांच्या मराठी लेखणींत भरपूर आहे.

(७) पण त्यांनीं हातीं घेतलेला विषय जडणीघडणीला अवघड आहे. ज्या काळांत शंकराजी नारायणांचें कर्तृत्व गाजलें तो काळ आमच्या मराठ्यांच्या इतिहासांतलें एक अद्‌भुत आणि अलौकिक पर्व आहे. पहा कीं, सर्व सामर्थ्यशाली, जातीनें जागरूक आणि कडवा असा औरंगजेब पातशहा आपलें सर्व बळ एकवटून दृढनिश्चयानें मराठीशाही नेस्तनाबूद करण्याच्या ईर्ष्येनें जो एकदां दक्षिणेवर चढाई करून आला तों त्यानें दिल्लीचें तोंड कांहीं पुनः पाहिलें नाहीं. सतत पंचवीस वर्षें ना वारा, ना ऊन, ना पाऊस, कशाचीहि तमा न धरतां, हा साठी उलटलेला म्हातारा, आज येथें तर उद्यां तेथें अशी छावणीची धांवपळ चालवीत मरेपर्यंत मोहीमशीर राहिला! असें चिकाटीचें उदाहरण जगाच्या इतिहासांत शोधूनहि सांपडणार नाहीं! साठी उलटल्यावर जो आला तो उभ्याचा आडवा होऊन पाठ जमिनीला टेकण्यापर्यंत पाळी आली, वयानें नव्वद गांठले तरी कांहीं आपल्या अंगीकृत उद्दिष्टापासून आणि उद्योगापासून बिलकूल ढळला नाहीं! अखेर येथें आमच्या दक्षिणेंतच मातींत मिळाला! आणि अशा कडव्या आणि चिवट पातशाहाशीं आमच्या बहाद्दर मराठ्यांनीं हिंमतीनें टक्कर दिली आणि जाग्यावरून गेलेलें तख्त परत जाग्यावर उभें केलें! औरंगशहानें सगळा महाराष्ट्र बेचिराख केला. पण आमची हरळीची मुळी कांहीं हटली नाहीं! औरंगशहा जेरीला येऊन बोलला कीं येथें गवताच्या टोंकाला भाले फुटतात कीं काय कोण जाणे! देवांनीं स्वर्गांत तोंडांत बोटें घालावीं असा 'गनिमी कावा' आमच्या संताजी–धनाजींनीं जगाला दाखविला! केवळ अद्‌भुत! केवळ अलौकिक!! मराठ्यांच्या या तडफेला, चिकाटीला, दौडीला आणि तलवारभाल्याला तोड नाहीं! खालीं तंजावर तर वर नर्मदेच्या पलीकडे भदावर असा बिजलीचा नाच त्यांनीं उभा

केला ! असा हा विस्मय आणि चमत्कार यांनीं भरलेला आमच्या इतिहासांतला काळ आहे ! !

(८) आणि या काळांतले एक अग्रणी म्हणजे आमचे 'शंकराजी नारायण' ! धनाजी जाधव किंवा संताजी घोरपडे अशांसारख्या त्या काळच्या वीरांचीं प्रत्येकाचीं भारतें व्हावीं असे पराक्रम आणि असा रोमांचकारी इतिहास ! मात्र या भारतांतली फारच थोडी श्लोकसंख्या आमच्या हातीं लागलेली आहे ! भारत खरें, झालें हेंहि खरेंच ! पण त्यांतल्या कथा आणि आडकथा क्वचित्च हातीं आलेल्या ! अशी स्थिति आहे. एखाद्या उध्वस्त प्राचीन नगरीचे कांहीं तुरळक पण प्रचंड अवशेष विखुरलेले सांपडावे, कोठें उंच भिंत, कोठें भव्य दरवाजा, कोठें थोराड बुरुज, तर कोठें एखादा रुंदाड खांब, अथवा एखादें फुटकें लिंग किंवा तुटकी मूर्ति असा परवरडा आढळावा तसाच कांहीं प्रकार येथें अनुभवास येतो ! वैभवाची कल्पना येते व खात्री पटते. परंतु सुसूत्र सायसंगीन डोळ्यांसमोर उभी राहात नाहीं ! ! अशी अडचण येऊन पडते.

(९) सचिव घराणें केवढें थोर ! श्रीशिवछत्रपतींच्या अष्टप्रधान-मंडळांतलें ! परंतु प्रस्तुतचे सचिव यांचे मूळ पुरुष आणि त्यांच्या-पासूनची सुसूत्र विश्वसनीय आणि संगतवार कथा कोठें आपणांस उपलब्ध आहे ? इंग्रजी अंमलाच्या सुरुवातीला इंग्रजांनीं सर्व प्रकारच्या चौकशीला मोठ्या ईर्ष्येनें प्रारंभ केला ! तमाम जहागीरदार, संस्थानिक आणि घराण-दार यांच्या कैफियती मागविल्या. तेव्हां कोठें आमच्या मंडळींत धांवपळ सुरू झाली आणि मग कांहीं चार जुने कागदपत्र पाहून पदरचे म्हातारे माहीतगार यांच्याकडून धांदलीनें जुळवून घेतलेल्या कैफियती सरकारांत दाखल झाल्या ! पुढें याच घराण्यांतून इतिहासंशोधकांनीं बळदांतून, माळ्या आणि गळाठ्यांतून अनेक कागदपत्रें हुडकून काढून जेव्हां प्रसिद्ध केलीं तेव्हां या त्रुटित कैफियती आणि गोंधळकथा यांच्यांतले घोटाळे, चुका आणि अपुरेपणा स्वच्छपणें ध्यानांत येऊं लागला !

(१०) आपापल्या वंशावळी तरी कोठें सर्वांनींचें जपून पक्क्या आणि तयार ठेविल्या आहेत ? सुदैवानें कोणी कोणी साक्षेपी गृहस्थांनीं वंशावळी आणि कुळकटें अजूनहि जपून ठेवलेलीं आढळतात आणि संप्रत 'घराण्यांचे इतिहास' तयार करून प्रसिद्ध करण्याच्या उद्योगास जी चालना मिळाली आहे त्यामुळें या वंशावळींचा उद्धार होऊं लागला आहे. परंतु यांत वतनहक्क प्रकरणींचे हितसंबंध आड येत असल्यामुळें झांकापाक आणि गडबड कांहीं कमी दिसून येत नाहीं. तेव्हां मग नासिक-त्र्यंबकेश्वराच्या उपाध्यायांकडील बहुमोल नोंदींचा शोध घेऊन या उणीवा दूर करण्याचे प्रयत्न होत आहेत.

(११) 'सचिव' घराण्याच्या कैफियती इ. स. १८२७ व इ. स. १८२९ त दाखल झालेल्या प्रसिद्ध झाल्या आहेत. तीर्थोपाध्यायांकडील लेख झाडून सारे अस्सल कांहीं आणवून प्रसिद्ध झालेले नाहींत. वरील कैफियतींत प्रस्तुतच्या सचिवांचा मूळ पुरुष कोनेर विठ्ठल हा सांगितला असून तो इ. स. १६८८ त छत्रपति राजारामाकडे चंदावरास सुरनिशीवर होता असें म्हटलें आहे. पण याच कैफियती एकदम असेंहि बोलतात कीं, कोनेरेचा मुकुंद, मुकुंदाचा नारोपंत आणि नारोपंताचा शंकराजी नारायण ! म्हणजे झाल्या तीन किंवा चार पिढ्या ! आणि हा चौथ्या पिढीचा शंकराजी नारायण प्रत्यक्ष कागदोपत्रांतून राजाराम जिंजीस गेला त्या घालमेलीच्या वेळेपासून एक कर्ता पुरुष म्हणून नांदूं लागल्याचें अगदीं स्पष्ट शाबीत होतें. ही वेळ म्हटली म्हणजे शके १६१२ किंवा इ. स. १६९० ! इ. स. १६८८ त कैफियतकार म्हणतो तसा जर कोनेर विठ्ठल चंदावरास अखत्यारावर धरला तर त्याचा चौथ्या पिढीचा शंकराजी नारायण अवघ्या दोन वर्षांत कर्त्या पुरुषांत कसा बसलेला दिसेल ? अर्थात् अस्सल कागदपत्रांतून शंकराजी नारायण झळकूं लागला तें साल तर अप्रमाण धरतां येत नाहीं. आणि या प्रमाणांची सांगड घालून शंकराजीचा पणजा कोनेर विठ्ठल याचा काळ निदान पन्नास वर्षें तरी मागें रेटलाच पाहिजे. तेंच श्री. कृष्णाजीपंतांना आपल्या कल्पनेनें करून कोनेरपंताला शहाजीच्या पदरीं बांधिला आहे. पण याला अस्सल कागदपत्रांचें प्रमाण कांहीं नाहीं !!

(१२) श्री. कृष्णाजीपंतांना एवढीच अडचण नव्हती. सुरनिशीचें पद, वतनें, देशमुख-देशपांडे यांचे अधिकार इत्यादि सर्व खोलांत जावें लागलें आहे. अस्सल साधनें जीं संशोधकांस उपलब्ध झालीं आहेत त्यांत वतनी-इनामी हिशेबी कागदपत्रांचाच भरणा फार! त्यांतले बारीक-सारीक तपशिलांचे धागे हातीं धरून त्या वेळच्या राज्यपद्धतीचा पट विणून तयार करावयाचा प्रसंग पडतो! या पटांत जागजागीं छिद्रें फार! पण या जुन्या कागदपत्रांच्या रानांतून हिंडतां फिरतां ज्या वाटा पाऊलवाटा अधूनमधून उमगतात त्यांचा मागोवा घेतघेत सर्व रस्ता साफ करण्याचा प्रयत्न करणें भाग पडतें! तें काम करण्याची पात्रता आणि त्यांतलें वाटाडेपण यांजवर कृष्णाजीपंतांना अधिकार सांगतां येतो यांत संदेह नाहीं. पण म्हणून त्यांनीं करून दाखविलेली मांडणी पक्की झाली असें मात्र इतक्यांतच म्हणतां यावयाचें नाहीं.

(१३) शंकराजी नारायण यांच्या पराक्रमाच्या संबंधाचेहि प्रमाणभूत उल्लेख जेवढे उपलब्ध झाले आहेत तेवढे सर्व एकत्र करून त्या आधारानें शंकराजीचें चरित्र श्री. पुरंदरे यांनीं या पुस्तकांत तयार करून मांडलें आहे. अर्थात्च सफाईदार विणकरीचें काम करण्याची सोयच या कामीं उपलब्ध नाहीं. याला श्री. पुरंदरे यांचा उपाय काय?

(१४) शंकराजी थोर पुरुष यांत तर शंकाच नाहीं! त्यांचा समकालीन केशव पंडित यांचा ग्रंथ 'राजारामचरितम्' हा श्री. बेंद्रे यांनीं शोधून प्रसिद्ध केला. केशव पंडितांचें घराणें व त्याचे कागदपत्रहि हातीं आले तेव्हां त्याची योग्यता ध्यानीं आली. त्यानें वरील चरित्रांत '**शंकरं लोकशंकरम्**' अशी शंकराजीची प्रशंसा केली आहे. शंकराजीला 'मदारुल महाम' म्हणजे 'दौलतीचा खांब, आधार' असे हुद्दे मिळाले, तेव्हां त्याच्या मोठेपणाची साक्ष भरण्याला आणखी प्रमाणें कशाला पाहिजेत?

(१४) अशा या थोर पुरुषाचें साधार चरित्र जेवढें जुळवितां आलें तेवढें श्री. कृष्णाजीपंत पुरंदरे यानीं आधार नोंदून आपल्यापुढें या छोट्या

पुस्तकांत मांडलें आहे. जुळणीकारितां जीं मतें आणि कल्पना त्यांनीं भरीला घातलीं तीं कृष्णाजीपंतांची भर आहे. आणि ती कोणीहि लेखक आपली आपणच पुरविणार ! आणि त्याच्या मातब्बरीवरच ती टिकणार किंवा तगणार !

(१५) अलीकडे भोरचे अधिपति श्री. राजे रघुनाथराव शंकरराव पंडित पंतसचिव यांनीं आपले पराक्रमी पूर्वज शंकराजी नारायण यांची पुण्यतिथि सालोसाल साजरी करण्याचा उपक्रम सुरू केला. या उपक्रमाचें एक अंग म्हणून श्री. राजे बाबासाहेब सचिव यांनीं ग्रंथोत्तेजनाचा पायंडा पाडला ! श्री. वेंद्रे यांच्या 'राजाराम चरितम्' या केशव पंडितकृत ग्रंथाच्या प्रकाशनाला या उपक्रमांतून साहाय्य झालें. पुढें इतर अनेक ग्रंथांना प्रतिवर्षी यथाशक्ति साहाय्य होत गेलें. त्यांतच श्री. शंकराजी नारायण यांचें साधार चरित्र तयार करवून घेण्याची कल्पना निघून त्या कामावर श्री. कृष्णाजीपंत पुरंदरे यांची योजना झाली. श्री. पुरंदरे यांनीं अंगीकारलेलें अवघड काम वर आविष्कृत केलेल्या परिस्थितींत आपल्याकडून कसोशीनें पार पाडलें आहे. त्यापासून अभ्यासी जनांस मोठा लाभ होईल यांत आम्हांला मुळींच शंका नाहीं. श्री. कृष्णाजीपंतांच्या दीर्घ व्यासंगाचीं फळें यापुढेंहि अधिकाधिक प्रमाणांत आम्हांस मिळावीं आणि श्री. राजे बाबासाहेबांकडून आणि त्यांच्या श्रेणींतल्या गुणग्राहक थोरांकडून अशा प्रयत्नाचें ऊर्जित होत राहावें, हें उचित होय.

वैशाख शुद्ध १२, १८७०
२०-५-४८
'लोककल्याण' पुणें

दत्तो वामन पोतदार

———

अपरिचित शब्दांचे अर्थ

अर्जानी—प्राप्त
झाडा—एक हिशेबी कागद
दरक—हुद्दा
सडा—डोंगरावरील सपाटी
पोटतिडीक—कळकळ
वैराण—बिनवस्तीचा
कूळकट—कुळाची माहिती देणारा कागद
अडसेरी—चरितार्थाला मिळणारें धान्य
नफर—मनुष्य
दाईते—हक्क
इस्ताव्याचा कौल—क्रमाक्रमानें वाढवीत कांहीं वर्षांनीं नियोजित कर घेण्याचें अभयपत्र.
मोईन—नेमणूक
हक्क लाजिमे—कायदेशीर हक्क
कूल—सर्व
दायाद—भाऊबंद
पायंडा—रिवाज, चाल
डोहाणा—गडबड, गोंधळ
शाई—शाही
गोमटें—चांगलें
दिवाणकारभार—सरकारी कामकाज
भांडें—तोफ
परीघ—वेढा
इतलाख—स्वतंत्र, निराळा
ताम्र—मोंगल

शुद्धिपत्र

अशुद्ध	शुद्ध	पृष्ट	ओळ
हाता खाली.	याच्या हाताखाली	२१	२१
लवाटे	लपाटे	११	१४
आपण	आतां आपण	१६	१४
राजयंत्राशी	राज्ययंत्राशी	१७	८
उपभोग	उपयोग	२०	३
वग	वर्ग	२७	५
वाढला	वाढीला	३८	१३
चालकानी	वाचकानी	४३	१०
कर्ता	कर्ती	४८	३
मुजरा	मजुरा	५३	१०
न्यायाधिशी	न्यायाधीश	५४	११
कारकुनास	सर कारकुनास	५६	२२
सचियपद	सचिवपद	५९	२
सुरनिस्य	सुरनिस	,,	६
बह	तह	६०	१३
चालला	चालत	६१	९
ह्या	यांच्या	६२	६
मनभेद	मतभेद	७३	१९
सा	सात	७६	१
सादतखान	दाऊदखान	८०	२२
बाहशहाची	बादशहाची	१००	४
उटण्यास	उडण्यास	११६	१०
गौरवपूर्ण	गौरवपूर्वक	१३२	८

अनुक्रमणिका

परिशिष्ट

प्रास्ताविक

आर्यावर्तावर यावनी आक्रमण सुरू होऊन त्यांनीं तो समग्र ग्रासला आणि इतउत्तर आर्यसंस्कृति व सनातन धर्म नाममात्रहि टिकण्याची आशा राहिली नव्हती. अशा भीषण प्रसंगीं केवळ मराठ्यांनींच मुसलमानांना शह देऊन, त्यांच्या स्वैरसंचारास प्रतिबंध करून ' धर्मस्थापनेचे नर, ते ईश्वराचे अवतार ' हा बहुमान संपादिला. छत्रपति शिवाजीमहाराजांचें स्वराज्य हें, चारपांचशें वर्षें चालू राहिलेल्या हिंदु-मुसलमानांच्या झगड्याला मूठमाती देऊन हिंदूंनीं आपल्याच देशांत मानानें नांदण्याची अशक्य सनद शक्य करून दाखविणारी अपूर्व करामत ठरली, यांत शंका नाहीं. मुसलमानांशीं अटीतटीचे सामने देऊन महाराष्ट्रानें स्वराज्य मिळविलें, तें टिकवून दाखविलें, इतकेंच नव्हे, तर त्याचें साम्राज्यांत रूपांतर केलें. मुसलमान पेंचांत आले, त्याचा फायदा घेऊन मराठे पुढें सरकले नसून, त्यांनीं त्यांना पेंचांत आणून नामोहरम केलें. दक्षिणेंतील विजापूरच्या आदिलशाहीचें पोट फोडून शिवाजीच्या शिवशाहीचा जन्म झाला असला, तरी तिला निर्णायक सामना दिल्लीचा महान्,पराक्रमी, अतुल सामर्थ्यवान् व मातबर मुत्सद्दी मोंगल बादशहा औरंगजेब ह्याच्याशींच द्यावा लागला. हा सामना वर्षा दोन वर्षांचा नसून तब्बल सदतीस वर्षें चालला होता. त्यांत शेवटीं औरंगजेबाची सदैव यशस्वी असलेली तलवार मराठ्यांनीं बोथट करून तिला म्यान करण्यास भाग पाडिलें. या मोंगल-मराठ्यांच्या झगडयांत अनेक वीर व मुत्सद्दी चमकून इतिहासांतील ध्रुवपदावर आरूढ झाले; त्यांतच आमचे चरित्रनायक नरवीर

शंकराजी नारायण पंतसचिव यांची गणना होते. हा श्रीशिव-रायाचा पट्टशिष्य स्वामींच्या आधारानें व आपल्या अंगच्या कर्तृत्वानें कसकसा वर्धमान होत गेला आणि माध्यान्हींच्या सूर्याची उपमा पावला, तो गोड व स्फूर्तिदायक इतिहास, संशोधनशास्त्राच्या कसोटीला उतरला जाईल असा, यथामति सांगण्याची, त्यांच्याच पुण्यतिथीच्या पुण्यदिनीं, इतिहासाची अनुज्ञा घेऊन प्रयत्न करीत आहें. याला श्रीरामचंद्रजीची कृपा व साहाय्य लाभो, अशी श्रीचरणीं प्रार्थना आहे.

नरपुंगव ब्र. भू. श्री शंकराजी नारायण यांचें चरित्र लिहिण्याची स्फूर्ति मला त्यांचेच वंशज म्हणजे भोरच्या गादीवर असलेले विद्यमान अधिपती हिज हायनेस राजे श्रीमंत सर बाबासाहेब पंतसचिव यांच्याच प्रेरणेमुळें झाली, हें नमूद करणें मी माझें कर्तव्य समजतों. राजे श्रीमंत बाबासाहेब यांच्या अंगीं आपल्या पूर्वजांविषयीं वसत असलेला नितांत आदर व प्रेम, तसेंच त्यांचा निरनिराळ्या विषयां-वरील अखंड विद्याव्यासंग, इतिहास व तत्त्वज्ञान यासंबंधीची विशेष अभिरुचि, त्याचप्रमाणें प्रखर कर्तव्यनिष्ठा व इतर तत्सम गुणसमुच्चयामुळेंच हें काम त्यांनीं मजकडे सोंपविलें.

कुलवृत्तान्त

छत्रपति शिवराय यांचे वडील शहाजीराजे भोंसले यांनीं आपल्या पदरीं अत्यंत विश्वासू व कर्ती माणसें बाळगलीं होतीं. हीं सर्व त्यांच्या घराण्याशीं पिढ्यान्‌पिढ्याचे संबंध असणाऱ्या वतनदार

घराण्यांतील असून तीं कसोटीच्या दिव्यांतून पार पडलेलीं असल्यानें त्यांत स्वामिद्रोहादि घाण दृष्टीस पडण्याचा संभव नव्हता. ही पारखलेली प्रभावळ शहाजीराजांना महत्पद गांठण्याला जशी मदत करणारी झाली, तशीच ती शिवरायाच्या स्वराज्यस्थापनेच्या उद्योगाला हातभार लावणारी झाली. पिंगळे, मेंडजोगी, हणमंते, मलठणकर, राजोपाध्ये, पुंडे, बहुतकर हीं घराणीं भोंसले घराण्याशीं निगडित झालीं होतीं. पुणें प्रांतांत भोंसल्यांची जशी वतनदारी होती, तशीच ती वेरूळ-देवगिरीकडेहि होती. त्यामुळें शहाजीराजांच्या पदरच्या कांहीं घराण्यांचें मूळ तिकडेहि आढळतें. अशांपैकींच शंकराजी नारायण हे ज्या गांडेकर घराण्यांत जन्माला आले, तें घराणेंहि वेरूळकडील गांडापूरचें—हल्लींच्या गंगापूरचे—वतनदार कुलकर्णी होत. हा गांव कायगांव-टोक्यापासून चारपांच कोसांवर आहे. ह्या घराण्याची माहिती देण्याचा प्रयत्न, वाडांनीं प्रसिद्ध केलेल्या पेशवे-दप्तरांतील ' कैफियति व यादी, ' भारतवर्ष मासिकांत प्रसिद्ध झालेली अमात्य बावडेकरांची कैफियत, विष्णु गोपाळ भिडे चिटणीस—निसबत पंत सचिव, यांनीं शके १७८८ (इ. स. १८६६) त लिहिलेला सातारचे श्रीमंत छत्रपति शिवाजीमहाराज यांचे वंशाचा व प्रतिनिधी व अष्टप्रधान यांचा इतिहास, भा. इ. सं. मंडळाचें त्रैमासिक व. १८ अं. २ पृ. २४ वर सचिवांचे नासिकचे क्षेत्रोपाध्ये अनंत भट भडकमकर यांच्या वहींतील शक १६४९ मधील नोंद, या सर्वांचा चिकित्सापूर्वक समन्वय करून या घराण्याच्या कुलवृत्तांताचा पुढील आराखडा तयार केला आहे.

हें घराणें मूळ वेरूळ भागांतील गांडापूरचें वतनदार कुलकर्णी असल्यानें, हें इकडे पुणें प्रांतीं आल्यावर ' गांडेकर ' या नांवानें ओळखलें जाऊं लागलें. ' गांडेकर ' हा ' गांडापूरकरचा ' तोकडा उच्चार होय. गांडेकर हे अत्री गोत्री व आश्वलायन सूत्री देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होत. या घराण्यांतील कोन्हेर विठ्ठल हा शहाजीराजे यांच्या पदरीं होता. न जाणों कोन्हेरपंतापूर्वींहि हें घराणें भोंसल्यांच्या पदरीं असेल; परंतु या बाबतींत तूर्त तरी आपणापुढें पुरावा नाहीं. दिल्लीच्या मोंगलांनीं निजामशाही बुडविल्यानंतर कांहीं काळ शहाजीराजे मोंगलांच्या पदरीं होते. परंतु, त्यांना तेथील वातावरण विशेष न मानवल्यामुळें, त्यांनीं विजापूरच्या आदिलशाहींत प्रवेश केला. विजापूरकरांनीं मोठी मनसब देऊन निजामशाहींत त्यांचा जो मोकासा-जहागीर तैनात होता, तोच चालू ठेविला. निजामशाहींतून पुणें प्रांत, मावळ सुभ्यांतील बारा महाल हे त्या जहागिरीकडे चालत होते, तेच आतां त्यांजकडे चालू झाले. अर्थात् नव्या नौकरींत, 'अर्जानीं झालेल्या मोकाशांत' त्यांना बस्तान बसविण्यास मुळींच अडचण पडली नाहीं. तो त्यांनीं दादाजी कोंडदेव मलठणकर या विश्वासू कारभाऱ्याच्या स्वाधीन केला. राजधानीपासून बऱ्याच दूर असलेल्या कर्नाटकांतील प्रदेशावर विजापूरकरांची सत्ता बसेना व तिकडे विस्तार करितां येईना. तिकडील राजे व पुंड पाळेगार विशेष दडपणावांचून नमण्यासारखे नव्हते. तेव्हां दरबारनें, ज्यानें कांहीं काळ प्रत्यक्ष निजामशाहीचीं सूत्रें हालविलीं होतीं—नव्हे, बाल बादशहाला मांडीवर घेऊन गादीलाहि स्पर्श केला होता—अशा शहाजीराजांस ' महाराज ' असा किताब दिला व तिकडे मोठी जहागिरी देऊन कर्नाटकचे

बंदोबस्तास पाठविलें. त्यांनीं आपल्याबरोबर आपलें कुटुंब नेलें व पदरच्या कर्त्या पुरुषांनिशीं नूतन कार्यक्षेत्रांत पदार्पण केलें.

त्यांच्याबरोबर जीं कर्तीं माणसें गेलीं, त्यांतच कोन्हेर विठ्ठल गांडेकर होते शहाजी राजांनीं बेंगलुरास ठाणें घातलें. शके १७४९ सालीं सचिव घराण्याची जी कैफियत सचिवांच्या आईनें कंपनी सरकारांत गुदरली तींत, "मूळ पुरुष कोनेर विठ्ठल चंदावरास होते त्यांस तेथील 'सुरनिशी' प्राप्त जाहली" असें म्हटलें आहे. याचा अर्थ कोन्हेरपंत बंगलोरास शहाजीचा 'सुरनीस' म्हणजे दफ्तरावरील मुख्य अधिकारी होता, असें दिसतें. म्हणजे हें घराणें प्रथमपासूनच भोंसल्यांचें सुरनीस—सचिव होतें, असें ठरतें. सुप्रसिद्ध रामचंद्रपंत अमात्यांचे वडील 'अमात्य' असल्यानें, त्यांनीं, 'प्रतिनिधी' पद 'अमात्य' पदापेक्षां श्रेष्ठ असतांहि त्याकडे ढुंकूनहि न पाहतां, परंपरागतच्या 'अमात्य' पदाकरितां पराकाष्ठा करून तें प्राप्त करून घेतलें व थेटपर्यंत त्यालाच ते बिलगून राहिले. नाहीं तर, प्रल्हाद निराजीच्या पश्चात् रामचंद्रपंतांना प्रतिनिधीपदावर अधिष्ठित होण्यास कसलीच अडचण नव्हती. हाच पदाभिमान शंकराजी नारायणानें 'सचिवी' मिळवितांना दाखविला असला पाहिजे आणि म्हणूनच, आम्ही तरी कोन्हेर विठ्ठल शहाजीराजांचें 'सुरनीस–सचिव' होते, याबद्दल साशंक नाहीं. एवंच शंकराजी नारायणाच्या पूर्वींपासून या घराण्याकडे भोंसल्यांचें 'सचिव' पद होतें; म्हणूनच तो त्यांचा जन्मसिद्ध हक्क ठरतो, यांत शंका नाहीं.

दादोजी कोंडदेव शके १५६३ (इ. १६४१) सालीं बेंगलुरास जहागिरीचा 'झाडा' देण्यास गेले असतां, त्यांचेबरोबर

शहाजीराजे यांनीं बारा वर्षांचा शिवाजी, त्याची मातोश्री सौ. जिजाबाई व तिकडील कारभारास उपयोगी पडणारीं कर्तीं माणसें पुणें प्रांतीं पाठविलीं. शिवाजीला स्वतंत्र संस्कृत ' मुद्रा ' करून दिली आणि त्याचें मंत्रीमंडळ करून दिलें. त्यांतच कोन्हेर विठ्ठल गांडेकराचा वंशज नारो मुकुंद हाहि आला.

नारोपंत शिवरायाबरोबर पुणें प्रांतीं आल्यावर तिकडे कर्नाटकांत मुकुंदपंताचा काळ झाला. पुढें ती असामी त्यांच्याच घरांत चालली. नारोपंत प्रथम शिवाजीच्या लष्करांत लहानसे कारकून होते. पुढें शके १५७० (इ. स. १६४८) शिवाजीराजांनीं सुधागड किल्ला हस्तगत करून घेतल्यावर त्यांनीं तेथील सबनिशी नारोपंतास दिली आणि त्यांची महत्त्वाच्या व जबाबदारीच्या जागीं स्थापना केली. किल्ले हे शिवरायाचे केवळ कलिजे होत. त्यामुळें ही नेमणूक राजांनीं कर्तृत्व व पराकाष्ठेची इमानदारी त्यांच्या कसोटीला घासून शंभर नंबरी कस लागल्यानंतरच केली असली पाहिजे. येथें सबनिशीच्या दरकाची स्पष्टता करणें जरूर आहे. शिवशाहींत प्रत्येक किल्ल्यावर हवालदार, सबनीस व कारखानीस अशा तीन जबाबदारीच्या नेमणुका असत. त्या बहुधा अनुक्रमें मराठा, ब्राह्मण व प्रभु या लष्करी पेशांतील प्रमुख समाजांतून पारखूनच निवडल्या जात. सबनीसाला किल्ल्याचा सर्व हिशेब ठेवणें व युद्धोपयोगी सामानावर देखरेख ठेवणें, हीं कामें करावयाचीं असत. हवालदाराला शिक्कामोर्तब असे, तसें तें सबनीसाला दिसत नाहीं. गडावरून सुटलेल्या पत्रांत ' हवालदार व कारकून ' असा जो उल्लेख येतो, त्यांतील ' कारकून ' म्हणजे सबनीसच होय.

शंकराजी नारायणाचें राज्यकारभारांत पदार्पण—

शके १५९९ (इ. स. १६७७) च्या सुमारास नारोपंत गडाचा हिशेब समजावून देण्याकरितां हुजूर आले होते. त्या-बरोबर त्यांचा तरुण पुत्र शंकराजीहि होता. या वेळीं शिवरायाचा मुक्काम प्रतापगडावर मंत्रीमंडळासमवेत होता. शंकराजीसारखें चुण-चुणीत पोर पाहून त्याजकडे मोरोपंत पिंगळे ह्यांचें लक्ष वेधून त्यांनीं त्यास आपल्या हाताखालीं नोकरींत घेतलें. नोकरी लागल्या-नंतर त्यांचें लग्न झालें असें ज्याअर्थीं म्हटलें जात आहे, त्याअर्थीं ते या वेळीं दहाबारा वर्षांचेच असावेत. तत्कालीन मुलांच्या लग्नाचा व उद्योगाचा काळ लक्षांत घेतां, आमचा अंदाज बरोबरच ठरेल. मुलाची मुंज आठव्या वर्षी करून दोनतीन वर्षांत त्याचें लग्न करावयाचें असा तत्कालीन रिवाज होता. तसेंच, जुन्या काळीं व्यवसाय करितां करितां जरूर तें शिक्षण मुलास द्यावयाचें अशी सर्व्हीस चाल होती. कारकुनी पेशास उपयोगी पडणारें लेखन-वाचन वयाचे अकरा-बारावे वर्षीं पुरें करून नोकरींत शिरल्याचीं कित्येक उदाहरणें इतिहासांत पहावयास सांपडतात. तोच काळ लष्करी नोकरीचा.

शंकराजींचें पहिलें लग्न मौजे मांगदरी येथें राहणारे शामभट महाशब्दे यांच्या कन्येशीं झालें. हीच शंकराजी नारायणाची सु-प्रसिद्ध कर्तबगार स्त्री येसूबाई होय. भा. इ. सं. मं.च्या व. १८, अंक २, पृ. २४ वरील नोंदीवरून ह्यांना भिउबाई नांवाची दुसरीहि स्त्री होती असें दिसतें. ह्या नोंदींतील शंकास्थानें पुढें विचारांत घ्यावयाचीं आहेतच.

रामचंद्र नीलकंठ यांजकडे—

शिवरायांच्या पश्चात् संभाजीमहाराज छत्रपति झाले. यांची नऊ वर्षांची कारकीर्द अत्यंत धामधुमीची आणि मराठ्यांची मुत्सद्देगिरी व शौर्य ह्यांची परीक्षा पहाणारी झाली. येथें ते कधीं हरले, तर कधीं यशस्वी झाले. येवढें मात्र खरें कीं, या संकटकाळांत अनेक कर्तीं माणसें चमकून गेलीं. त्यांतील वरच्या श्रेणींतील मानकरी रामचंद्र निळकंठ होते, यांत शंका नाहीं. स्वत: रामचंद्रपंत कर्ते होतेच, पण त्यापेक्षां त्यांनीं आपल्याभोंवतीं कर्त्या शिष्यशाखेचें वलय निर्माण केलें, त्याला मराठ्यांच्या इतिहासांत तोड नाहीं.

मोरोपंत पेशव्यांच्या मृत्यूनंतर शंकराजी नारायण हा रामचंद्रपंतांकडे गेला असावा. तेथें त्याचें कर्तृत्व राबवून घेतलें गेलें, व तेथूनच तो महत्पदास चढत गेला. रामचंद्रपंत जसा मुत्सद्दी होता, तसाच तो वीरगडीहि होता. त्याच्या दोन्हीहि शाखा तळपत होत्या. शंकराजी नारायण मावळच्या वातावरणांत लहानाचा मोठा झाला असल्यानें कसलेल्या मावळे गडयांत गणला जाई. दऱ्याखोऱ्या तुडवून पर्वताचे कडे सहजलीलेनें वानरासारखें चढण्याचें चापल्य त्यांच्या ठिकाणीं असल्यानें व तसेंच पाऊस, वारा, ऊन्ह यांची दरकार न बाळगणारा व तहानभुकेची पर्वा न करणारा हा मावळ्यांच्या अंगचा काटकपणा शंकराजीच्या हाडीमांसीं खिळला असल्यानें, त्यांनीं लष्करीपेशा पत्करणें क्रमप्राप्तच होतें. महाराष्ट्रांतील शिपाईबाण्याच्या धनगर समाजांतील अनेक जाती रामचंद्रपंतांच्या लष्करांत होत्या. मराठेशाहींत गाजलेले थोरात, धायगुडे, देवकाते, गावडे, कोकरे वगैरे लष्करी पेशाचीं धनगर घराणीं रामचंद्रपंताच्या लष्करी शाळेंतील विद्यार्थ्यांत गणलीं जात.

फौजेंत, घोडदळांत ह्या धनगरांचा मोठा भरणा असून त्यांनीं मोंगलांशीं चाललेल्या दीर्घकालीन स्वातंत्र्ययुद्धांत मोठीच कामगिरी केली आहे. या धनगरांच्या पथकावर रामचंद्रपंतांनीं शंकराजी नारायणाची नेमणूक केली होती. " शक १६०८–इ. स. १६८६ चे सुमारास शंकराजी नारायण यांनीं रामचंद्र आबाजी (नव्हे नीळकंठ) बहुतकर, हुकमतपनाहम, यांचे लष्करांत मोठीं हुद्याचीं व जोखमीचीं कामें केलीं आणि प्रसिद्धीस आले. त्यांत मुख्यत्वेंकरून धनगर व मावळे यांवर त्याची प्रीति होती; आणि त्या लोकांबरोबर नेहमीं शिकारीस जावें, मावळीमुलूख व चोखाटा पहाव्या असें ते करीत असत, असें शंकराजीपंताबद्दल भिडे लिहितात. पण, त्याचा आधार मात्र देत नाहींत. ह्यांतील शक १६०८ त रामचंद्रपंतास हुकमतपनाह म्हणणें, धनगर म्हणणें, डोंगरी धनगर मानणें वगैरे कित्येक चुकांकडे दुर्लक्ष केल्यावर बलवत्तर पुराव्याचे अभावीं भिडयांचें म्हणणें ग्राह्य धरण्यावांचून गत्यंतरच नाहीं. शंकराजीपंत हे रामचंद्र निळकंठ ह्यांच्या पदरीं होते हें सांगणारें एक अस्सल पत्र आपणापुढें आहे, [शि. च. सा. खं.] [ले. ९४२ पृ. १९३-१९४] हें अस्सल पत्र असून तें सदाशिव चिमणाजी सचिवानें बाबुराव पंडित अमात्य, सातारा, ह्यांस लिहिलें आहे. बाबुराव पंडित हे रामचंद्रपंत अमात्यांचे नातू होत. सचिव म्हणतात, " आपले वडिलांनीं आमचे वडिलांची स्थापना केली आहे, म्हणून आमचे तीर्थरूपांनी आम्हास सांगितलें आहे. आम्ही आपले आहों. आमचे जिल्हेचे दरक आपले आहेत. ज्यांस पाठवाल त्याचे हातून काम घेऊं."

राजाज्ञा पदप्राप्ति

‘ राजाज्ञा ’ पदाचा इतिहास—

सचिवपद-प्राप्तीपूर्वी शंकराजी नारायण ‘ राजाज्ञा ’ होते, हें हल्लीं उपलब्ध झालेल्या पुराव्यावरून निश्चित ठरतें. तेव्हां, ते राजाज्ञा केव्हां झाले हें सांगण्यापूर्वी, राजाज्ञा पदाचा इतिहास सांगण्याचा विचार आहे. त्याला दुसरेंहि एक कारण आहे; तें असें कीं, मराठ्यांच्या इतिहासाचा चिकित्सापूर्वक अभ्यास करणाऱ्यांनीं व इतर कोणीं राजाज्ञा पदाचा इतिहास सांगितलेला नाहीं. तसच, या पदाच्या इतिहासाशीं या चरित्राचा संबंधहि आहे. त्यामुळें या कामीं कांहीं पृष्ठें खर्चीं पडल्यास वाचकवर्ग रुष्ट होणार नाहीं.

‘ प्रधान, अमात्य, सचिव, मंत्री । डबीर, न्यायाधीश, न्यायशास्त्री ॥ सेनापति त्यांत असे सुजाण । अष्टप्रधानी नृप मुख्य मान ॥१॥ ’ हे शिवरायाचे अष्टप्रधान सर्वांच्या परिचयाचे असून त्याची मूळ कल्पना त्यानें कोठून घेतली, त्याची निर्मिती केव्हां झाली इत्यादि चर्चा अनेक ठिकाणीं झाली आहे. पण, या पदाहून राजाज्ञा, सरलष्कर, सेनाखासखेल, सेनासाहेब सुभा वगैरे जीं कित्येक छत्रपतीच्या दरबारीं पदें होतीं, त्यांची निर्मिती कोणीं केव्हां केली, यासंबंधीं सामान्य अभ्यासकच काय, पण मार्मिक इतिहासज्ञहि निश्चित सांगूं शकत नाहींत. छत्रपति शिवाजीमहाराजांपासून ते तहत शाहू दक्षिणेंत येऊन छत्रपति होईपर्यंतचा काळ हा शिवकाल समजला जाऊन, त्याच्या साधनाचीं कागदपत्रें

शिवकालीन समजण्याची प्रथा आहे. या काळांतील अस्सल पत्रव्यवहार अत्यल्प असून त्याच्या अभ्यासकांचाहि मोठा दुष्काळ आहे; त्यामुळें 'राजाज्ञा' हें पद शाहूच्या कारकीर्दींतच प्रथम जन्माला आलें असें म्हणणारेच बहुतेक आढळतात; पण, शिवकालीन पत्रांचा सूक्ष्म अभ्यास करणारांस, छत्रपति संभाजी महाराजांच्या दरबारींहि 'राजाज्ञा' होता असें दिसतें. आतां हें लोण यामागेंहि जातें काय हें पाहिलें पाहिजे.

राजाज्ञाचीं कर्तव्यें म्हणजे छत्रपतीची हुजरात म्हणजे खाजगत पगाऱ्या व खाजगी कारभार यांवर देखरेख ठेवणें. छत्रपतीच्या गैरहजेरींत त्याची हुजरात घेऊन स्वाऱ्या-शिकाऱ्या राजाज्ञांना कराव्या लागत. हाताखालीं 'मुतालिक राजाज्ञा' व 'खासनीस' असे दोन बऱ्याच मोठ्या दर्जाचे दरकदार आहेत. छत्रपति शाहूमहाराजांचा दुसरा किंवा तिसरा राजाज्ञा हरि मोरेश्वर देशपांडे, वाई; त्याचा मुतालिक देवराम मेघःश्याम लवाटे व खासनीस यशवंतराव महादेव प्रभू हे सर्वांच्या परिचयाचे आहेत. ज्या मोहिमांत छत्रपतीची हुजरात—खाजगत फौज आहे, तेथें राजाज्ञा आहे. एवंच, राजाज्ञा म्हणजे छत्रपतीचा खाजगत प्रधान ठरतो.

भोंसले घराण्याचा इतिहास पहातां महाराज शहाजीराजे यांनीं आपल्या मोकाश्यांत-जहागिरींत शिवाजीराजे ह्यांना पोटमोकासा तोडून दिलेला पहावयास मिळतो. कर्यातमावळ ह्या महालांतील कांहीं गांवें शिवाजीच्या पोटमोकाश्यांत होतीं. तीच व्यवस्था मातोश्री जिजाबाईंचीहि पण होती. नारोपंत हणमंते, गोमाजी नाईक पाणसंबळ हीं मा. जिजाबाईंच्या खाजगीकडील माणसें. आतां शहाजीराजे जहागिरदार असतांना जर 'दौलत' व 'खाजगी' स्वतंत्र पहा-

वयास मिळते, तर शिवराज साक्षात् राजे झाल्यावर त्यानें 'राज्य' व 'खाजगी' स्वतंत्र केली असली पाहिजे, यांत शंका नाहीं. याची स्पष्टता होण्यास विद्यमान ऐतिहासिक साधनें अपुरीं पडतात. तेव्हां ह्याला जादा संशोधनाची जरूरी आहे. तथापि छत्रपति शिवाजीमहाराजांनींच 'राजाज्ञा' हें पद निर्माण केलें व त्याची प्रभावळ जन्माला आणली हें निर्विवाद होय; पण, त्याचा राजाज्ञा कोण होता हें त्याच्या कामगिरीसह उजेडांत येईपर्यंत निव्वळ तर्क केल्यावांचून दुसरा मार्ग नाहीं. श. १५९८ च्या विजयादशमी-नंतर (इ. स. १६७६ ऑक्टोबर) शिवाजीमहाराज कर्नाटकच्या स्वारीवर निघाले. त्यापूर्वीं त्यांनीं संभाजीची खाजगी स्वतंत्र केली व त्याकरितां वेगळा अधिकारीवर्ग नेमून दिला. इकडे महाराज कर्नाटकचे स्वारीवर असतां संभाजीराजे मोंगलांकडे गेले. पण, पुढें पिता-पुत्रांत दिलसफाई झाली व पन्हाळा सुभा संभाजीकडे खाजगींत देऊन, त्याचा खाजगी कारभार त्रिंबक बाजी प्रभू ह्या गृहस्थांस सांगितला. संभाजीराजे छत्रपति झाल्यावर शिवाजीच्या अष्टप्रधानादि पदांत बराच बदल झाला. प्रथम, सचिव अण्णाजी दत्तो कैद झाला. नंतर, राज्याभिषेक-प्रसंगानंतर त्याची सुटका झाली; पण, त्याचें सचिवपद त्याला न मिळतां, मजमू—अमात्य पद मिळालें. ही घटना शके १६०२ च्या आश्विनानंतरची दिसते. तर्क आहे कीं, ह्या वेळीं अण्णाजीपंतांचें सचिव पद रामचंद्र नीळकंठ ह्यांस मिळालें असावें; कारण, संभाजीच्या कारकीर्दींत रामचंद्रपंत सचिवपदावर होते हें पुराव्यांनीं सिद्ध आहे. त्याचे वडील निळो सोनदेव अमात्य हे वारल्यानंतर अमात्यपद हणमंते घराण्यांत गेलें, हेंहि निश्चित आहे. शिवाजीच्या कारकीर्दींत रामचंद्रपंत राज्यकारभारांत होता; पण तो अष्टप्रधानांत नव्हता हें

खास. तेव्हां, तो 'राजाज्ञा' असावा, व संभाजीनें त्याला सचिव केल्यावर, त्याचें रिकामें झालेलें 'राजाज्ञा'पद शंकराजी नारायणाला मिळालें असावें. असा हा 'राजाज्ञा' पदाचा थोडक्यांत इतिहास आहे.

शंकराजी नारायण राजाज्ञा झाले—

शंकराजी नारायणाला राजाज्ञा कोठें व कधीं म्हटलें आहे, हें प्रथम पाहूं. रा. खं. १५ ले. २८० पत्राचा काळ श. १६०८ ज्ये. शु. ६ (इ. १६८६ मे १८) हा असून त्याचा लेखक 'शंकराजी नारायण' व ज्यास तें लिहिलें आहे तो कृष्णाजी दादाजी प्रभू देशपांडे सबनीस व जामनीस' हा आहे. त्यांत शत्रूला—मोंगलाला कसा शह वगैरे द्यावयाचा याचा ऊहापोह असून हें पत्र म्हणजे अधिकारी नात्यानें सोडलेला हुकूमच आहे. त्यांत एक मोठें वैगुण्य आहे; तें हें कीं, त्यांत शंकराजी नारायणाचा हुद्दा दिलेला नाहीं. मुळांत तो असावा, पण नक्कलकाराच्या हलगर्जीपणामुळें तो दिला गेला नसावा. हुजरातच्या सबनीसाला हुकूम देणारा राजाज्ञावांचून दुसरा कोण असणार? 'त्यावरी मोंगलाची धामधूम झाली. राजेश्री राजाराम जंजी प्रांतीं गेले, राजेश्री शंकराजीपंत राजाज्ञा किल्ले वसंतगडीं होते....' (रा. खं. २०, पृ. ७७९) 'शके १६१२ वैशाख वद्य १२ सातारीयांस सर्जाखानें वेढा घातला होता. त्यावरी रामचंद्र पंडित सचिव व राजेश्री शंकराजी पंडित राजाज्ञा व संताजी घोरपडा व धनाजी जाधव जाऊन लढाई करून ४००० घोडीं व हाती ८ पाडाव झाले........' (जे. श.) शंकराजीपंत हे सचिव कधीं झाले, हें पुढें येणार आहे. या नोंदी-वरून, आम्हीं मागें तर्क केला आहे, तेव्हांपासून म्हणजे शके

१६०२ पासून शके १६१२ च्या आश्विनापर्यंत हे राजाज्ञा होते, असें निःसंशय म्हणतां येईल. या १० वर्षांत त्यांनीं जी राजसेवा केली, तिजकडे आतां वळूं.

राजाज्ञापदावरील कामगिरी—

ह्या काळांतील या पुरुषाच्या कामगिरीसंबंधी माहिती देणारीं अवघीं ४-५ पत्रेंच उपलब्ध आहेत. तीं सर्व मोंगलांची छत्रपति संभाजी महाराजांच्या मुलखांत स्वारी सुरू होऊन राजाराममहाराज कर्नाटकांत जाऊन पोहोंचेपर्यंत, ज्या हालचाली झाल्या, त्याची माहिती देतात. या वेळीं मावळ सुभ्यांतील १२ महाल शंकराजी-पंतांच्या ताब्यांत होते असें दिसतें. श. १६०३ कार्तिकांत मोंगल बादशहा औरंगजेब ह्याचा मुलगा अजीम हा दक्षिणचा सुभेदार होऊन औरंगाबादेस आला आणि त्याच्या पाठोपाठ स्वतः औरंगजेब पौषांत बऱ्हाणपुरास दाखल झाला. ही सर्व तयारी दक्षिणेंतील स्वतंत्र आदिलशाही, कुतुबशाही व शिवशाही जिंकण्याकरितां होती. दक्षिणेंतील हीं राज्यें जिंकण्याचें मोंगल सरदारांचे उद्योग हवे तसे फलद्रूप न झाल्यानें मोहिमेचीं सूत्रें स्वतः हातीं घेण्याचें बादशहानें ठरविलें. श. १६०४ च्या वैशाखापासून संभाजी व मोंगल यांत जोरांचे युद्धप्रसंग होऊं लागले. 'श. १६०४ वैशाखमासीं रुपाजी भोंसले व मानाजी मोरे जाऊन शहादीखानाशीं गणेगांवापाशीं भांडण केलें. ५०० घोडीं पाडाव केलीं. त्यावर 'आश्विनमासीं रामसेजीचा वेढा उठला ' ' मार्गशीर्षमासीं रणमस्तखान येऊन कल्याणी बैसले. त्यावर रुपाजी भोंसले व केसोपंत व निळोपंत पेशवे रवाना केले.' ' माघमासीं सुलतान अजमशहा येऊन कोल्हापुरापावेतों धांविन्ना. त्यांस हंबीररावानें फिरावून भौरेपलिकडे लाविलें. ' अशा

धामधुमेंतच शंकराजी पंत राजाज्ञा होते. अर्थात्, यापुढें खुद्द संभाजीराजे व त्याची हुजरात यांनीं जे युद्धप्रसंग केले, त्यांत ते असलेच पाहिजेत. परंतु त्यांचें करणें स्वामीच्या हजेरीमुळें त्याखालीं लोपलें गेलें असावें, म्हणून तसा स्पष्ट उल्लेख तूर्त तरी आपणापुढें नाहीं. ही रणधुमाळी दोन वर्षें चालली होती. संभाजीमहाराज, विजापूरकर व गोवळकोंडेकर या त्रिवर्गांची या वेळीं एकजूट असून ते परस्परांना साहाय्य करीत होते. तेव्हां, संभाजीचे हे साहाय्यकर्ते धुळीला मिळविल्यावांचून हा हारीस येत नाहीं असें बादशाहानें ठरवून, त्यानें त्याच्या मुलखांतील हालचाली जरा ढिल्या केल्या व विजापूर-गोवळकोंड्यांकडे ढाला फिरविल्या. शके १६०४ पासून पुढील २ वर्षें मोगलांनीं सक्त मेहनत करून आदिलशाही धुळीला मिळविली व कुतुबशाही खिळखिळी करून सोडली आणि ते श. १६०८ पासून पुनश्च संभाजीच्या पाठीस लागले. राजवाडे खंड १५ ले. २८० ह्या पत्रांत कृष्णाजी दादाजीला शंकराजी नारायण लिहितो.

१ " मावळ पा। गनिमानी चाल केली आहे म्हणोन समजलें. त्यांस कोरल खिंड व ढवला घाट व मांढरदेवाचा सडा येथील जागा जागा चौक्या घालून गनिमाची खबर ठेऊन कमकसुर खास बातमी पावतीं करणें + + + + राजगडीं कळविताच तुमची कुमक रोहिडा वगैरे जागाहून होईल "

, " तुम्ही सिरवली मर्दमु चांगली केली हे खबर येथें समजली. या वेळी गनीम नामोहरम सर्वांनीं करावा. तुम्ही जमेदार व सरचाकर महाराजाचे वेळाचें + + + करोन दाखवतील हा भरंवसा आहे. "

[खंड. १५ ले. २८०] परंतु, या पूर्वीच मावळ प्रांतांत मोगलांचा अंतस्थ शिरकाव होऊन तो जवळ जवळ त्यांच्या ताब्यांत गेला होता. कारण त्यांतील नेहमीं तरते बुडते पाहणारे, कित्येक वर्षें स्वातंत्र्याचा उपभोग घेणारे देशमुख देशपांडे वगैरे वतनदार मोंगलांस जाऊन मिळाले होते. अफजल प्रसंगीं वतनांवर पाणी सोडून शिवरायाची सेवा करणारे, तात्कालीन शाहीरांनीं ज्यांना ' हनुमंत अंगद रघुनाथाला, जेधे बांदल शिवाजीला ' असें म्हटलें आहे व महाराष्ट्रराज्य हें आपलें राज्य म्हणून त्याची पोटतिडीक बाळगणारे जेधे देशमुखही जेथें मोंगलाकडे गेले, तेथे इतरांचा पाड काय? ही घटना श. १६०७ त जन्माला आली होती. आतां, प्रश्न असा उद्भवतो कीं, मोंगलांची जबरदस्ती झाली म्हणून त्यांना ते मिळाले कीं त्यांनीं स्वराज्यद्रोह केला, त्याचें उत्तर निश्चित द्यावयाचें झाल्यास वतनदारांचा इतिहास पहावा लागेल. तो आपण थोडक्यांत पाहूं.

कथेंत आडकथा

महाराष्ट्रीय वतनदारांची उत्पत्ति, स्थिति व लय—

महाराष्ट्रांत गांववतनदार व परगणेवतनदार असे वतनदारांचे दोन प्रकार आढळतात. पाटील, चौगुला व कुळकर्णी हे गांववतनदार आणि देशमुख, सरदेशमुख व देशकुळकर्णी ऊर्फ देशपांडे हे परगणेवतनदार होत. यांतील पहिला वर्ग मुसलमान-पूर्वकालीन आहे आणि दुसऱ्याच्या उत्पत्तीला मुसलमानी राजसत्ता कारण

झाली आहे. दक्षिणेंत मुसलमानी राजवट सुरू होण्याच्या पूर्वीं, पूर्वींच्या काळाचीं जीं ऐतिहासिक साधनें आहेत, त्यांतून पहिल्या वर्गाचा आढळ होतो; पण, दुसऱ्याचा पत्तामुद्दाहि लागत नाहीं. म्हणजे गांववतनदार स्वयंभू व प्राचीन आणि परगणेवतनदार अर्वाचीन व कृत्रिम म्हटले पाहिजेत. वैराण प्रदेशांत शिवार लागणीला आणून त्यांत गांवांची वसाहत करणारा तो त्या गांवाचा पाटील झाला व त्यानें आपल्या कारभाराच्या सोयीकरितां चौगुला व कुळकर्णी जन्माला घातले. या घटनेचा कोणत्याहि राजयंत्राशीं संबंध नव्हता, म्हणूनच त्यांना आम्ही स्वयंभू म्हटलें आहे; परंतु, परगणेवतनदारांची स्थिति मात्र तशी नाहीं. त्यांची उत्पत्ति मुसलमानांच्या ढिल्या राजवटीनें झाली. पहिलें हे मुसलमानांचे नोकर आणि पुढें तेच वंशपरंपरेचे अतएव सनदी नोकर झाले. आमच्यांत आज जसा विस्कळितपणा आहे, तसा तो मुसलमान-पूर्वकालींहि दृष्टीस पडतो. म्हणजे विस्कळित राहून संघटित असणारांचा मार खावयाचा हा आमचा जन्मसिद्ध हक्कच म्हणायचा ! या आमच्यांतील दुर्गुणामुळें, मुसलमानी आक्रमण येतांच, आम्हीं त्यापुढें नमावयाचें हें ठरलेलेंच होतें. भारतवर्षांत इतरत्र जें झालें, तेंच महाराष्ट्रांत झालें. दिल्लीच्या बादशहाचा पुतण्या अल्लाउद्दीन खिलजी यानें गंमतीनें स्वारी केली काय आणि दृढमूळ झालेलें यादवांचें राज्य अल्प काळांत रसातळास पोंचलें काय ? साराच चमत्कार ! हा आमच्या हाडींमासीं खिळलेल्या फुटीर वृत्तीचा देखावा होय. असो.

मुसलमानांनीं चुटकीसारखा महाराष्ट्र व्यापला तरी तेथें त्यांना स्थिर होणें कठीण झालें होतें. त्यांना हीं स्थैर्याचीं पावलें आस्ते टाकावीं लागलीं व त्यांतच परगणेवतनदार निर्माण

झाले. मुसलमानी अंमल बसला, तो केवळ वरचा मुलामा होता. त्याखालीं सर्व आमचेंच राहिलें. महाराष्ट्रांत तरी असेंच होतें हें खास! येथें त्यांची सत्ता खालपर्यंत कधींच जाऊन पोहोंचली नाहीं. त्यांच्या उत्पन्नाच्या बाबींचीं सर्व सूत्रें एतद्देशीयांच्याच हातांत होतीं. त्यामुळें त्यांच्या अंमलाखालच्या सामान्य हिंदु प्रजेला मुसलमानी अमल सटीसामासीं येणाऱ्या त्यांच्या धार्मिक वृत्तीच्या लहरीवांचून कधींच जाणवला नाहीं, यांत आश्चर्य कसलें? त्यांची उत्पन्नाची मुख्य बाब जी जमीन-महसूल, ती वसूल करण्याकरितां म्हणून देशमुख ऊर्फ देसाई ह्याला त्यांनीं प्रथम जन्म दिला. कोणताहि देशमुख पहा, तो आपला 'कूळकट' बेदरच्या बादशहाचे—बहामनी राज्याचे वेळेपासून सांगूं लागतो. त्यामागें कोणीच जात नाहीं. जाणार कसें? जो जन्मला नाहीं, त्याची वार्ता पुसण्यांत अर्थ काय? मुसलमानी अमल सुरू होतांच, त्यांनीं राज्यकारभाराच्या सोयी-करितां राजकीय भागोपभाग पाडले आणि ते जुन्या राजवटींतील राज्यकारभार केलेल्या माहीतगारांच्या हवालीं केले. पैकीं, खालच्या अंमलदारांचें वतनदारांत रूपांतर झालें. अनेक गांवांचा जो विभाग तो 'परगणा' आणि अनेक 'परगण्यांचा' विभाग तो प्रांत! पैकीं परगणाधिकारी व त्यांचे दुय्यम हे स्थिर झाले आणि त्यांचे वरिष्ठ फिरते राहिले. प्रथमचा परगणाधिकारी देशमुख झाला व त्याचा दुय्यम लेखक देशपांडे बनला. पुढें ह्यांना ह्या जागा वंशपरंपरेनें प्राप्त झाल्या आणि हे वतनदार वंशपरंपरेनें कायम झाल्यामुळें त्या परगण्यांतील लहानमोठे जमीनदार व त्यांच्या जमिनी कसणारे साहजिकच त्यांच्या तंत्रानें राहूं लागले. म्हणजे वतनदार हे रयतेचे वंशपरंपरा पुढारीहि झाले. अशा रीतीनें देश-

मुखाकडे सरकार व रयत या दोघांचाहि संबंध आला. सरकारचा तो वंशपरंपरेचा अंमलदार व रयतेचा वंशपरंपरेचा पुढारी; याशिवाय देशमुखांना सरकारची दुसरी एक कामगिरी करावी लागे आणि तीच खरी त्यांच्या अबाधित सत्तेला कारणीभूत झाली. देशमुखानें आपल्या परगण्याचें स्वकीय व परकीय आक्रमणापासून संरक्षण करावयाचें असल्यामुळें त्याला जमावानिशीं राहण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. तसेंच, त्याला सरकारला परगण्याच्या विस्ताराच्या मानानें वेळोवेळीं लढाऊ लोक पुरवावे लागत. म्हणजे हल्लींच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे ' रिक्रूट ' द्यावे लागत. या बाबतींत पुढील पत्र पहा. (भा. इ. सं. मं. तृ. सं. वृ. पृ. १६७-१६८ श. १५७३) हें शिवाजीमहाराजांनीं बिरवाडीच्या हुकुमांतील वतनदारांना लिहिलेलें आहे. त्यांत ते म्हणतात—

" जे वख्ती जैसें मावळें देशमुख आपले लोक घेऊन मसलतीस साहेबापासी येताहेती, तेच हरनिसबतीनें जे वख्ती मसलतीचे काम साहेबांस पडेल ते वख्ती आपण दहा १० लोक बराबरी घेऊनु साहेबांचे सेवेशी येऊनु दररोज मुशांहिरा बद्दल अडसेरी रुकें ८६ दर नाफरें घेऊनु मसलती जोवरी असेल तोंवरी साहेबकाम करूनु मसलतीचे काम जालीयावरी साहेब रजा देतील तेधवां गांवां-जाऊनु. " एवंच देशमुखाला त्यांच्या परगण्यांत मुलकी व लष्करी दोन्हीहि प्रकारचे वंशपरंपरेचे अधिकार होते आणि म्हणूनच त्या परगण्याचा तो राजा कसा होता हें ध्यानांत येईल. देशमुखांची रयतेवरील पकड देशभागापेक्षां मावळी व कोंकणी विभागांत विशेषच दृष्टीस पडते. कारण मुसलमानी सत्ता या भागांत त्याच्या नैसर्गिक रचने-मुळें केवळ नाममात्र होती. खरी सत्ता देशमुखांच्याच हातीं राहिली. त्यांतले त्यांत मावळांत देशमुखांचें प्राबल्य विशेषच आढळतें.

असून अडचण नसून खोळंबा—

शिवाजीमहाराजांनीं स्वराज्यस्थापनेकरितां आपल्या जहागिरीचा पायासारखा उपभोग केला. एकतर, त्यावर त्यांची सामान्य सत्ता होती व दुसरें म्हणजे विशेष सत्ताधारी जे विजापूरकर, यांना तो विभाग राज्यकाभाराला त्यांच्या नैसर्गिक रचनेमुळें कठीण जात असे. म्हणून तो विभाग 'चुकल्या म्हशी दानाला देण्या'सारखा तेथील वतनदाराच्या अबाधित सत्तेला त्यांना दान द्यावा लागला होता. शहाजीराजांच्या जहागिरींत दादोजी कोंडदेवांच्या दक्षतेच्या कारभारामुळें तींतील वतनदार व रयत त्यावर सारखीच प्रेम करीत होती. वतनदारांत 'भाव' निर्माण करितांना दादाजी पंतांना प्रसंगोपात दंडाहि चालवावा लागला. त्यांनीं बारा मावळांतील ' दाईते ' घेण्याइतपत वरचढ झालेल्या कृष्णाजी बांदलांवर दंडा चालवूनच आपल्या कच्छपीं लावलें होतें. हा बांदलाला भाव प्रथम ' भिणेभाव ' होता. तरी त्याचें पर्यवसान भक्तिभावांत झालें, हें पुढें बांदल देशमुख शिवाजीचे उजवे हात बनले यावरून उघड होतें. पण प्रथम त्यांना जरबेंत आणावें लागलें होतें, हें विसरून चालणार नाहीं. शहाजीराजे कर्नाटकांत मोहिमशीर असल्यानें त्यांच्या महाराष्ट्रांतील जहागिरींत चाललेल्या भल्याबुऱ्या कारभारांत विजापूर दरबार हस्तक्षेप करूं शकला नाहीं. मावळांतील कांहीं देशमुख मूळचेच जहागिरदाराला चाहणारे असल्यानें शिवरायांना विशेष अडचण पडली नाहीं. तरी पण, त॥ उत्रवलीचा देशमुख खंडोजी खोपडा व त्याचा वंश थेटपर्यंत खड्यासारखा खुपतच राहिला. असें तिरपगडें मावळी रयतेचें नव्हतें. दादाजोपंतांनीं आपल्या ताब्यांतील प्रदेशांतील शेतीला

उपद्रव देणाऱ्या लांडग्यांना मारून व ' इस्ताव्याचे कौल ' देऊन लागण सुखकर केल्यामुळें, मावळे शिवाजीवर भलतेच खूष होते. एवंच मावळांतील कांहीं वतनदारांत ' भिणेभाव ' असला, तरी रयत मात्र 'भक्तिभावानें' ओथंबलेली होती.

शिवरायाला स्वराज्यस्थापनेंत मदत करणारांत त्याच्या पदरचे आश्रित, मावळांतील जेधे बांदलासारखे कांहीं देशमुख व मावळे असे प्रमुख वर्ग आहेत. पैकीं देशमुखादि वतनदार हे गुंजण मावळांतील गुंजवणी नदींतील गोट्यांसारखे निसरडे होते! त्यांच्या आश्रयावर राहणें नेहमींच धोक्याचें असे. हे निसरडे गोटे पायाखालचे केव्हां निसटतील व प्रवाहांत तोंडघशीं पाडतील, याचा नेम नव्हता. आणि शेवटीं तसें झालेंहि. ज्या ज्या वेळीं शिवप्रभूंना आपल्याच मुलुखांत गनिमाशीं दोन हात करावे लागले त्या त्या वेळीं त्यांना वतनदार भोंवल्यावांचून राहिले नाहींत. अफझल प्रसंगांतील देशमुख खंडोजी खोपडा व वाईचा देशपांडया कृष्णाजी भास्कर ह्यांचें वर्तन या बाबतींत चांगलीच साक्ष देईल. वतनदारांच्या या लीला चालत्या मोहिमेपेक्षां स्थिर मोहिमेंत चांगल्याच भोंवल्या. अशा मोहिमा औरंगजेबानें केल्या. पैकीं, पहिली मोहीम त्याचा दक्षिणचा सुभेदार व मामा शाईस्तेखान याची होय. हा श. १५८२ जेष्ठांत (इ. स. १६६० जून) शिवाजीच्या मुलुखांत उतरला, तो श. १५८५ चैत्र (इ. स. १६६३ मार्च-एप्रिल) ह्या महिन्यांत पुण्यास बोटें तोडून घेऊन व आपल्या मुलाचा बळी देऊन 'मोंगलाईंत' परत गेला! ह्या २॥ वर्षांच्या काळांत शिवाजीच्या राज्यांतील लहान-मोठे सर्वच वतनदार मोंगली सत्तेशीं एकजीव झाले होते. तोच प्रकार औरंगजेबाचा, दुसरा सरदार जोधपूरचा राजा मिर्झा राजा जयसिंग ह्याच्या

स्वारींत झाला. ही स्वारी श. १५८७ (इ. स. १६६५ मे) सुरू झाली, ती श. १५९१ पौष (इ.स. १६७० जानेवारी) 'मोगलांचा व राजेश्री शिवाजीराजे (ह्यांचा) सल्ला तुटला. प्रतापराव, आनंदराव फौजेनिशी औरंगाबादेंस शहाजादीयाजवळ होते. ते रांजगडास आले.' तेव्हां संपली. या अवधींतहि शाईस्तेखानाच्या वेळेसारखाच प्रकार झाला.

शिवाजीमहाराज आग्र्याहून सुटून आल्यानंतर दोन वर्षांनीं त्यांनीं मोंगलांशीं बिघाड केला, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. आग्र्यास अटकेंत असतांना मोंगली दरबारची एकंदर परिस्थिति त्यांनीं सूक्ष्म तऱ्हेनें पाहून घेऊन औरंगजेबाच्या पुढील डावाचा त्यांनीं अभ्यासपूर्वक आराखडा आपल्या अंतःकरणांत आंखून ठेविलेला होता. त्यामुळें इतउत्तर स्थापिलेलें स्वराज्य टिकवावयाचें असल्यास, मोंगलाशीं जबरदस्त झगडा दिल्यावांचून गत्यंतरच नाहीं, अशी त्यांची खात्री झाली होती.

तह—जाबिता तह सन इसने कारणे, राजश्री साहेबी हात केला कीं, जो आपला वतन मुलूख आहे, त्यापैकीं माहाली माहलीं हून खजना करावयास पैके आणावे, त्याचा खजानाच करून ठेवावा जे वख्ती मोगलासी झगडा सुरू होईल आणि मोगल येऊन यैवज जुलेना, तरी खजानाचे पैके खर्च करावे नाहीं. तरी, येव्हवी गडास वेढा घालतील, त्याचे मदतीस, जरूर आणिकी करज राज्यभागास सर्वहि खर्च न करावा. यैसा साहेबी तह केला असे आणि खजाना करावयाची मोहीन केली; होनु १२५०००.

मत एक लाख पंचवीस हजार होनू रास २०००० कडाळ, २०००० राजापूर, २०००० कोळे, १५००० दाभोळ, १३०००

पुणें, १०००० नागोजी गोविंद, ५००० जाऊली, ५००० कल्याण. ५०००, भिऊडी, ५००० इंदापूर, २००० सुपे, ५००० कृष्णाजी भास्कर, येणेप्रमाणे येक लाख पंचवीस हजार होनु खजाना करावयाचा तह केला असे. मोर्तब सुद. मर्यादेयं विराजते दस्तुर राजश्री पंताचे (बा. द. भा. १ ले, १७).

आणि आग्र्याहून आल्याबरोबर त्यांनीं मागील अनुभवावरून हें नक्की ठरविलें होतें, कीं भावी लढ्यांत आपल्या मुलुखांतील परगणे वतनदार अस्तनींतील निखारे होतील. तेव्हां त्यांना वेळींच आळा घातला पाहिजे.

मुलुखाची बटई केली—

शके १५८८ तील शिवाजीमहाराजांच्या हालचाली अशा होत्या. ज्ये. शु. २ स (इ. स. १६६६ मे २५) त्यांना आग्र्यांत अटक झाली. श्रावण वद्य १२ (१६६६, १७ ऑगस्ट) " आग्रीयांतून पेटारीयांत बसून पळाले " आणि चार महिन्यांच्या प्रवासानंतर मार्गशीर्ष शु. ५ स राजेश्री संभाजीसहवर्तमान राजगडास आले. श. १५७९ साल मोंगलांचें झालेलें सख्य कायम ठेवण्यांत गेलें आणि त्याऐवजीं विजापूरकरांशीं एक झगडा देऊन त्यांचाहि सल्ला केला आणि ही बाहेरची उपाधि तात्पुरती स्थिर केल्यावर " तेंच वर्षी (श.१६६९) राजेश्रीनें (शिवाजीनें) मुलखाची बटई केली" ही बटई म्हणजे शिवरायाच्या दूरदर्शी धोरणाचा उत्कृष्ट नमुना होता. मुलुखाची बटई करून त्यांनीं पुढील गोष्टीं साधल्या:-

(१) आपल्या रयतेची धामधुमीमुळें आर्थिक दृष्टया अत्यंत खालावलेली परिस्थिति सुधारणें. (२) मुलुखांत धान्याचें उत्पादन वाढवून 'अधिक धान्य पिकविणें' (३) पुढील जबरदस्त

झगड्याकरितां सरकारी धान्याचीं मुलुखांतील दास्तानें–कोठारें–व गडकोटांतील अंबरखाने मुबलक धान्यानें भरून ठेविले. (४) वतनदारांच्या स्वैर संचारांस आळा घालून त्यांचें 'राजेपण' हिरावून घेऊन त्यांचा रयतेशीं मुळींच संबंध येऊं न देणें. एकंदरींत मुलुखाची बटई करून त्यांनीं आपल्या-राज्यकारभारांत क्रांतिकारक सुधारणा केली, ह्यांत शंका नाहीं. अशी ही बटई तरी काय होती, हें पाहिल्यावांचून तिनें घडवून आणलेली क्रांति नीट ध्यानांत यावयाची नाहीं.

बटई म्हणजे काय—

रयतेनें लावणी केलेल्या जमिनीचा जो राजभाग–सारा–द्यावयाचा तो नाण्यांत देण्याची पद्धति सर्वत्र व सर्वकाळीं चालू आहे. पण, मोंगलांच्या स्वारीपासून शिवाजीच्या ताब्यांतील प्रदेशांत राहणारे शेतकरी आर्थिक दृष्टीनें अत्यंत हलाखींत आले होते. नाण्याची टंचाई झाली. नित्योपयोगी जीवनाला आवश्यक लागणाऱ्या वस्तूचे भाव भयंकर कडाडले. रयतेंत मुळींच त्राण उरला नाहीं. तेव्हां, शिवरायांनीं असा हुकूम सोडला कीं, यानंतर राजभाग देणें तो पैशांत न देतां ज्याच्या शेतांत जें धान्य पिकलें असेल, त्यांतच तो द्यावा. या हुकुमाची सर्वत्र जारी केली आणि हीच ती मुलखाची बटई होय. ह्या बटईमुळें रयतेनें आपलें धान्य कर म्हणून अगर धर्मादाय म्हणून कोणत्याहि प्रकारें सरकारावांचून इतरांना देऊं नये अशीहि या बटईंत एक सक्तीची ताकीद होती. जेथें खुद्द सरकारच आपला वसूल धान्याच्या रूपानें घेऊं लागलें, तेथें वतनदारांनाहि तोच मार्ग अनुसरणें भाग होतें. पण त्यांना यामुळें तसें करतां येत नव्हतें आणि सरकारी वसुलाच्या प्रमाणांत त्यांना आपला हक्क वसूल करण्याची सोय नव्हती ?

बटई आणि वतनदार व हक्कदार

बटई आणि वतनदार व हक्दार—

वतनदारांचा विशेषतः सरदेशमुख, देशमुख, देशपांडे यांचा हक्क सरकारच्या वसुलाच्या—ऐनतनख्याच्या प्रमाणांत सालोसाल ठरविला जाऊन ते परभारें रयतेपासून वसूल करीत. त्यांनीं रयतेपासून वाजवी हक्क वसूल केला कीं मनमानेसा केला हें, सरकारास कळण्याची सोय नव्हती. त्यामुळें वतनदार हक्काच्या नांवावर रयतेवर सुलतानी चालविण्यास कमी करीत नसत, हें सांगणें नको; पण बटईमुळें रयतेपासून आपला हक्क काय घ्यावा, हें कळण्यास अडचण आहे. त्यामुळें शिवाजीमहाराजांनीं त्यांच्या हक्काची चौकशी करून त्यांची 'मोईन' करून दिली आणि तीहि त्यांनीं रयतेकडून न घेतां सरकारांतून पोत्यांतून—खजिन्यांतून—घ्यावयाची व्यवस्था केली. मोईन म्हणजे आज गांव कामगार पाटलांना जो मुशाहिरा देतात, तो. पाटील आपला हक्क नख्त मुशाहिरा दरसालच्या वसुलाच्या प्रमाणांत न घेतां, एकदां जो ठरला तोच सालोसाल घेतो, तीच नेमकी पद्धत शिवाजीमहाराजांनीं सर्व वतनदारांस घालून दिली.

वतनदार वरीलप्रमाणें ठराविक नख्त 'मोईन' (पगार) घेण्याच्या व्यवस्थेनें नाखूष झाले आणि त्यांनीं आपलीं वतनें जप्त केल्याचा डांगोरा पिटला. वास्तविक वतनदारांना हक्काची ठराविक नख्त मोईन मिळूं लागली, तरी त्यांचें दिवाणकारभारांतील स्थान कायम होतें. आजचा पाटील मुशाहिरा घेत

असतांहि जसा हक्कानें चावडीचा सरकारी कारभार करितो, त्याच-प्रमाणें नख्त मोईन करून दिलेले वतनदार सरकार निसबत कामें करीत होते. म्हणजे त्यांचीं वतनें चालू होतीं. तेव्हां, बटईनें त्यांचीं वतनें खालसा झालीं, या कोल्हेकुईंत कांहीं अर्थ नाहीं; पण, या व्यवस्थेनें वतनदार चिडले गेले, हें मात्र खरें.

या चिडाचिडीचें मुख्य कारण, त्यांचा रयतेशीं असलेला भलाबुरा संबंध तुटला व त्यांचें पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेलें त्यांचें पुढारीपण नष्ट झालें आणि हें त्यांचें पुढारीपण नाहींसें करणें शिवाजी-महाराजांना जरूर होतें; म्हणून तर त्यांनीं बटईच्या निमित्तानें त्यांना होटाळी घातली. त्याबरोबर त्यांनीं पोट बांधून काम करूं नये, म्हणून वास्तविक ज्यांना मोईन कमी पडत होती, त्यांना त्यानें तैनात म्हणून जादा मिळण्याची व्यवस्था केली. बटईनें नेमकें काय केलें, हें तत्कालीन पत्रव्यवहारांत स्पष्ट आहे. ' ता। मज-कुरीचे देशमुख देशकुलकर्णीं यांस पूर्वीं निजामशाही कारकीर्दीस इनाम व हक्क लाजिमे चालत होते. त्यावरी कैलासवासींनीं (शिवाजीमहाराजांनीं) आपला प्रांत कबज जाला, त्या समयीं कुल वतनदाराचे हक्कलाजिमे व इनाम अवघें मना करून मुशाहिरे याची मोईन करून दिल्ही. त्याप्रमाणें चालत आहे ' [शि. च. सा. खं. ६ ले. १२१]. वतनदाराप्रमाणेंच हक्कदारांचाहि रयतेशीं हक्कदार नात्यानें असलेला संबंध तोडून टाकला. चिंचवडकर देव म्हणजे शिवाजीमहाराजांचें गुरुघर; पण त्यांनींसुद्धां त्यांना रयत निसबत मिळत असलेली धान्यादीची सालोसालची सवलतीची खरेदी बंद केली आणि तो बोजा सरकारवर टाकला (शि. च. सा. खं. ४ ले. ६८४ पहा). अशा रीतीनें अडेलतट्टू वतन-

दारांच्या तोंडांत घातलेला कांटेरी लगाम संभा जीमहाराजांच्या मृत्यूपर्यंत कायम होता. शिवाजीमहाराजांनीं वतनदारावर धरलेली शिस्त अन्यायाची होती असें वाटत असेल, त्यांनीं तत्कालीन वतनदारास ओळखिलें नाहीं असें म्हणावें लागतें. तेव्हां, त्यांनीं एकदां अमात्यांनीं आपल्या राजनीतींत, त्या काळचा हा वर्ग जो रंगविला आहे, तो अवश्य पहावा.

"राज्यांतील वतनदार, देशमुख, देशकुलकर्णी, पाटील आदिकरून यांस वतनदार म्हणून म्हणावें, ही प्राकृत परिभाषा मात्र आहे. ते स्वल्पच परंतु स्वतंत्र देशनायकच आहेत. सार्वभौमापासून बलन्यूनतेनें उतरती परंपरा बलवंत राखोन दुर्बल वर्ततच आहेत; परंतु त्यांस साधारण गणावें असें नाहीं. हे लोक म्हणजे राज्याचें दायादच आहेत. आहे वतन इतक्यावर कालक्रमणा करावी, सर्व देशाचा स्वामी म्हणजे राजा; त्याशीं निष्ठेनें वर्तावें; कोणाचा अन्याय न करावा ही यांची बुद्धि नाहीं. जंव जंव नूतन संपादावें व बळकट व्हावें; बळकट झालें म्हणजे एकाचें घ्यावें; दावे-दरवडे करावे, हा यांचा सहज हव्यास. राजशासन होईल हें जाणोन अगोदर दुसऱ्याचा आश्रय करतात, स्थळें बांधतात, त्या बळें वाटा पाडितात, देश मारितात; समयीं जीवाचीहि तमा धरीत नाहींत; परचक्र आलें म्हणजे वतनाच्या आशेनें अगोदर सलूख करतात, स्वतां भेटतात, तिकडील भेद इकडे, इकडील भेद तिकडे करून राज्यांत शत्रूचा प्रवेश करतात, मग तेच राज्याचें अपायभूत होऊन दुःसाध्य होऊन जातात. याकरितां या लोकांचें संरक्षण परमयुक्तिजन्य आहे. इत्यादि दोष या लोकांत आहेत; म्हणून यांचा केवळ द्वेष करावा; वतनें बुडवावी म्हणतां, हाहि परम अन्याय. समय-

विशेषें अनर्थाचें कारण. तें न होतां यांस मोकळी वाग देईन म्हणतां, यांची निजप्रकृति तेव्हांच प्रकट होणार, याकरितां या दोन्ही गोष्टी कार्यास येत नाहींत; यांस स्नेह आणि दंड या दोहोंमध्यें निक्षून ठेवावें लागतात. आहे वतन तें चालवून प्रजेवर यांची सत्ता असूं न द्यावी. हक्क इनाम आज्ञेविरहित घेऊं न द्यावें; जें वतन चालत आलें असेल तेहून जाजती किंवा जवभर कमीहि होऊं न द्यावें आणि देशाधिकारी यांचे आज्ञेंत वर्तावें. सात-पांच भाऊबंद अथवा निसबतीचे लोक एकजमावें वतनदार राहूं न द्यावे. शोध करून जे भाऊबंद निसबतीचे लोक असतील, त्यांस दूर प्रदेशीं त्यांचे कर्तेपणायोग्य काम सांगून कबिलेंदखील प्रत्येक (आपणाजवळ) ठेवावे. वतनदार गुंग होऊं न द्यावे. वतनदारांस वाडेहुडे देखील बांधूं न द्यावे. कदाचित् वतनदारांत उद्धत, उच्छृंखळ असा कोणी असला, तर त्यास नांवाजून जें कठिण कार्य असेल तशा कार्यावर पाठवावें. त्यामध्यें कार्य अथवा त्याचा नाश हीं दोन्ही स्वकार्येंच आहेत. वांचला, तर आणखी कठिण कार्य असेल, तशा कार्यावर पाठवावें. वतनदारांचा परस्पर कलह होऊं न द्यावा. वतनदारांची खुशामत बरी करीत जावी; परंतु, त्यांस वर्तावयाचा पायंडा आहे; त्या पायंड्यास तिळतुल्य जाजती होऊं न द्यावें. अंतर पडल्यास तात्काळ शासन करावें. वतनदार पाहून वर्षा दोन वर्षीं कांहीं समर्पक अंतर स्थापून अल्पस्वल्प द्रव्यादि ग्रहणें हलकें करीतच असावें. ज्याजवळून अंतर पडलें नसेल, तसा वतनदार जवळ असतां इतर सेवकांजवळ हे वतनदार बहुत भले लोक, प्रामाणिक, मायेचें इत्यादि त्यांस प्रोत्साहन होय, अशीं वचनें बोलत जावीं. वतनदारांमध्यें कार्यकर्ते प्रामाणिक मनुष्य

असल्यास, तसे सेवक मिळणें परम कठीण. आधीं वतनदार हा एक विश्वास, ततोपि प्रामाणिक म्हणजे सोनें आणि सुगंध; याकरितां तशाचा अत्यादरें संग्रह करावा, मेहरबानी करावी, बहुमान वाढवावा, हुजूरसेवा सांगावी. किंबहुना जें नाजुक कार्य असेल, तशा कार्यावर ठेवावें." [अ. रा. वि. पृ. २३–२५]

वतनदारांनीं सूड घेतला—

शिवरायांनीं वतनदारांवर शस्त्र चालवून त्यांना जी जखम केली, ती अनुकूल काळ येतांच चिघळली व तिनें महाराष्ट्र राज्याला भयंकर अपाय केला. संभाजीचा मोंगलांपुढें टिकाव लागत नाहीं, आतां हें राज्य राहात नाहीं असें पाहून रुष्ट झालेले वतनदार मागला पुढला विचार न करतां सरळ त्यांच्या हयातींतच मोंगलांना जाऊन मिळाले व त्यांनीं व मोंगलांनीं एकच डोहाणा करून संभाजीमहाराजांचा वध होतांच स्वराज्यांत सामील असलेल्या महाराष्ट्रावर मुसलमानी कृष्णछाया पाडली व ती घालविण्याकरितां रामचंद्रपंत व शंकराजीपंत या पंडितद्वयांना राजाराममहाराज व त्यांचें मंत्रीमंडळ यांच्या अनुज्ञेनें शिवाजीमहाराजांनीं तोडलेले वतनदाराचे पंख पुन्हां त्यांना चिकटवावे लागले आणि म्हणूनच पूर्वापार संबंध ध्यानांत येण्यास या ठिकाणीं या विषयाचा येथें एवढा विस्तार करावा लागला.

तुटलेले दुवे सांधले—

मुलुखाची बटई करून शिवरायानें भरमसाट वाफटणाऱ्या वतनदार तट्टांना ओठाळी कां व कशी घातली. यासंबंधीं मागील प्रकरणांत चर्चा केलीच आहे. हें वतनदारासंबंधीचें धोरण शिवाजीमहाराजांप्रमाणें संभाजीमहाराजांनीहि कायम ठेवलें होतें. त्यांत त्यांनीं बिलकूल

फरक केला नाहीं. त्यामुळें मोंगलांची दाटी होतांच, स्वार्थी वतनदार त्यांना भराभर जाऊन मिळाले व त्यांनींहि त्यांचा भरपूर उपयोग करून घेतला. मोंगलांनीं जुनी मुसलमानी राजवट चालू केली. या बाबतींत स्पष्ट पुरावा मिळतो. पण, येथें त्याचा नुसता नामनिर्देश करूनच पुढें जाऊं या. सांगण्याचें तात्पर्य, मोंगलांनीं वतनदार पचवून आपल्या लगामी लावले व शिवशाही पेंचांत आणली. बाजी सर्जेराव जेधे म्हणजे शिवरायाचा उजवा हात. आणीबाणीचा प्रसंग आणि तेथें जेधे हजर नाहींत, असें कधीं झालेंच नाहीं. असें असतांहि तेच जेधे श. १६०७ पूर्वींच औरंगजेबाला जाऊन मिळाले. पण, त्यांस तेथील हवा मानवली नाहीं, म्हणून ते पुन्हां मराठी राज्यांत येण्याची खटपट करूं लागले, परंतु संभाजीमहाराजांनीं त्यांना तेजस्वी भाषेंत खरमरीत पत्र लिहून त्यांची चूक त्यांच्या पदरांत घातली. हीं पत्रें वाचकांनीं मूळांतच वाचावीं अशी आम्ही शिफारस करतों. [रा. खं. १५ ले.].

वतनदाराप्रमाणेंच शिवरायाचे अत्यंत विश्वासू नौकरहि औरंबजेबाच्या मिठास व मायावी भाषेला भुलून त्याच्या कवेंत सांपडले होते. सुप्रसिद्ध राघोबल्लाळ अत्र्याचा मुलगा सरसुभेदार दामाजी रघुनाथ, पुरंदरचा हवालदार बाजी घोलप, केरोजी पवार वगैरे संभाजीमहाराजांच्या हयातींतच मोंगलांस मिळाले व तिकडेच जबाबदारीचीं कामें करून कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ झाले. तेव्हां, रामचंद्रपंत व शंकराजीपंत ह्यांनीं सत्ता हातीं येतांच, हे तुटलेले दुवे सांधण्याचें कार्य प्रथम हातीं घेतलें.

वतनदारांच्या बाबतींत छत्रपतींच्या अनुज्ञेनें त्यांनीं पवित्रा बदलून त्यांचीं वतनें त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांस बहाल केलीं व त्यांचें साहाय्य मिळविलें. हा बदल केवळ नाइलाज म्हणूनच करावा लागला. तसेंच, तिकडे गेलेल्या नोकरांनाहि उदारतेनें परत आणण्याची खटपट केली. या कामीं औरंगजेबानें आपलें आसन जसजसें स्थिर होत चाललें, तसतसें आपलें वास्तविक स्वरूप दाखविण्यास सुरवात केल्यामुळें ही सांधेजोड जोडणें सोपें झालें. एवंच, अशा रीतीनें स्थलशुद्धि करून नंतर या जोडीनें रणकुंड चेतविलें व महाराष्ट्रांत रणयज्ञ सुरू केला.

वतनदारांची समजूत कशी घातली ?

प्रथम हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, शंकराजी नारायण राजाज्ञा असेपर्यंत त्यांच्या ताब्यांतील मुलुखात रामचंद्रपंत व ते स्वतः अशा दोघांचाहि पत्रव्यवहार पहावयास मिळतो. म्हणजे मुलुखाचा राज्य-कारभार रामचंद्रपंतांच्या अनुज्ञेवांचून त्यांना करतां येत नव्हता. असो. रामचंद्रपंतांनीं प्रथम मावळ प्रांतांत अनुभवशीर व पूर्वीं काम केलेल्या माहादाजी शामराज ह्यालाच देशाधिकारी–सुभेदार नेमलें. हा माहादाजी शामराज बहुधा शिवरायाचा पेशवा शाम-राजपंत रोझेकर ह्याचा मुलगा असावा. ह्या देशाधिकाऱ्याला अधिकारदान करतांना स्पष्ट आज्ञा होती कीं, ‘ तुम्हांस प्रांत मजकुरीचा देशाधिकार दिला होता. ते समयीं तुम्हींही विनंति केली होती, तेव्हां आज्ञा केली कीं, जो एकनिष्ठ धरून स्वामी सेवेशीं येईल, गडकोट गनिमानें घेतले ते हस्तगत करून घेईल, त्यास इसाफतीचें गांव, वतन असेल त्याप्रमाणें आणून, तेणेंप्रमाणें चालविणें.’ ‘ जो कोण्ही वतनदार एकनिष्ठा धरून येईल, गडकोट

घेऊन देईल त्यांस इसाफती व वतनभाग चालीला असेल तेणेप्रमाणें मजुरा असे.' मावळ विभागाची स्थिति कशी शोचनीय झाली होती, ह्याचेंहि वर्णन पुढीलप्रमाणें केलेलें आढळतें. 'मोगलाची धामधूम आपल्या राज्यांत आजी ३० वर्षें होत आहे. ह्यामुळें मुलुख वैराण जाला, त्यांस सालगुदस्ता मोगलांस रायगड कबज जाला, मुलुखांत मोगलाईचा अंमल चालीला.' 'हल्लीं श्रीकृपेनें आपल्या राज्याचा मामला थाटत चालला' 'सांप्रत गनिमाचें धामधुमेंकरतां व दुकाळाकरतां रयतीं गेलीं, मेली, जुजबी राहीलीं. त्यांस खावयांस व राहावयांस नाहीं. ये जातीचा रयतीचा इचार जाला आहे. रयतीचा बहुत-वजा (?) दिलासा करून, किर्दी मामुली करून, साहेबाच्या किलेकोटाशीं मदतीं करावी लागती.' वतनदारांना आपले हक्क कसे पाहिजे होते, तेंहि त्यांनीं छत्रपतींना सांगितलें. 'आपल्या वतनाचा हक्क–लाजीमा इनाम व इसाफतीचा गांव कारकीर्दी आदीलशाहपावेतों चालत होतें. त्यावरी साहेबाचें (शिवाजीमहाराजांचे) कारकीर्दींत बटाईचा तह जाला. त्यामुळें आपलें इसाफतीचा × × चा राजभाग गल्ला दिवाणांत होऊनु हक्काची मोहीन नक्त व × × करून दिली. तेणेकरून आपली हैरानगी जाहलीं. अन्नवस्त्राची तेही विपति जाहली.' ह्या सर्वांचा विचार करून व काळावर दृष्टि देऊन वतनदारांचें सर्व मागणें मान्य केलें; व त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांची पुनश्च वतनावर स्थापना केली व बरेच दिवस चालत आलेला लढा एकदांचा मिटविला. ह्याहि पुढें मजल मारून कत्यों वतनदारांना लष्करांत 'सेनासप्तसहस्त्रीं' 'पदांती सहस्त्रीं' वगैरे जागा देऊन त्यांचा जमाव कामाला लावीलो. त्या वेळीं घोड्याला रतीब

च राउताला रोजमुरा सरकारांतून देण्याची जशी व्यवस्था होती तीच व्यवस्था वतनदाराच्या बाबतीतहि कायम केली.

अशा रीतीनें व्यवस्था करून वतनदारांचें व रयतेचें भावी लढ्याकरतां सहाय्य मिळविलें. त्याचा भरपूर उपयोग झाला. हीं सर्व व्यवस्था श. १६१२ च्या प्रारंभीं झाली. ह्या बाबतींत शि.च.सा. खं. ६म.इ. सा. खं. १७ वगैरे भरपूर पुरावा देतात. हा सर्व मावळांतील वतनदारांचा जमाव धनाजी जाधव ह्यांच्या दिमतीस दिला होता. पुढील अस्सल पत्रांतील उतारा देऊन हें प्रकरण संपवूं. रामचंद्र नीळकंठ मुठे खोऱ्यांतील मारणे देशमुखांस लिहितो. श. १६१२ वैशाख शु. ८ (इ. स. १६९० मे ६) 'तरी तुम्हीं मा॥ निल्हेच्या (माहादाजी शामराज ह्याच्या) भेटींस येणें. देशांस कौलबोल हें देतील त्याप्रमाणें देशाची मामुरी करणें, कदीम लोक सेवेचें आहेत, तें कुल जमाव सुभेदार मा॥ निल्हे ह्या जवळीं पाठवून देणें, त्याखेरीज तुम्हीं जमाव नवा करून मा॥ निल्हे ह्या जवळीं पाठवून देणें, त्याखेरीज तुम्हीं जमाव नवा करून मा॥ निल्हे जवळीं राहणें.पोखतीया जमावानशीं स्वारी शिकारी करून जें गड गनीमानें घेतलें आहेत, तें फिरोन हस्तगत करणें. गनीमाची ठाणीं जागा जागां आहेत, तें फिरोन हस्तगत करणें. गनीमाची ठाणीं जागा-जागां आहेत तें मारून काढणें. पूर्वींपासून ह्या राजाशीं पोटागी धरीत होतेंस त्याप्रमाणें वर्तणूक करणें. (शि. च. सा. खं. ६ ले. ११३ पृ. ७०)

मराठे सरदार स्वराज्याला येऊन मिळतात—

राजाराम कर्नाटकांत गेल्यावर थोडेच दिवसांत 'कार्तिक मासीं रायगड सला करून मार्गशीर्ष २ रविवारीं रायगड मोगलांस

दिला. संभाजी राजे ह्यांचें पुत्र शिवाजीराजे यांस तुळापुरांत औरंगजेबापाशीं नेलें. पादशाहे त्यांस 'हफ्तहजारी' केलें. शाहूराजे नांव ठेवलें. तें वर्षीं कुलगड मोगलें घेतलें.' (जे. श.) रायगड ताब्यांत घेतला, तेव्हां राजघराण्यांतील खाशाप्रमाणेंच कित्येक कर्ते पुरुष व त्यांचे कबिले पकडले गेले. त्यांपैकीं कांहीं शाहूबरोबर कैदेंत ठेवले, कांहींची कत्तल केली व बाकीचे बाटवून मुसलमान केले. कौल दिला असतांही हा असा विश्वासघातकी प्रकार घडला, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. संभाजीमहाराजांच्या वधाप्रमाणेंच रायगडची ही कत्तल महाराष्ट्र चेतविण्यास व बादशहाचे पदरचे मराठे सरदार फोडण्यास उपयोगी पडली. स्वार्थांध वतनदार व पोटार्थी भाडोत्री सरदार व सैनिक जे मोगलांस जाऊन मिळाले होते व त्यांच्या मूळापासून नौकरींत होते, त्यांना औरंगजेबी विश्वासघात व त्याचा अंतस्थ डाव रायगडावरील कत्तलीनें चांगलाच उमगला आणि ते केवळ सर्व महाराष्ट्रीयांचें एकमेव आश्रयस्थान जें स्वराज्य, तें वांचविण्याकरितां रामचंद्रपंताकडे भराभर येऊं लागले.

लढ्याला सुरवात—

संभाजीच्या वधानंतर नऊ महिन्यांचे आंत महाराष्ट्रांतील 'कुलगड मोगलीं घेतलें. (श. १६११ मार्गशीर्ष) वाई परगण्याची तत्कालीन परिस्थितीचें वर्णन शि. च. सा. खं. ६ पृ. ७० वर पहावयास मिळतें. तें असें, 'अखेर क॥ (कारकीर्द संभाजी राजे) राज्य बुडालें. मोंगलांनीं कबज करून गड, वाई देशीचें घेतलें. कमलगड १ पांडोगड १ वंदनगड १ मनमोहनगड म्हणजे केळंजा १ चंदन १.'

‘ गैरकबजी इमान राखून जागा राखीला. १ कल्याणगड १ वर्धनगड.’

४५...‘राजेश्री राजाराम कर्नाटकांत जाऊन प्रकट होऊन लष्कर जमाव केला, व या प्रांती राजेश्री रामचंद्र पडित व शंकराजी पंडित सरकारकून व संताजी घोरपडे व धनाजी जाधवराव ह्यांनीं लस्कर जमा करून चाळीस हजार शाई मेळविली. गडकोट मुलुख सोडविला. नवेच राज्य पैदा केलें.’ कर्नाटकांतूनही राजारामसाहेब महाराष्ट्रांतील कार्यकर्त्यांना उत्तेजन देऊन फौजेची व खजिन्याची कशी मदत करीत होते, हें पुढील अस्सल पत्रांत पहावयास मिळतें. हें पत्र श. १६१२ चैत्र वद्य ८ चें असून तें मोगलाला सोडून पुनश्च स्वराज्यांत आलेल्या सुप्रसिद्ध बाजी सर्जाराव जेध्यांस लिहिलें आहे. यांतील राजाज्ञा अशी, ‘ ऐशीयांसीं हें मऱ्हाट राज आहे. तुम्हीं लोक ह्या राज्याची पोटतिडीक धरीतां, तरी तें प्रांतें कितेक राजकारणे आहे, तें चालना करून आपण जमाव करून सावधानपणें राहोन स्वामी कार्य जें दृष्टीस पडेल, तें मनांस आणून हस्तगत करून ठेवणें. हुजूर लेहोन पाठविणें. तेणेप्रमाणें विल्हे केली जाईल. ’ ‘ या प्रांतीचें वर्तमान तरी, राजश्री छत्रपतीस्वामी स्वारी करून कर्नाटक प्रांते गेलियावरी तिकडे जमाव लस्कर चाळीस हजार व हशम एक लाख पंचवीस हजार जमाव जाला आहे. पुढेही आणखी जमाव होतच आहे. तें प्रांतीं कुल पुड पालेगार तमाम एकत्र भेटले आहेती. जमेती पोक्ती जाली आहे ’

‘तूर्त पुढें राजश्री केसो त्रिमळ या प्रांतें रवाना केलें आहेती, तो त्यांना....संगितात स्वार पंधरा हजार व हशम पंचवीस हजार देऊन रवाना केलें आहेती, तेही कादळ प्रांतीं तुंगभद्रेच्या तीरांस

आलें आहे. खजिनाही एक लाख होनू या बराबरी आहे.' 'त्यांस आणावयांस राजश्री धनाजी जाधव व संताजी घोरपडे सेनापंचसहस्त्रीं पाठविले आहेती. तेही आठा पंधरा दिवसीं येतील.' 'तें आलियावरी तो जमाव व हुजूरचा जमाव ऐसे करून त्या प्रांते स्वारी होईल.' याच पत्रांत मोंगलांस खडे चारण्यास निघालेल्या मराठ्यांचा आत्मविश्वास कसा दांडगा होता, याची कल्पना देणारें गमक पहावयांस मिळतें. तसेंच, औरंगजेबाच्या धर्मवेडानें त्याच्या लष्करांस गळती लागून तो प्रवाह शिवशाहीकडे कसा वळला होता, याची स्पष्टता होते. 'गनिमाचा हिसाब काय आहे. तुम्हीं लोक जेव्हां मनावरी धरितां, तेव्हां गनिम तो काय आहे. गनिमांस तुम्हीं लोकीं केला आहे, तें तुम्हींच लोक या राज्याची पोटतिडीक धरितां, तेव्हां अवरंगजेबाचा हिसाब धरीत नाहीं. ऐसे बरें समजोन लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें' 'औरंगजेबानें मऱ्हाटे लोक आहेती, त्यांस मुसलमान करावे ऐसे केलें आहे. त्यापैकीं मुसलमान केलें. म॥ नेताजी राजे व साबाजी घाटगे व जानोजी राजे व कितेक ब्राह्मणही ए प्रांतीचें बाटविलें. पुढेही तळवा (?) गेला आहेती' याचा परिणाम 'तिकडून तमाम मऱ्हाटे लोक होतें, तें आपला जमावानिसी आम्हांकडे एताती हाली रा॥ हणमंतराव निंबाळकर व सटवोजी निंबाळकर बाजे सरदार आलें आहेती. पुढेही कितेक एताती. ऐसे गनिमाचें लस्कर उठोन जमाव होत आहे.' अशा स्थितींतहीं 'परंतु येथें पाहिजे अधिष्ठान ईश्वराचें, ऽ' हा आमचा सात्त्विक स्वभावधर्म सुटला नाहीं. 'ईश्वर करितो, तरी फत्तेच आहे.' 'हिमती धरणें.' [म. इ. सा. खं. १५ ले. ३४७]

मावळ, वाई देश व कोंकण सोडवितात

कर्नाटकची मदत येतांच सचिव, राजाज्ञा, घोरपडे व जाधव ह्यांनीं जोराच्या हालचाली सुरू केल्या. प्रतापगड, रोहिडा ऊर्फ विचित्रगड, वाई देशांतील कित्येक गड, खुद्द वाईचा कोट इत्यादि हस्तगत केलें. राजाज्ञा, सचिव, जाधव व घोरपडे एकत्र होऊन त्यांनीं ही मोहीम हातीं घेतली. श. १६१२ च्या चैत्राच्या शेवटीं वाईकडे ही मंडळी वळली. मोहीम सुरू करण्यापूर्वी खंडभट शालिग्राम पुणेकर यांजकडून सुमुहूर्त घेऊन मोहीम सुरू करण्यांत आली. रामचंद्रपंत श. १६१२ वै. शु॥ ८ (इ. स. १६९० मे ६) चे पत्रांत ' आम्हीं स्वारी करून वाईस आलों. वाईचा कोट रगडून घेतला. प्रतापगड आदिकरून किल्ले हस्तगत केलें.' (म. इ. सा. खं. मारणे देशमुख मुठे खोरे) याचा विस्तार वाईचा देशमुख दत्ताजी केशवजी पिसाळ करतों—' तो वाईचें ठाणें राजेश्री रामचंद्रपंडित अमात्य व राजश्री शंकराजी पंडित सचीव व संताजी घोरपडे व जाधवराव यानीं येऊन मारून काढिलें. खिजमत तलबखान हस्तगत केला. त्याबराबरी आपणही सांपडलो ....' ' साताऱ्याचें मुक्कामीं रामचंद्रपंत व शंकराजीपंत यापाशीं जाऊन उभा राहिलों' [स. प. पृ १९७–९८] लेखकानें प्रसंगानंतर म्हणजे ज्या वेळीं शंकराजीपंत 'सचिव' व रामचंद्रपंत ' अमात्य ' झाले, त्या वेळीं हें सांगितलें असल्यानें, त्यांत शंकराजीपंतांस ' सचिव ' व रामचंद्रपंतांस ' अमात्य ' म्हणणें क्षम्य समजलें पाहिजे. प्रतापगडाबरोबर इतर वाई देशाचे किल्ले याच वेळीं घेतले. यानंतर ही मंडळी कोंकणांत उतरून संगमेश्वरीं बसलेला शेख निजाम याचा पराभव करून त्यास उधळून लाविलें. संभाजी-

महाराजांस पकडणारा शेख निजाम तो हाच. यापुढें सातारा किल्ल्यास वेढा देऊन बसलेल्या सर्जाखानाची पाळी आली ! त्यालाही चांगली सजा पोहोंचविली. ' श. १६१२ वैशाख वद्य १२ सातारा यांस सर्जाखानें वेढा घातला होता. त्यावरीं रामचंद्र पंडित सचिव व रा।। शंकराजी पंडित राजाज्ञा व संताजी घोरपडा व धनाजी जाधव जाऊन लढाई करून चारहजार घोडीं व हत्ती आठ पाडाव जालें. सर्जाखान पाडाव जाला लाख रुपया घेतला, आणि सोडिला. प्रतापगड व वाई प्रांतीचें किले रोहीडा, राजगड, तोरणा हें किले राजेश्री रामचंद्र पंडित व शंकराजीपंत याणीं घेतलें. ' (जे. श.) या नोंदींत मागलें पुढें व पुढलें मागें झालें आहे. हें चाणाक्ष वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल.

सुमुहूर्त काढून देणाऱ्या खंडभट शाळिग्रामाच्या वर्षासनाची वाढ केली. ती अशी. वर्षासन वाढ ला जीं कारणें झालीं, तीं प्रथम दिलीं आहेत. मजकूर दुबार होत असला, तरी जे. श. चें प्रामाण्य सिद्ध करण्याकरितां त्याचा आम्हीं उद्धार करीत आहों. पत्र सु।। ईहीदे तिसैन अल्फ श. १६१२–१३ इ. १६९०–९१ मधील आहे. पत्र लेखक छत्रपती व ज्यांस लिहिलें तें ' खंडभट शाळिग्राम आश्रित राजमंडळ ' 'वेदमूर्ति बहुत थोर योग्य आहेत. यासीं पहिलें वर्षासन एकशें होन करून ठेविलें. ऐसियांस साल गुदस्ता (तिसैन अलफ श. १६११–१२ इ. १६८९–९०) शेख निजामानें ठाणें संगमेश्वरीं घातलें होतें व सर्जाखान सातारियांस वेढा घालून बैसला होता, त्याला मारून काढावें हा विचार केला. यावरी वेदमूर्तीनें सुमुहूत दिल्हा. त्या मुहुर्तेच राजश्री पंतसचिव (रामचंद्रपंत) जमावानिशीं स्वार होऊन संगमेश्वरीच्या ठाणियावरी गेलें. तेथें युद्ध प्रसंग करून गनीम पराभवातें पावविला.'

'तैसेच, सातारियांस सर्जाखानावरी लष्करनिशीं गेलें. तेथेही युद्धप्रसंग करून सर्जाखान अगदीं कबिल्यादेखील पाडाव केला त्यामुळें कुल मुलुख व कितेक गडकोट हस्तगत जालें.'

भालेराई

सत्तांतर होतांना प्रत्येक देशाला कांहीं काल हालांत दिवस काढावे लागतात. ते दिवस कसे भीषण असतात, हें तूर्त आपण अनुभवीत आहोंतच. तोच प्रकार संभाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रांतील मावळांत व कोंकणांत जन्माला आला. वतनदार व त्यांच्या कच्छपीं असलेली रयत मोगलांत विलीन झाली. कांहीं सरदार आपापल्या जमावानिशीं मोंगलांचे चाकर झाले व कांहीं सरदारांनीं स्वतंत्र बंडाचा झेंडा उभारला. अशा रीतीनें झालेली तिरडाफाक मोडून सर्वांनीं एकजुटीनें औरंगजेबाशीं झगडणें जरूर होतें. संभाजीराजाचा एक अत्यंत पराक्रमी सरदार रुपाजी भोंसले नांवाचा होता. (पृ.१४पहा) संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर रुपाजी मराठ-मंडळांत न रहातां त्यानें स्वतंत्रच बंड उभारलें. या बंडालाच 'भालेराई' असें म्हणतात. ही भालेराई शाहूमहाराजांचे आगमनापर्यंत पुरून उरली. या भालेराईची माहिती इ. सं कै. कृष्णाजी विष्णु आचार्य यांनीं इ. स. १९०० सालीं 'भारतवर्ष' मासिकांत दिली आहे ती अशी—

[संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर व राजाराम महाराजांनीं राज्याची स्थिरस्थावर करण्याचें संधिकाळांत]

" परंतु इतकें सर्व घडेपर्यंत मध्यंतरीं जी बेडाळी झाली, त्या धांदलींत, मराठे लोकांच्या पुष्कळ स्वतंत्र टोळ्या बनल्या व त्यांनीं मुसलमानांचीं ठाणीं उडविण्याचा निरनिराळा स्वतंत्र यत्न केला. हे लोक मुसलमानांशीं लढत खरे, परंतु त्यांस पोशिंदा व नियंता कोणी नसल्यामुळें निर्वाहाकरितां हे गांवेंच्या गांवें लुटून फस्त करीत. त्या योगानें लोक फार हैराण झाले. मुसलमानांनीं व मराठ्यांनीं मुलूख लुटावा व जाळपोळ करावी, असा सपाटा चालला. ' बळी तो कान पिळी ' अशी अवस्था झाली. कित्येकांनीं आपल्या भाऊबंदांची बायकामुलांसुद्धां कत्तल करून आपण त्यांचीं वतनें बळकाविलीं. या दंग्यास भालेराई असें म्हणतात. कारण, संभाजीस मारून औरंगजेबानें शाहूस कैद करून नेल्यावर, रुपाजी व बाबाजी या नांवाचे दोन सरदार होते; ते त्या दंग्याचे उत्पादक व पुढारी होते ह्यांचें उपनांव भोंसले असें होतें, परंतु शिवाजीराजानें, हे भाला मारण्याचे कामीं मोठे पटाईत असल्यामुळें, ह्यांना भालेराव अशी पदवी दिली होती. ह्यांनीं महाराष्ट्रांत कोठेंही मुसलमानांचीं कायमचीं ठाणीं बसूं दिलीं नाहीत. हा ह्या दंग्याचा मोठा उपयोग झाला. ह्या वेळेपासून ' भालेराई ' हा शब्द अंदाधुंदी ह्या अर्थी वापरतात." [भारतवर्ष जुन्या ऐतिहासिक गोष्टी]

नवीन संशोधनानें कै. आचार्यांचें प्रतिपादन बरेंच स्पष्ट होत आहे. ' संभाजी राजे यांस औरंगजेबानें धरून नेलें .... त्यामागोन प्रांतांस व गडकोटांस कोणाचा आश्रय नाहीं. भालेराई पुंडावे जाहलें. ' [चौल अधिकारी, रामदास रामदासी ले. ६६]

'आईसाहेब (ताराबाई) राज्य करीत होती. ते समयीं भालेराई जाहली. रुपाजी भालेराव ह्यागीं मुल्ख संचणीचे लोक मेलवून मुल्ख मारूं लागले. त्या दिवसापासून प्रा। मजकूर वोस जाहला. त्यावर बहुत दिवस वोस होता. त्यांवर श्रीमंत महाराज शाहू छत्रपती स्वदेशीं आले.' [रामदास आणि रामदासी वर्ष ११ अंक १२१ कोंढवी परगण्याचा करिना]. हे उल्लेख कै. आचार्यांच्या लिहिण्यानंतर उजेडांत आले असून ते त्यांच्या लिहिण्याला चांगलीच बळकटी आणतात. भालेराईच्या जनकाभोंवतीं मुलुखाची संचणी करणारे, म्हणजे शेतकरी, होते; ही स्पष्टता चिंतनीय आहे. रुपाजी भोंसले मोठा सरदार असतां तो मराठमंडळांतून फुटून बाहेर पडून बंडखोर कां झाला, याचें निश्चित उत्तर मिळण्यास जादा संशोधनाची जरूरी आहे आणि तेही कोंकणांत झालें पाहिजे. एवंच, भालेराई म्हणजे गुंडशाहीच. ही मोंगलांच्या धामधुमीप्रमाणेंच दीर्घकाळ टिकली व तिचा बींमोड करण्यास शंकराजी नारायणांस आपली शक्ति वेंचावी लागली. कारण त्यांच्या जिल्ह्यांतहि ती ठाण मांडून बसली होती.

संभाजीमहाराजांचा वध
व
राजारामाचें मंचकारोहण

खऱ्या कर्तृत्वास प्रारंभ

शंकराजी नारायणाच्या खऱ्या कर्तृत्वांस प्रारंभ शके १६११ च्या फाल्गुनांत (इ. स. १६८९ मार्च) संभाजीमहाराजांचा

औरंगजेबानें खुनशीपणानें जो अमानुष वध केला, त्यापासूनच होतो. सोन्याचें सोनेपण तावूनसुलाखूनच खरें प्रत्ययास येतें. तोच प्रकार मनुष्याची लायकी, नालायकी सिद्ध होण्यास व्हावा लागतो. संकटकालींच मनुष्याची खरी परीक्षा होते या पुरुषाच्या बाबतींतही तसेंच झालें. राजसत्ताक राज्यें, शत्रूनें गादीवरील राजा संपविला, कीं संपतात, असें सर्वत्र पहावयास मिळतें. या औरंगजेबाच्या स्वारींतही तसेंच नाहीं कां घडलें ? विजापूरची आदिलशाही ही औरंगजेबानें तीवरील राजा ताब्यांत घेतांच खलास झाली ना ? मग, संभाजी महाराज औरंगजेबाच्या ताब्यांत गेल्यावर—नव्हे त्यांचा त्यानें साक्षात् वध केल्यावर—शिवशाही जिवंत राहणें शक्य होतें काय ? अर्थात्, संभाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर शिवशाही संपलीच असें मोंगलांनीं समजणें व त्यांनीं त्याच्या वधानंतर तिच्या उत्तरक्रियेस सुरुवात करणें क्रमप्राप्तच होतें. पण, येथें वरवर पाहिल्यामुळें चुकलें आणि औरंगजेबाचा संभाजीला मारून सर्व दक्षिण मोंगली साम्राज्यांत सामील केल्याचा आनंद अस्थानीं ठरला.

भोळ्या बादशहा ! मोंगलाईसारखी शिवशाही हीं कांहीं राजाची वैयक्तिक दौलत नव्हती. ती सर्व महाराष्ट्रानें स्वधर्मसंरक्षणाच्या मजबूत व पवित्र पायावर उभारलेली अजिंक्य—यापूर्वी अखिल भारतवर्षांत कोठेंही जन्म न घेतलेली—पोलादी इमारत होती, हें तुझ्या कसें लक्षांत आलें नाहीं ? तुला शिवशाही म्हणजे काय चीज आहे, हें अद्याप कळायचें आहे ! दम धर ! तूं एक धर्मवीर संभाजी यास बळी घेऊन सर्व महाराष्ट्र स्वधर्माकरितां फकिरी पत्करून जिवाची कुरवंडी करण्यास प्रवृत्त केलास, हें लवकरच तुझ्या ध्यानांत येईल !

संभाजीमहाराज गाफील असतां त्यांस माघ वद्य ७ स कोंकणांत संगमेश्वरीं मोंगलांचा सरदार शेख निजाम ह्यानें धरलें. " श. १६१० माघ वद्य ७ शुक्रवारीं संभाजी राजे व कवि कलश रायगडास जावयास संगमेश्वरास आलें असतां, सेख निजाम दौड करून येऊन उभयतांस जिवंतच धरून नेलें. वरकड लोक रायगडास गेले. (जे. श.) " अशा वेळीं इतरत्र राजसत्ताक राज्यपद्धतींत सामान्यतः जें औदासिन्याचें वातावरण निर्माण होतें, तसा घबराट शिवशाहींत मात्र झाला नाहीं. आतां, आम्ही यामागें व पुढें शिवशाही हा शब्दप्रयोग कोणत्या काळाला अनुलक्षून केला आहे, हें चालकांनीं ताडलें असेलच. असो. शिवशाहीच्या चालकांनीं हें " देवा-ब्राह्मणांचें राज्य " ' महाराष्ट्र राज्य ' म्हणून स्थापन केलें व चालवून दाखविलें. शिवशाहीच्या स्थापकास त्याच्या गुरूची त्यांना, ' तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करून, धर्मस्थापना, देवब्राह्मणाची सेवा, प्रजेची पीडा दूर करून पालनरक्षण करावें, हें वृत्त संपादून त्यांत परमार्थ करावा. ' [स. प. समर्थ सनद] अशी आज्ञा होती.

संभाजी राजे छत्रपति झाल्यावर हें शिवशाहीचें उज्ज्वल स्वरूप मागें पडलें, असें झालें नाहीं. तेही वडिलांच्या पावलांवर पावलें टाकूनच चालले. त्यांनीं प्रसंगोपात उग्र स्वरूप दाखविलें, तें आपल्या प्रजेला नसून दरबारला दाखविलें हें ध्यानांत धरलें पाहिजे. कवि कलशाच्या नादानें दरबारी झालेली उलथापालथ या वेळीं सर्व विसरून जाऊन अद्यावत् शिवशाही दरबार सूडाच्या भावनेनें प्रदीप्त झाला. त्यानें आपसांतील किरकोळ मतभेद विसरून औरंगजेबाचें आव्हान स्वीकारलें व सक्त प्रतिकाराची

तयारी जोरानें चालविली. छत्रपति संभाजीमहाराज कैद होतांच पंधरा दिवसांच्या आंत विस्कळीत झालेला मराठी दरबार एकदम सांवरला. सरकारकून व सेनासमुदाय एकदिल झाला. ' श॥ १६१० फाल्गुण शुद्ध ३ स राजारामांस रायगडचा किल्लेदार चांगोजी काटकर व एसाजी कंक यांनीं माघ वद्य ३० आदबखाना काढून बाहेर आणून मंचकी बैसविलें. मानाजी मोरे व वरकड सरकारकून धरीलें होतें, तें सोडीलें. ज्याचें कार्यभाग त्यांसी देऊन राजाराम राज्य करूं लागलें (जे. श.) ' ' राजाराम यांस संभाजीनें रायगडी ठेवला होता. त्यांस संभाजी मयत झाल्यावर जनार्दनपंत (?) हणमंते व महादजी नाईक पाणसंबळ व सुलतानजी घोरपडे व धनाजी जाधव ह्याणीं राजाराम ह्यांस धनी केला आणि प्रल्हाद निराजी ह्याणीं धान्याचा, द्रव्याचा, शिबंदीचा बंदोबस्त शिवाजीप्रमाणें चालविला. शत्रूची बातमी राखून राजाराम ह्यानीं रायगडापासून विशालगडापर्यंत राहण्याची तजवीज करून कुटुंब विशाळगडांस ठेविलें व आपणहि राहीलें. तेथें कोट व पागा १२००० घोडा राहावयाजोगी बांधून, छावणी विशाळगडावर होती.' [पंत प्र. ब. पृ. ३०–३१] हें पाहून बादशहा फारच चिडला व कांहीं तरी निमित्त ठेवून त्यानें ' फाल्गुन वद्य ३० औरंगजेबे तुळापुरीं संभाजीराजे व कवि कलश यांस जीवें मारून शिरच्छेद केलें. ' (जे. श.) राजा कैद केल्यामुळें महाराष्ट्रीयांचा प्रदीप्त झालेला सूडाग्नि ह्या आघातानें शांत होईल हा औरंगजेबाचा आतांपर्यंतच्या अनुभवानें दृढ झालेला भोळाभाबडा कयास खोटा ठरला व संभाजीचा वध हें तैलसिंचन ठरून मराठ्यांचा सूडाग्नि उलट प्रखरतर झाला. तो इतका कीं, त्यांतच शेवटीं

खुद्द बादशहा व त्याचें मोंगली साम्राज्य कसें होरपळून निघालें, ह्याचा सामान्य उद्‌बोधक इतिहास पुढें येतच आहे.

राजारामाचें कर्नाटकांत गमन

फाल्गुन शुद्ध ३ स राजारामानें मराठी राज्याचीं सूत्रें हातीं घेतलीं, तेव्हां एकंदर परिस्थिति अत्यंत गंभीर होती. सर्व शिवशाही मोंगली फौजेनें आंतून बाहेरून ग्रासली होती. 'तरतेंबुडतें' पाहणारे महाराष्ट्रीय वतनदार बादशहास जाऊन मिळाले होते. अशा स्थितींत सर्वांपुढें 'आतां पुढें काय ?' हा प्रश्न दत्त म्हणून उभा राहणें साहजिक होतें. या वेळीं बहुतेक सरकारकून व इतर कार्यकर्ते रायगडावर जमा झाले व त्यांनीं एकंदर परिस्थितीचा आढावा घेऊन विचार चालविला. कोणीं सामाचा मार्ग सुचविला, तर कोणीं दंडाचा अवलंब करावा म्हणून प्रतिपादिलें; पण जेते मोंगल सामाला पुढें हात करणें शक्य नव्हतें, आणि भयंकर दुखावलेले मराठे ह्या भ्याड राजनीतीला बिनविरोध कवटाळणारे नव्हते. दंडाचा मार्ग कठिणतर असल्यानें तो मोंगलांची शक्ति हीन करण्यास ह्या वेळीं समर्थ नव्हता. राहतां राहिला भेद. पण हें औषध अत्यवस्थ स्थितींतील शिवशाहीस त्वरित गुणावह होण्यांस समर्थ कसें असणार ? त्याचा प्रयोग करण्यास योग्य संधीचीच आवश्यकता होती. तेव्हां या वेळीं प्रत्येक राजनीतीचें संमिश्रण जींत झालें आहे, अशीच राजनीति उपयोगांत आणणें जरूर होतें.

अशा वाटाघाटी चालत आहेत, तोंच 'श. १६११ चैत्र शु॥ १५ औरंगजेबें जुलफुकार खानांस पाठवून रायगडांस वेढा घातला' त्यामुळें बहुतेक कर्ते सरकारकून, राजारामसाहेब आणि

संभाजीमहाराजांची स्त्री येसूबाई व तिचा अल्पवयी पुत्र शिवाजी हे अडकले गेले. हा शिवाजी म्हणजेच (पुढें प्रसिद्धीस आलेले) छत्रपति शाहूमहाराज होत. ह्यांचा जन्म 'श. १६०४ वैशाख वद्य ७ स गुरुवारीं संभाजीराजे ह्यांसीं पुत्र जाला. शिवाजी नांव ठेविलें. (जे. श.) ' म्हणजे संभाजीमहाराजांच्या मृत्युसमयीं या दुसऱ्या शिवाजीचें वय केवळ ६ वर्षांचें होतें. वास्तविक संभाजी-महाराजांच्या मृत्यूनंतर तोच राज्याचा खरा मालक होता; पण, एकंदर परिस्थितीचा विचार करून मराठमंडळानें मा. येसूबाईच्या आज्ञेनें तूर्तातूर्त राजारामास राज्याचें धनी केलें. 'येसूबाईच्या विद्यमानें सरदारांनीं मसलत ठरविली कीं, शिवाजी प्रौढ होईपर्यंत राजाराम धनी करावा व शत्रूस बातमी न लागण्यास्तव महाराजांनीं (राजारामानें) एक ठिकाणीं न राहतां रायगडापासून विशाळ-गडापर्यंत किल्ल्यांत चाळूनपाळून राहावें.'

या योजनेप्रमाणें चैत्र वद्य १० शुक्रवारीं राजाराम (रायगडाहून) पळून प्रतापगडास गेले. शेवटीं फिरत फिरत ते या सालींच पन्हाळ्यास आले. तेथेंच त्यांनीं नवरात्र व विजयादशमी साजरी केली. राजारामाच्या हालचाली मोंगल डोळ्यांत तेल घालून पहात होते. तो पन्हाळ्यास आहे अशी बातमी मिळतांच मोठ्या शिताफीनें मोंगलांनीं पन्हाळ्यास वेढा दिला व हा पोपट पिंजऱ्यांत सांपडला गेला. या वेळीं त्याबरोबर प्रल्हाद निराजी, निळोपंत पेशवे, बहिर्जी घोरपडे, महादजी नाईक पाणसंबळ वगैरे राज्य-कारी धुरंधर पुरुषहि होते. पुनश्च 'आतां पुढें काय ?' या प्रश्नानें सर्वांना ग्रासलें. कांहीं शूरांनीं येथेंहि राजनीतीचे निर-निराळे मार्ग सुचविले. शेवटीं, प्रल्हाद निराजीनें निर्णय दिला तो असा:—

'हे राजेंद्र! हा समय आपल्याला विपरीत व शत्रूला अनुकूल असा दिसतो; त्यामुळें मला युद्ध करणें आवडत नाहीं.' 'त्याचप्रमाणें पूर्व वैरामुळें शत्रूच्या नाशार्थ सर्व सामादि उपाय आम्हांस पसंत नाहीं' ह्याकरतां 'अमात्य नीलकंठाचा रामचंद्र ह्याच्यावर आपला राज्यकारभार सोंपवून आपण कांहीं निवडक लोकांनिशीं सत्वर कर्नाटकास जावें आणि निरलसपणें स्वराज्यरक्षणाचा प्रयत्न करावा.' [केशव पंडितकृत राजाराम-चरित्र पृ. ५४–५५] ही मसलत राजारामास पसंत पडून त्यानें 'आश्विन वद्य ८ गुरुवारीं राजाराम पन्हाळियाहून स्वार झाले' व त्यांनीं कर्नाटकचा रस्ता सुधारला. बरोबर कांहीं निवडक फौजहि होती हें पलायन अर्थात् वेढा फोडून झालें, यांत शंका नाहीं. त्याबरोबर प्रल्हाद निराजी, निळकंठ मोरेश्वर पेशवे, त्याचा भाऊ बहिरो मोरेश्वर, खंडोबल्लाळ चिटणीस, सेनापति महादजी न।। पानसंबळ, बहिर्जी घोरपडे, कृष्णाजी अनंत, निळकंठ कृष्ण पारसनीस वगैरे राजकारणी पुरुष व सैनिक मिळून दोनशें माणूस असून त्यांचा प्रथमचा प्रवास घोड्यावरून चालला होता.

परंतु, राजाराम हा आपल्या हातचा निसटला ही खबर मोंगलांस मिळतांच, ते त्याचा पाठलाग करूं लागले. तेव्हां त्यांना थोपवून धरण्याकरितां सैनिकांना मागें ठेवून मुख्य मुख्य मंडळींनीं कापडी-यात्रेकरूच्या—वेषांत गुप्तरूपें कृष्णा ओलांडल्यानंतरचा प्रवास सुरू केला. त्यांना वाटेंत अनेक अडचणींना तोंड द्यावें लागलें. शेवटीं, ही मंडळी कार्तिक वद्य एकादशीस बेंगळूरास येऊन तेथून चंदीस—जिंजीस—आली. (जे. श.)

महाराष्ट्राची व्यवस्था

राजारामानें कर्नाटकांत जातांना मागें मोंगलांना मोकळें रान सोडलें नाहीं. त्यांना प्रतिकार करणारीं कर्तीं माणसें महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं विखुरलेलीं होतीं. रामचंद्र निलकंठ सचिव यांना सर्वाधिकारी केलें व त्यांच्या ताब्यांत शंकराजी नारायण राजाज्ञा दिले. या दोघांना सरलष्कर संताजी घोरपडे व सेनापंचसहस्री धनाजी जाधव ह्या सैन्याधिपतींनीं मदत करावी असें ठरविलें. पैकीं संताजी घोरपड्यांनीं रामचंद्रपंताकडे असावें व धनाजी जाधवानें शंकराजी नारायणाचा पाठपुरावा करावा. तसेंच, महाराष्ट्राचे दोन विभाग करून उत्तर विभाग शंकराजीकडे व दक्षिण विभाग रामचंद्रपंताकडे राज्यकारभाराकरितां व मोंगलांच्या ताब्यांत गेलेला मुलूख सोडविण्याकरितां दिला. या वांटणीचें केशव पंडित-विरचित शंकराजीचें वर्णन असें—

तुच्छीकृत्य तु तान्सर्वान्महाम्लेंच्छविनाशकः ।
नारायणसुते श्रीमच्छंकरे लोकशंकरे ॥११॥

राज्यैकदेशं निदधे कारीदुर्गसमाश्रयम् ।
रामचंद्रे तु सकलं राज्यं विन्यस्य गूढधीः ॥१२॥

तस्य हस्ते धनाजीकं संताजीकं च शंकरम् ।
अश्वसेनाधिपान् सर्वान् तथा पत्तिगणाधिपान् ॥१३॥

दत्त्वा समाहितमना गमनाय मतिं दधौ ।
द्विजाग्रेभ्यस्तदा दत्त्वा दानानि विविधानि च ॥१४॥

केशव पंडितकृत राजाराम-चरित्र
स्वर्ग ४ श्लोक ११-१२-१३-१४

अर्थ:—परंतु, त्या सर्वांना तुच्छ लेखून महान् म्लेंच्छाचाहि नाश करणारा तो (राजाराम) राजा लोककल्याण करणाऱ्या शंकराजी नारायणाकडे कारीगडाभोंवतालचा राज्याचा भाग सोंपवून व बाकी राहिलेलें राज्य त्या गूढबुद्धि राजानें रामचंद्र-पंताच्या तांब्यांत दिलें ११-१२ त्याच्या हाताखालीं संताजी, धनाजी, शंकराजी आणि घोडदळाचे सेनापतीहि दिले. सामाकडे लक्ष देऊन तो गमनाचा विचार करूं लागला.

महाराष्ट्राच्या लगत्यास असलेला भागानगर प्रांत प्रल्हाद निराजीच्या ताब्यांत दिला. ' भागानगर प्रांताचा राज्याधिपत्याचा कार्यभाग राजेश्री प्रल्हाद पंडित प्रतिनिधि ह्यांचे स्वाधीन करून त्या प्रांतांत रा॥ आनंद गंभीरराव सरसुभेदार यांस नामजाद पाठविलें आहे.' [शि. च. सा. खं. ४ ले ७२६ पृ. ७८-७९] या पत्रावर नक्की मिति घालतां येत नाहीं, हें मोठें वैगुण्य आहे; पण, हें प्रल्हादपंत प्रतिनिधि झाल्यानंतरचें असल्यानें, तें शके १६१२ आश्विनानंतर ठरेल. नीलकंठ मोरेश्वर पेशवे राजारामा-बरोबर गेल्यामुळें, त्याच्या ताब्यांतील प्रदेशाची देखरेखहि शंकराजीपंतांसच करावी लागली; ' त्यावरी मोगलाची धामधूम झाली, राजेश्री राजाराम चंदी प्रांतीं गेले. रा॥ शंकराजीपंत राजाज्ञा किले वसंतगडी होते. त्याजवळ नारो यादो जाऊन पेश-वाईची मुतालकी करून राहीले. त्यावरीऽ शंकराजीपंतांस सुरनिशीचें पद जाहलें.' [रा. खं. २० पृ. ३७९] राजमाचीच्या पश्चिमेचा कोंकण विभाग भाग आणि पूर्वेचा मावळ विभाग हे निळोपंत पेशव्याच्या ताब्यांत होते.

कर्नाटकांत गेल्यावर

कर्नाटकांतून राजारामसाहेबांना मराठी राज्याचीं सूत्रें हालविणें कां भाग पडलें, ह्याचा मागील प्रकरणांत विचार केलाच आहे. अजमासाप्रमाणें त्यांच्या मागोमाग मोंगली फौजा धांवत आल्या आणि महाराष्ट्र व कर्नाटक ह्या दोन्ही ठिकाणीं आघाड्या उघडल्या जाऊन युद्धास सुरुवात झाली. ह्यामुळें महाराष्ट्रांतहि मराठ्यांच्या हालचालींना भरती आली कर्नाटकांतील मराठी फौज कायम होतीच. तसेंच, राजाराम तिकडे गेल्यावर, हिंदु राजे— कर्नाटकांतील हिंदु राजे व पाळेगार ह्यांची मदतहि त्यांना भरपूर होत होती. तशांत, आतां गगनाला हात पोंचला, असें समजून औरंगजेबानें आपल्या आवडीचें मुसलमानी धर्मप्रचाराचें पोतडींतील अस्त्र बाहेर काढून तें मराठ्यांवर फेंकलें ! झालें ! सर्वत्र बाटवा-बाटवीला ऊत आला ! पण, ह्यामुळें त्याच्या पदरचे व इकडून गेलेले सरदारांचे खाडकन् डोळे उघडले व बादशहाचें खरें अंतरंग बाहेर पडल्यामुळें त्यांच्यांत चुळबूळ सुरू झाली. त्यांतील कित्येकांनीं ज्यांनीं ‘ देवाब्राह्मणाच्या ’ राज्याची अभिवृद्धि करावी, आपला नामोष करून घ्यावा, ह्या गोष्टीची उमेद धरली होती असे सरदार मराठ्यांना येऊन मिळूं लागले. वाईटांतून चांगलें निघतें म्हणतात, त्यांतला हा प्रकार झाला ! आतां मराठ्यांनीं–प्रामुख्यानें शंकराजी नारायणांनीं-गेलेले कोट किल्ले परत घेण्याकरितां जे उद्योग केले ते पाहूं.—

पुरंदर

कोंकणांतून व देशांतून मोंगल हुसकल्यानंतर मावळाकडे मराठ्यांनीं ढाला फिरविल्या. मावळांतील देशमुखांच्या मदतीनें

एक एक महत्त्वाच्या गडांचा ताबा घेण्याचा उद्योग हातीं घेतला. पुरंदरचे सनदी गडकरी कोळी, रामोशी व परवारी-महार हे होत. यांतील कोळ्यांचे प्रमुख नाईक रामजी नाईक चिव्हे, जनकोजी नाईक चिव्हे, सावजी नाईक ढगारे, तुकोजी नाईक काळकूड व खंडोजी मिसाळ यांनीं गड घेऊन देण्याचें कबूल केलें. या कामगिरीबद्दल कोळ्यांचे नाईकांनीं कांहीं मागणी केली, ती छत्रपतींनीं शफतपूर्वक मान्य केली. कोळ्यांची विनंति कीं, "साहेबाचे हुकमाप्रमाणें गड घेऊन देतच आहे; परंतु किल्ल्याचा घेरा आहे, तो उकरून खावयासीं साहेबीं मेहरबान होऊन दिल्हा, तरी खाईन. काम करून देतच आहो ' यावर छत्रपतींनीं तुम्हांस मेहबान होऊन कौल दिल्हा असे. तुम्हीं पुरंदरगड घेऊन देणें तुम्हां घेरा उकरून खावयाकारणें दिल्हा असे, यास अंतर होणार नाहीं. या गोष्टीस केदारपुरंदर या देवाची शफत असे अन्यथा होणार नाहीं याविसीं अभये असे ' (श. १६१२ मार्ग. वा। ७ इ. स. १६९० दिजे १२). परवां परवांपर्यंत पुरंदरचे कोळी सारा दोरा न देतां जमीन कशीत होते. यावरून या वेळीं करारा-प्रमाणें पुरंदर हस्तगत झालेला दिसतो. या कामीं जेधे देशमुखाची बरीच मदत झाली. (म. इ सा. खं. १५)

रोहिडागड ऊर्फ विचित्रगड

श. १६११ ज्येष्ठ वा। ८ (इ. स. १६८९ जून १) पूर्वींची गोष्ट. औरंगजेबाचा पुत्र अजमशहा यानें शिरवळचें ठाणें घेऊन तेथून मावळांतील किल्ले घेण्याचा उद्योग आरंभिला. या वेळीं मावळचे बहुतेक देशमुख मोंगलांस सामील झाले होते. त्यांत खोपडे व जेधेहि होते. खोपडे हे शिवशाहीचे कट्टे प्रतिस्पर्धी.

अफजल प्रसंगाचा खंडोजी खोपडा इतिहासज्ञांस माहितच आहे. या शहाजाद्यानें मावळांतील देशमुखांना रोहिडा ऊर्फ विचित्रगड घ्यावयाची कामगिरी सांगितली. त्या वेळीं बाळाजी नाईक खोपडे पुढें येऊन त्यानें किल्ला घेऊन देतों म्हणून कबूल करून ‘ किल्ल्याची पानें घेतली ’. सर्जेराव जेध्यानें ही कामगिरी कबूल केली नाहीं. सिधोजी जाधव गडचा हवालदार होता. खोपड्यानें गडास वेढा घातला. तेव्हां, जेध्यानें ‘ माणसें पाठवून सामान गला रातोरातीं आपले तरफेचा पाठविला ’ ही बातमी खोपड्यानें मोंगलांस कळविली. तेव्हां, शिरवळचा ठाणेदार ‘ वजीर अली सैद मजली यानें मावळांत स्वारी करून ’ जेध्याचीं गांवें मारलीं. या वेळीं सर्जेराव कारीस अत्यंत आजारी असल्यानें त्याचा मुलगा मताजी यांस ओलीस घेऊन त्यास खोपड्याचे स्वाधीन केलें. शेवटीं, नाइलाज होऊन हवालदारानें गड मोंगलांस नजर केला. गड हातीं आल्यावर सर्जेराव जेध्यांस मोंगलानें कैद करून पुण्याचे कोटांत पाठविलें. तेथें तो पुराच व्हावयाचा, परंतु त्यानें गडाच्या भिंतीवरून उडी टाकून पोबारा केला व जीव वांचविला. यानंतर मराठ्यांचा सरदार मोरोपंत यानें गड घेण्याचा उद्योग चालविला. तेव्हां, जेधे आपल्या जमावानिशीं त्यास सामील झाला. मराठ्यांनीं अशा रीतीनें हा गड घेतला. याप्रमाणें राजगडादि इतर किल्लेहि घेण्यांत जेध्याचा हात होताच. या एकंदर कामगिरीवर खुष होऊन छत्रपतींनीं त्यास ‘सेनापंचसहस्री’ केलें व त्यास धनाजी जाधवाच्या ‘ताबैन केले.’ (श. १६१२ म. इ. सा. खं. १५ ले. ३४५ व ३४६ आणि शि. च. सा. खं. ६ ले. ११२).

तोरणा ऊर्फ प्रचंडगड

रोहीडा घेण्याचे बाबतींत जसें जेध्याचें साहाय्य झालें, त्याप्रमाणें तोरणा लढवितांना त॥ कानदखोऱ्याचा देशमुख कान्होजी झुंजारराव मारणे हा उपयोगी पडला. ' आपण प्रचंडगडीचे बाबे खटपट करून गड हस्तगत करून दिल्हा. ' यानंतर यास मोंगलानें कैद केलें. पण, त्यानें मोठ्या शिताफीनें आपली सुटका करून घेतली. श. १६१२ आषाढ. अद्याप इतर गड सुटावयाचे होते. त्याबद्दल रामचंद्रपंत म्हणतात ' राजगड, सिंहगड हे किल्ले हस्तगत झाले पाहिजेत. तरी, एविशीहि खटपट तरतूद करून हस्तगत होये तें करणें आणि आपलें विशत्कारे गोमटे व मुजरा होय तें करून दाखविणें, ' (म. इ. सा. खं. १६ ले. २७) याप्रमाणें इतरहि गड घेतले. त्यासंबंधीं माहिती अद्याप उजेडांत यावयाची आहे. आहे त्यावरच भागवून घेतलें पाहिजे. असो.

राजाराममहाराज छत्रपतिपद धारण करतात

राजाराममहाराजांनीं मंचकारोहण करून राज्यकारभार चालविला हें आपण पाहिलेंच आहे. त्यांनीं छत्रपतिपद धारण केलेंच नाहीं अशी सामान्य लोकांची समजूत आहे. त्याचीं कारणें वेगवेगळीं आहेत. त्यांतील एक कारण त्यांच्या राज्याभिषेकाचा कोठेंच उल्लेख नाहीं, हें होय; परंतु, एकंदर तत्कालीन पत्रव्यवहार पाहिल्यावर, त्यांनीं छत्रपतिपद धारण केलें होतें, अशी खात्री पटते. त्यांनीं दिलेल्या कित्येक सनदांतून व त्यांच्या सरकारकुनादिकांच्या शिक्क्यांतून ' राजाराम छत्रपति ' म्हटलें आहे, तें केवळ औपचारिक होय असें आम्ही तरी म्हणण्यास धजत नाहीं. एवंच, त्यांनीं छत्रपतिपद धारण केलें, पण केव्हां ? ह्या बाबतींत केवळ

तर्कच करावा लागतो. राजारामसाहेब जिंजीस गेल्यावर श. १६१२ च्या आश्विनाच्या सुमारास तेथेंच विधिपूर्वक राज्याभिषिक्त होऊन ' छत्रपति ' झाले असावेत. कारण, याच वेळीं अष्टप्रधानादिकांत महत्त्वाचा बदल झालेला आढळतो. रामचंद्रपंत, शंकराजीपंत, प्रल्हाद निराजी, संताजी घोरपडे, धनाजी जाधव यांची बढती झाली, ती श. १६१२ आश्विनच्या सुमारासच. रामचंद्रपंतादिकांस त्यांच्या योग्यतेनुसार महत्पदें श. १६१२ च्या विजयादशमीच्या सुमुहूर्तावर सुपूर्त केल्याचें स्पष्ट दिसतें.

संताजीस सेनापतिपद, धनाजीस सरलष्करपद, रामचंद्रपंतास अमात्यपद आणि या सर्व अष्टप्रधानांपेक्षां वरिष्ठ असें नवीनच निर्माण केलेलें प्रतिनिधीपद न्यायाधिशी, प्रल्हाद निराजी यांस देण्यांत आलें. छत्रपतींनीं रामचंद्रपंताचें रिकामें झालेलें सचिवपद राजाज्ञा शंकराजी नारायण यांस दिलें. मंत्रि-मंडळांत केलेली ही महत्त्वाची घालमेल राजाराम महाराजांनीं आपल्या राज्याभिषेक व छत्रपतिपद-धारणप्रसंगीं केलेली असावी, असें आम्हांस वाटतें. आतां शंकराजी नारायणाचा सचिवपदाशीं संबंध आल्यानें, त्या पदाचा मागील इतिहास सांगितल्यास तो अस्थानीं ठरणार नाहीं.

सुरनीस ऊर्फ सचिव पदाचा इतिहास

छत्रपतींच्या अष्टप्रधानांतील तिसऱ्या क्रमांकाचा मंत्री सुरनीस ऊर्फ सचिव हा होय. त्याची राज्याच्या एकंदर वसुलावर देखरेख असे. तसेंच, छत्रपतीपासून ज्या इनामांच्या वगैरे सनदा दिल्या

जात, त्यांची बारनिशी करणें हेंहि त्याचेंच काम असे. शिवरायांच्या सचिवाला सालेना पंधरा हजार होन तनखा मिळे. शिवाजीच्या वेळीं कोणत्याहि लहानमोठया नोकरास खजिन्यांतून मेहनताना मिळत असे. त्याकरितां स्वतंत्र मुलुख वगैरे तोडून दिला जात नसे. सचिवानें आपला दरक सांभाळून फौज घेऊन मुलुखगिरी करणें आणि राज्याचा जिल्हाविभाग सांभाळणें हेंहि त्याला करावें लागे. छ शिवरायांनीं आपल्या राज्याभिषेक प्रसंगीं अष्टप्रधानांची फारसी नांवें बदलून तीं संस्कृत केलीं. तेव्हांपासून सुरनीसाला पंतसचिव म्हणूं लागले. सचिवपदाचा इतिहास पहात असतां शंकराजीच्या पूर्वींच्या सचिवांची तोंडओळख करून घेतल्यास वावगें होणार नाहीं.

अनाजी दत्तो प्रभुणीकर

हा स्वराज्यांतला पहिला सचिव होय. ‘ प्रभुणीकर ’ ह्या उपनांवाचा ‘ परभणी ’ ह्या गांवाशीं अपभ्रंश होऊन कांहीं संबंध आहे, कीं प्रभुणी नांवाचें स्वतंत्र गांव आहे हें समजत नाहीं. शिवछत्रपतींच्या अष्टप्रधानांच्या घराण्याप्रमाणें हेंहि घराणें शहाजीराजाबरोबर इकडे आलें असावें. अण्णाजीपंताचें गोत्र ज्ञात नाहीं. शिवरायाचा कारभार सुरू झाल्यापासूनच केवळ अण्णाजी दत्तोचे उल्लेख सांपडतात. अमात्य घराण्याच्या कैफियतींत अण्णाजीपंतासंबंधीं माहिती मिळते, ती अशी: ‘ शककर्ते ’ महाराजांचे कारकीर्दींत अण्णाजी दत्तो प्रभुणीकर सचिव होते. त्यांस रत्नागिरी तालुक्याचें देशपांडेपण दिलें व श. १५९९ सालीं सामागड बांधिला. तेथील सबनिशीचा धंदा दिला. ’ यांतील सामागड बांधल्याचा उल्लेख संशयित दिसतो. तो बरोबर मानल्यास, हा

सचिव पदावर असतां सबनिशीची आसामी करून घेतली असा त्याचा अर्थ होतो. तेव्हां, त्याची प्रगति सामागडचे सबनिशी-पासून झाली असावी.

ह्यासंबंधीं जेधे शकावळींत पांच नोंदी सांपडतात.

(१) 'श. १८५३ भाद्रपद शुध शष्ठी........अण्णाजीपंतास वाकनिशी दिली. (२) 'श. १८५४ चैत्र वद्य दशमी गुरुवारीं ....अण्णाजीपंतास सुरनिशी.' (३) 'श. १५९४ फाल्गुन वद्य १३ पनाला गड अण्णाजीपंती भेद करून कोंडाजी फर्जंद बराबर लोक देऊन........घेतला.' (४) 'श. १६०२ वैशाख शु. ३ तृतीय राजारामास यांनीं मंचकी बैमविलें. संभाजी राजे यांस कैद करून येसा तह करून मोरोपंत व आपण पनालीयावर चाल्हून गेले.' (५) ज्येष्ठ मासी मोरोपंत पेशवे, अण्णाजीपंत, प्रल्हादपंतास हंबीररायानें धरून पनालीयास संभाजी राजे यांमपासी नेलें.' (६) अण्णाजीपंतासहि सोडिलें मजमु दिल्ही.

यावरून याची बढती कसकसी झाली हें कळून येईल. प्रथम सामागडचा सबनीस, पुढें १८५३ त अष्टप्रधानांत प्रवेश होऊन वाकनीस ऊर्फ मंत्री, लगेच ७ महिन्यांनीं श. १५८४ त सुरनीस म्हणजे सचिव होतो. छ. शिवाजी महाराजांचे राज्याभिषेक प्रसंगीं हेंच पद कायम राहातें. शिवाजीच्या मृत्यूनंतर राणी सोयराबाईच्या पक्षांत सामील झाल्यामुळें संभाजी राजाकडून श. १६०२ च्या ज्येष्ठ आषाढांत कैद होतो व त्याचें सचिवपद रामचंद्र नीलकंठ यांस दिलें जातें. प्रथम कैद केलेल्या कारकुनांस छत्रपति संभाजी महाराजांनीं एकदम मुक्त केलें नसावें. श. १६०२ च्या पौषांत अमात्य रघुनाथ नारायण हणमंते यास कैद केल्यावर त्याचें रिकामें

झालेलें अमात्यपद अण्णाजीपंतास दिलें जातें; परंतु शहाजादा अकबर प्रकरणीं अनाजी दत्तो अमात्य, छत्रपतींना दोषी वाटले. श. १६०३ त परळी किल्ल्याखालीं मारले गेले. यानंतर अनाजीच्या मागें रामचंद्र नीळकंठ सचिव झाले.

रामचंद्र नीळकंठ सचिव

ह्याच्यासंबंधीं साधारण माहिती मागें येऊन गेली आहे, पुढेंहि येणार आहे; तेव्हां, त्याचा येथें विस्तार करीत नाहीं.

शंकराजी मल्हार सचिव

' सचिव शंकराजी मल्हार होते, ते जिंजीस वेढा पडल्यावर आपला कारभार टाकून काशीस निघून गेले. सबब, ती पदवी शंकराजी नारायण ह्यांनीं पूर्वी पराक्रम करून राजगड वगैरे मुलुख घेतला होता, त्यांस दिली. ' ' शंकराजी मल्हार—राजारामानें यांस सचिव पदाचा अधिकार श. १६१२ सन १६९० या वर्षी दिला. पुढें हा वेढा जिंजीस पडला, तेव्हां आपला अधिकार टाकून काशीस निघून गेला. ' वगैरे उल्लेखावरून शंकराजी मल्हार हा सचिवपदावर एके काळीं होता असें दिसतें; पण त्याचा काळ ठरविणें कठीण जातें. तेव्हां, शंकराजी मल्हार केव्हां तरी सचिव होता असें दिसतें.

शंकराजी नारायण सचिव

राजाराम महाराज कर्नाटकांत जाईपर्यंत शंकराजी नारायणानें महाराष्ट्र राज्याची कशी एकनिष्ठ सेवा केली, हें मागें आलेंच आहे. प्रल्हाद निराजी न्यायाधीश, रामचंद्र निळकंठ सचिव व शंकराजी नारायण राजाज्ञा हे ब्राह्मण, राज्याचे केवळ आधारस्तंभ होते. महाराष्ट्र व

कर्नाटक या दोन आघाड्या उभ्या करून औरंगजेबास जेर करण्याचा सल्ला देण्यांत हे त्रिवर्ग प्रमुख होते. या त्रिवर्गानें युक्तीच्या चार गोष्टी सांगण्याबरोबर त्यांना मूर्त स्वरूप देण्याची जबाबदारीचीं कामेंहि त्यांनीं शिरावर घेतलीं होतीं. त्यांत लष्करी हालचालीच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची व स्वराज्याची मुहूर्तमेढ जेथें रोवली गेली, तो प्रदेश सोडविण्याची जबाबदारी शंकराजी पंडितावर होती. याला सरकारकुनांत वरणी मिळणार, हें निश्चित होतें.

अखेर कर्नाटकांत गेल्यावर राजारामानें अष्टप्रधानांत पुढीलप्रमाणें बदल केला. प्रतिनिधी हें नवीन पद निर्माण केलें व तें प्रल्हाद निराजीला दिलें. प्रतिनिधीचा अधिकार राजाच्या खालोखाल असल्यानें पेशवा व प्रतिनिधी यांत मानाच्या दृष्टीनें प्रतिनिधिच वरिष्ठ ठरतो. निळोपंत अमात्यांच्या मृत्यूनंतर त्याचें पद रघुनाथ नारायण हणमंते याला शिवाजी महाराजांनीं दिलें. एकच पद एकाच घराण्यांत न ठेवण्याचा शिवरायाचा दंडक असल्यानें अमात्यपदाची इतर पदांप्रमाणेंच घालमील झाली. पण, ही गोष्ट निळोपंताचा कर्ता मुलगा रामचंद्रपंत यांस आवडली नाहीं, तो मनांत रुष्टच होता. पुढें तो अष्टप्रधानांत शिरला, परंतु मनांतील तळमळ तशीच होती. शेवटीं, जिंजीच्या व्यवस्थेंत राजारामानें रामचंद्रपंतांचीं मनांतील किल्मिषें काढून टाकलीं, त्याचें अंतःकरण धुतलेल्या तांदळाप्रमाणें स्वच्छ केलें आणि त्याची सचिवपदाची माळ शंकराजी नारायणाचे गळ्यांत घालून वडिलार्जित अमात्य पद त्याचें त्यास बहाल केलें

सचीवपद-प्राप्तीचा काळ--

शंकराजी नारायणास सचिवपद केव्हां मिळालें, याबद्दल इतिहासकारांत एकमत नाहीं; याला कारण निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे काळ दिले आहेत, हें होय. पण, हल्ली जें संशोधन झालें आहे, त्यानें हा प्रश्न जवळ जवळ सुटला गेला आहे. रामचंद्र निळकंठ हा मुजुमदार-अमात्य-व शंकराजी नारायण सुरनिस्य-सचिव एकाच वेळेला झाले व हें खुद्द शंकराजी पंडितांनीं ज्या पत्रांत सांगितलें, तें निश्चित मिती देणारें पत्र आपणांसमोर आहे. तें पाहिलें असतां वरील घटना निश्चित कोणत्या सालांत झाली हें नक्की सांगतां येतें. तर्क करावा लागेल महिन्याचा, पण त्यांतही फारशी ओढाताण करावी लागणार नाहीं.

भा. इ. सं. मंडळाचें त्रैमासिक व ९ अं. ३ पृ. ६६-६७ वर खुद्द शंकराजी नारायणानें लिहिलेलें अस्सल पत्र असून तें श. १६१२ पौष शु॥ २ (इ. १६९० दि. २२) चें आहे. हें त्यानें आपल्या ताब्यांतील प॥ खटावच्या देशमुख व देशपांडे यांस लिहिलें आहे. यांत रामचंद्र नीलकंठ व शंकराजी नारायण यासंबंधी अत्यंत महत्त्वाचा मजकूर आहे. त्याचा सारांश असा--

सु॥ ईहिदे तिसैज अल्फ — श. १६१२ पौष शु॥ २
इ. १६९० डिसें. २२

छ २० (३०) रा॥वल

ले. शंकराजी नारायण सचिव

ज्यांस...तो-देशमुख व देशपांडे प॥ खटाऊ

॥ श्री शंकर ॥

(वर) घाट पटो साताऱ्यापासून....पावेंतों व पुढें जेथपर्यंत×××× स्वामीच्या पुणप्रभावें करून देश व दुर्गे कबज होतील, तेथपर्यंत राजश्री स्वामीनें आपल्या स्वाधीन राज्यकारभार केलाच आहे. सांप्रत राजश्री स्वामी कृपाळुं होऊन आम्हांस सुरनिशीचा कार्यभाग सांगितला. रायगडापासून कोकणपटीही स्वाधीन केली. सनदा वस्त्रें व अलंकारभूषणें रा॥ म्हाळोजी कासीद राजसेवक व संताजी पडवळ या ब॥ पाठविला ! रामचंद्रपंतास मजमूचा कार्यभाग सांगोन त्याच्या स्वाधीन कराडापासून पलीकडे वरघाट, रायगडापासून अलिकडे कोकण ++ गोकर्ण पावेंतों केली. त्याच्या ++ सनदा व पत्रें व अलंकार भूषणें या उभयतां ब॥ पाठविली.

लष्कर दुतर्फा वाटून दील्हे रा॥ धनाजी जाधव याणी आम्हाकडे असावें. संताजी घोरपडे याणी रामचंद्रपंताकडे ऐसा वह केला आहे. या उपरी या मागें तुम्ही मनासमाने त्याच्या हुकुमाप्रमाणें राहाटी करीत होतेंस व टका पैकाहि भलत्यासच देत होतेस, तैसे आताहि करावया कारणें लागाल, तरी हे गोष्ट +++ या उपरी रूजूं पडणार नाहीं. हजूरच्या हुकुमाखेरीज वर्तणुक केलीयास तुमचे बरे होणार नाहीं. टका पैका द्याल, तो गैरमजुरा निघेल हे बरे समजोन हुजुरच्या हुकुमाप्रमाणें राहाटी करीत जाणें.

यावरून हा श. १६१२ च्या पौषांत शंकराजीपंत हा सुरनीस होता, याबद्दल मुळींच संशय नाहीं, आतां ही पदप्राप्ती नक्की कधीं झाली हें पाहिलें पाहिंज. श. १६१२ वैशाख व. १२ मर्जाखान साताऱ्यास मोडला, तेव्हां हा 'राजाज्ञा' होता हें मागें आलेंच आहे, तेव्हां या सालच्या वैशाख व पौष ह्यांच्या दरम्यान सचीव पदप्राप्ती

झाली, यांत शंका नाहीं. तर्कानें आम्ही म्हणतों कीं, श. १६१२ च्या विजयादशमीला शंकराजी नारायण, सचिव झाले. हें सचिवपद, साताऱ्याची छत्रपतीची गादी होती, तोंपर्यंत शंकराजी नारायणाच्या वंशांतच राहिली. आजही महाराष्ट्रांत तोच वंश त्या पदाचा पवित्र कुंकुमतिलक लावून स्वाभिमानें मिरवत आहे.

सचिवाचीं कर्तव्यें व ताब्यांतील प्रदेश

छत्रपतींच्या अष्टप्रधानांचे कायदेकानू, मानसन्मान वगैरे बाबी छ. शिवाजी महाराजांनीं घालून दिलेल्या अटीप्रमाणें साताऱ्याची गादी असेपर्यंत चालत्या होत्या. त्यांत फारसा फरक झाला नाहीं. शाहूमहाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपतीच जेथें संपले, तेथें अष्टप्रधानांची गोष्ट कशास सांगावयास पाहिजे ? छत्रपति जसे नामधारी झाले, तसेंच अष्टप्रधानहि नामधारी बनले. वास्तविक पाहतां शाहूनंतर अष्टप्रधानच नाहींसे झाले; असें म्हणणेंच योग्य ठरेल. परंतु, पेशव्यांच्या कृपेनें सांगितली बुद्धि व दिलेली शिदोरी घेऊन छत्रपति कालक्रमणा करीत होते, तसलीच दिली शिदोरी घेऊन अष्टप्रधान पुढील काळ कंठत होते. असो, शिवरायाच्या व्यवस्थेंत फरक झाला तो तैनातीच्या बाबतींत. ते लहानमोठ्या नोकरांना तैनात द्यावयाची ती सालोसालीं खजिन्यांतून नख्त देत, कोणालाही मुलूख तोडून देत नसत. पेशवा, अमात्य, सचिव व मंत्री यांच्या ताब्यांत त्यांनीं मुलूख दिला. परंतु तो संरक्षणाकरितां जहागिरी म्हणून नाहीं. हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. तैनातीकरितां सरंजाम तोडून देण्याची प्रथा छ. राजाराम यांनीं नाइलाजानें पाडली; आणि ती छ. शाहू महाराजांनीं वाढीस लाविली. पुढें, पेशवाईंत तर त्यावर फारच भर दिला गेला. अण्णाजी दत्तो सचीव असतां त्यांच्या ताब्यांत

पुणें प्रांत व त्या लगतचीं बारा मावळे हा ' जिल्हा ' होता. तोच विभाग रामचंद्रपंत सचिव झाल्यावर त्याच्या ताब्यांत होता; आणि तोच पुढें शंकराजीपंत सचिव झाल्यावर त्याच्या ताब्यांत आला. सचिवाच्या पदाला जो सालिना १५ हजार होन तनखा मिळायचा, त्याबद्दल हा मुलूख पुढें त्याला जहागीर झाला असावा. प्रथम ह्या पदव्या व मानसन्मानाचा विचार करूं.

सचिवांचे चिटणीस श्री. भिडे यांनीं आपल्या इतिहासांत सचिवपदासंबंधीं जी उपयुक्त माहिती दिली आहे, ती पूर्वपरंपरागत चालत आलेली अशी आहे. शिवाजी महाराजांनीं आपल्या राज्यभिषेकाचे वेळेस अष्टप्रधानांचे जे कायदेकानू घालून दिले आहेत, त्यांत 'सचिव यांणीं राजपत्रें शोध करून अधिक उणें अक्षर मजकूर शुद्ध करावी. युद्धप्रसंग करून तालुका स्वाधीन होईल, तो रक्षून आज्ञेंत वर्तावें. राजपत्रावर चिन्ह समत करावें.' शंकराजी नारायणास पदाधिकार दिला तेव्हां त्यांच्या नांवाच्या दोन मुद्रा करून दिल्या. एक मोठी व दुसरी लहान. मोठी संस्कृत असून लहानी मराठी आहे. त्या अशा—

मोठी व संस्कृत मुद्रा	**लहान व मराठी**
(२) श्रीराम भजनासक्त नारायण तनुजनेः । शंकरस्य शुभा मुद्रा पूर्णेंदुरिव राजते ॥ [शिक्का]	श्री शंकराजी नारायण [अष्टकोनी लंबवर्तुळाकार].
(२) पत्रावधिरयं भाति [मोर्तब] (शि. शा. लेखनालंकार पृ. ४७)	[मोर्तब] पत्रा वधिरयं भाति [अष्टकोनी लंबवर्तुळाकार].

हें पद याच घराण्यांत पुढें वंशपरंपरेनें चालू झालें. पदाधिकारी बदलतांच मुद्रा बदलावयाची अशी इतरत्र दिसून येणारी प्रथा सर्वांच्याच बाबतींत दिसत नाहीं. ह्या घराण्यांत थेटपर्यंत शंकराजी नारायणाच्याच मुद्रा चालत आल्या. त्या केव्हांच बदललेल्या नाहींत. पेशव्याच्या 'खास' व 'मुतालकी' अशा दोन प्रकारच्या जशा मुद्रा आहेत, तशाच सचिवांच्याहि असाव्यात असा बळकट संशय येतो. मोठी मुद्रा ही 'खास मुद्रा' व छोटी मुद्रा ही 'मुतालकी मुद्रा' असें आम्हांस वाटतें.

सचिव हा छत्रपतीचा मुख्य दफ्तरदार, दफ्तरची सर्व जबाबदारी त्यावर; त्यामुळें दरबारांतून जीं "फडणिशी" पत्रें बाहेर पडत, त्यांत याचा महत्त्वाचा हात असे. त्यांतील प्रमुख कागद जी सनद तींत प्रतिनिधी, पेशवा, अमात्य, सचिव व मंत्रि ह्या प्रधानांना निरनिराळीं स्थानें आहेत. त्या सर्वांचे संस्कार होतील, तर सनद दिली जाईल. नाहीं तर ती अडून पडेल. सनदेवर चार मुद्रा व निरनिराळ्या वळणाचे शेरेदोरे पहावयास मिळतात. त्या प्रधानांच्या मान्यताच होत. सनदेप्रमाणेंच इतर राजपत्रांच्या बाबतींतहि असे. याची स्पष्टता मागें आलीच आहे. ह्याबद्दल निरनिराळ्या ठिकाणीं विस्तार केला आहे तो असा—

'राजपत्रांवर निषाणें संमतशुद्ध असें करावें (पंतप्रतिनिधीची बखर पृ. २२)' "महाराजांचे पदरीं सचिवाचें मुख्य काम म्हटलें म्हणजे दफ्तर सांभाळणें व सनदांची बारनिशी ठेवणें असें आहे आणि महाराज सरकारांतून कोणास सनदपत्र करून दिली, तर

त्यांवर ' रुजुं सुरनवीस '। ' सुरुसुतबार ' अशीं अक्षरें सचिवाचीं असत." "महाराजांनीं ह्यांस पत्र लिहिलें, तर वर शंकराजी पंडित असें नांव लिहून शेवटीं बहुत काय लिहीणें ' सूज्ञ असा ' असें लिहिण्याची चाल होती."

महाराजसरकारांतून सचिवपदाचीं वस्त्रें झालीं व पुढें दर एक पुरुषाचे वेळेस वस्त्रें झालीं, तरी महाराजांकडून वस्त्रें व जवाहीर वगैरे खालीं लिहिल्याप्रमाणें देण्याची चाल होती.

वस्त्रें

(१) प्रथम भेटीसमयीं चादर छडीदार.

(२) पदाचीं वस्त्रें, एक मंदील, चादर छडीदार, किनखाप एक, एक पटका.

(३) शिक्के कटार.

(४) शस्त्रें, ढाल, एक तलवार.

(५) चौघडा एक.

(६) घोडा एक.

(७) चवरी रुप्याच्या दांड्याची.

(८) कलमदान ताडीचे.

(९) हत्ती एक नग.

(१०) जवाहीर, चौकडा मोत्याचा एक, कंठी मोत्याची एक, तुरा मोत्याचा एक, शिरपेंच.

याप्रमाणें देण्याची चाल होती आणि सचिवांनीं भेटीचे वेळेस महाराजांस कांहीं मोहोरा नजर कराव्या असा परिपाठ होता. (बहुधा १५ मोहोरा नजर द्याव्या लागत.) (भिडे)

शंकराजी नारायण ‘ राजाज्ञा ’ असेपर्यंत रामचंद्रपंतांचा तो दुय्यम असल्यानें, राजाराममहाराजांनीं शंकराजीपंतांस जो मुलूख सांभाळण्यास सांगितला होता, त्यावर रामचंद्रपंत व शंकराजीपंत हे दोघेहि अंमल करीत असतांना दिसतात; पण, पुढें तो सचिव झाल्यावर तो प्रदेश एकट्या त्याच्याकडेच दिला. साधारणत: कृष्णेच्या उत्तरेकडचा घाटमाथा यांवर शंकराजीपंताची सत्ता असे. सुभा मावळ, प्रांत पुणें, प्रांत सुपें, प्रांत करडें-रांजणगांव, वाई देश व उत्तर कोंकण व त्यांतील लहानमोठे किल्ले हे खास शंकराजी नारायणाच्या ताब्यांत असून, त्याशिवाय पेशवा निळोपंत कर्नाटकांत गेल्यामुळें त्याच्या ताब्यांतील राजमाची किल्ल्याच्या पूर्वेचीं मावळें आणि उत्तर कोंकण ह्यांवरहि ह्याचीच देखरेख कांहीं काळ होती; आणि महाराष्ट्रांतील सह्याद्रींतील रांगणा, विशाळगड, पन्हाळा हे किल्ले सोडून बाकीचे महत्त्वाचे सर्व गड छ. राजाराममहाराज कर्नाटकांतून महाराष्ट्रांत येईपर्यंत सचिवालाच सांभाळावे लागले व जिंकून ध्यावे लागले. एवंच महाराष्ट्राचें केवळ हृदय शाबूत ठेवून त्याची व्यवस्थित हालचाल, अर्थात् जिवंतपणा, सतत २० वर्षें रात्रंदिवस खपून शंकराजी पंडितानें राखला, म्हणूनच त्याचें पुढें साम्राज्यांत रूपांतर होऊं शकलें. महाराष्ट्राला मारण्याची पराकाष्ठा औरंगजेबानें केली; पण त्याचें संरक्षण करणारे अमात्य, सचिव, सेनापति, सरलष्कर व त्याचे मदतनीस एकापेक्षां एक गाढे वीराग्रणी औरंगजेबासारख्या कर्दन काळाला पुरून उरले.

सचिवाचें सव्यसाचित्व

शंकराजी नारायण—श. १६१२ त (इ. स. १६९०) सचिवपद मिळालें व तें आमरण चाललें. श. १६२९ चे (इ. स.

१७०७) कार्तिकांत ह्यानें इहलोक सोडून परलोकाचें साधन केलें. म्हणजे एकूण १७ वर्षें या पदावर ते होते. या काळांत धामधूम नाहीं असा एकहि क्षण नव्हता. मराठ्यांनीं एकदां म्यानांतून काढलेली तलवार औरंगजेबाला गाडूनच म्यानांत घातली. या काळच्या लढ्याशीं व घरांतील भानगडीशीं ह्या ना त्या नात्यानें शंकराजी नारायणाचा संबंध आला असला, तरी ज्यांत त्यांनीं प्रत्यक्ष भाग घेतला व जे विद्यमान साधनांत नमूद आहेत तेच प्रसंग पुढें दिले आहेत.

मावळांतील देशमुखांची समजूत

शिवाजीमहाराजांनीं मुलुखाची बटई करून वतनदाराच्या नाकांत वेसण घालून त्यांच्या सत्तेला आळा घातला, याचा ऊहापोह मागेंच केला आहे. वतनदारांची सत्ता गेल्यामुळें ते स्वराज्यावर रुष्ट झाले व संधीची वाट पाहूं लागले. शेवटीं, मोंगलांची दाटी होतांच, ते त्याकडे गेले व स्वराज्यावर घाला घालण्यास पुढें आले; पण संभाजीचा वध, मोंगलांनीं मुलखांत चालविलेली बाटवाबाटवी इत्यादि कारणांनीं सर्व महाराष्ट्रीयांचे खाडकन् डोळे उघडले व आपण स्वराज्याचा चालविलेला घात त्यांचा त्यांनाच बोंचूं लागला. या घटनेचा फायदा राजारामानें पुरेपूर घेऊन, पारखे झालेल्यांच्या उदार अंत:करणानें समजुती घालून, त्यांना पुनश्च आपणाकडे ओढून घेतलें. हैबतराव निंबाळकर, याचप्पा नायक, नागोजी माने, माणकोजी पांढरे, नेमाजी शिंदे वगैरे कित्येक हिंदु सरदार औरंगजेबाला सोडून छत्रपतीकडे आले व त्यांनींहि त्यांचा गौरवपूर्वक अंगिकार केला. ‘ श. १६१२ मार्ग. शु. ३ नेमाजी सिंदे व माणकोजी पांढरे व नागोजी माने मोंगला-

कडून पारखे होऊन दोन हजार स्वार घेऊन राजारामाकडे आले. मोर्चा उठवून चक्रपुरी बैसले.' श. १६१३ चैत्र व॥ ९ (इ. स. १६९१ एप्रिल ११) च्या पत्रांत नागोजी विन रताजी माने यांस छत्रपति राजारामांनीं लि॥ 'तुम्ही पुर्वी ताम्राकडे होतात, ऐसीयासी स्वामींचें राज्य म्हणिजे देवताभूमि, या राज्यांस तांब्राचा (मोंगलाचा) उपद्रव न व्हावा, महाराष्ट्र रहावा, स्वामीच्या राज्याची अभिवृद्धि व्हावी या उद्देशें स्वामींच्या पायासीं एकनिष्ठता धरून कर्नाटकांत चंदीचे मुक्कामीं स्वामीपाशी आलेत........' [सनदा पत्रांतील माहिती पृ. १६६]

पुढील झगड्यांत या लोकांनीं स्वराज्याची उत्कृष्ट सेवा कशी केली, हें प्रसंगोपात पहावयास मिळेलच. सरदारांप्रमाणें वतनदारांचीहि समजूत घालून त्यांचें साहाय्य घेण्यांस आळस केला नाहीं. मात्र, हें करतांना शिवरायांनीं केलेली व्यवस्था मोडावी लागली;पण याला नाइलाज होता. सरदारांपेक्षां वतनदारांनीं फार नासलें. त्यामुळें, त्यांची मागणी अपायकारक दिसत असूनहि मान्य करावी लागली. शंकराजीपंताच्या ताब्यांतील मावळ भागांतील देशमुख पुनश्च लगामीं लावल्यावांचून मोंगलांनीं बळकावलेले, स्वराज्याचा केवळ प्राण असे, डोंगरी किल्ले मोंगलापासून जिंकून घेणें शक्य नव्हतें, त्यामुळें रामचंद्रपंत व शंकराजीपंत यांना छत्रपतींनीं आज्ञा करून मावळच्या देशमुखांची गेलेली सत्ता त्यांना परत देवविली.

श. १६१२ 'मार्गशीर्ष मासीं सर्जेराव जेधे देशमुख त॥ भोर हे मावळच्या देशमुखांबरोबर तुलापुरास जाऊन पातशाहीं कौल व शिरपाव घेऊन आले' (जे. श.) यानंतर महाराष्ट्रीयांच्या डोळ्यांत झणझणीत 'बादशाही' अंजन पडल्यामुळें ते शुद्धीवर आले.

व मावळचे वतनदार चुळबुळ करूं लागले. वास्तविक बाजी सर्जेराव जेधे यांनीं शिवाजीमहाराजांजवळ केलेली स्वराज्यसेवा इतकी अमोल होती कीं, तिला तोड नाहीं. असें असतां तोहि इतरांबरोबर बादशाहीकडे झुकला, हा केवळ कालमहिमा ! दुसरें काय? परंतु, याच सर्जेरावांनीं आतां पुढाकार घेऊन वतनदारांना महाराष्ट्राज्यांत पुन्हां आणण्याचा उद्योग सुरूं केला, म्हणजे तो पूर्वपदावर आला.

तो स्वतः चंदीस छत्रपतींना भेटावयास गेला व तेथें त्यानें त्यांना विनंति केली कीं, 'ता॥ म॥ चे वतनदार व रयत देखील स्वामीचे पायाशीं एकनिष्ठ आहे. तरी स्वामींनीं कृपाळू होऊन वतनदारांस वतनें पहिलेपासून निजामशाही व आदीलशाही यांचे कारकीर्दींत चालत होतें, तेणेंप्रमाणें चालवावयाची आज्ञा करून अभयपत्रा देवविलें पाहिजे.' छत्रपतींनींहि एकंदर प्राप्त कालावर नजर देऊन ही विनंति मान्य केली व मावळच्या लहान-मोठ्या सर्व वतनदारांना अभय देऊन, आज्ञा केली- "त्या प्रांतीचे राज्याचे कार्यभागांस स्वामीने रा. रामचंद्रपंत अमात्य व रा. शंकराजी नारायण सचीव ठेविले आहे. त्यावरीं यख्तियार आहे ते तुमचे वर्तमान मनांस आणून वतनाचा निर्वाह करून सनदा दिधल्या असतील, त्या स्वामीच्याच सनदा आहेत. त्याप्रमाणें स्वामी चालवितील. आपले समाधान असूं देणें." "मावळ प्रांत शंकराजी पंत सचिव यांचे दिमतीचे मुलखांत आहे. त्याप्रमाणें तुम्ही त्यांचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करीत जाणें आणि स्वामीचे कार्य करून आपला मजूरा करून घेणे" "खुद्द स्वामी त्या प्रांतांस येतील, तेव्हां तुमचें उर्जित करतील." [शि. च. सा. खं. ६ ले. ११५ म. इ. सा. खं. १५ ले ३४९; पे. द. ३१ ले ५१, ९२ वगैरे]. अशा रीतीने

वतनदारांची दिलसफाई झाल्यावर तेहि जुन्या जोमानें देवा-ब्राह्मणांचे राज्याच्या अभिवृद्धीकरितां झटूं लागले.

श. १६११ कार्तिकांत सला करून रायगड मोंगलांस दिला. आणि 'तेवर्षीं कूळ (सर्व) गड मोगलानें घेतलें.' अशा रीतीनें हातचे गेलेले गड पुनश्च हस्तगत करणें ही कामगिरी प्रथमची होऊन बसली. सचिवाच्या ताब्यांतील मुलुखांपैकीं मावळ व कोंकण भाग मोंगलांस सतावून सोडण्यास व गनिमी काव्यानें लढण्यास निसर्गतः सोईचा होता. त्यांतील मुख्य मुख्य गड घेणें, तेथील वतनदार लगामीं लावून घेतल्यामुळें, आतां शक्य झालें होतें. तेव्हां जेध्यांनीं छत्रपतींना प्रथम पुरंदर घेण्याचा सल्ला दिला आणि बरोबर नेलेल्या पुरंदरच्या माजी कोळी, बेरड, गडकऱ्यांशीं करार केला. छत्रपतींनीं लगेच तीन पत्रें सिद्ध करून तीं जेध्याबरोबर दिलीं. एक शंकराजी पंडितांस व दुसरें संताजी घोरपडे सेनापतीस व तिसरें बेरड किल्ले पुरंदर यांस —

'बेरड व कोळी किल्ले पुरंधर हस्तगत करून द्यावयाची' उमेद धरिली आहे, तरी स्वामीनें त्यास अभयपत्रें करून दिल्ही पाहिजेती, म्हणोन सर्जाराव जेधे देशमुख रोहिडखोरे याणी विदित केले त्यावरून स्वामीनें बेरडास व कोळियास अभय पत्रे दिल्ही आहेत. तरी तुम्ही त्या कोळयांचे व बेरडांचे दिलासे करून पुरंदरची हवी करवणें आणि जे अनुकुलता करावयाची ते करून देऊन गड हस्तगत होए ऐसे करणे कोळीयाची व बेरडाची सरफराजी, कार्य सिध जालियावरी, जे करावयाची ते करणे. यांचे चालवायास अंतर पडो न देणें.' असें सचिवास लिहिलें.

याच अर्थाचे बेरड किल्ले पुरंदर यास पत्र आहे. सचिवाप्रमाणेच संताजी घोरपडे सेनापती यासहि सर्जेरावाला सैन्याची मदत करण्याची आज्ञा केली. ' म॥ सर्जाराऊ जेधे देशमुख त॥ रोहिडखोरे हे स्वामीसनिध येऊन मावळ प्रांतीचें व पुरंधर व जुन्नर या प्रांतीचे कित्येक वर्तमान विदित केले, त्यावरून यांस त्या कार्यभागाची आज्ञा करून राजश्री शंकराजीपंत सचिव यांस पत्रे देऊन पाठविले आहेत हे जो कार्यभाग करावयाचा, तो करितील. त्या प्रसंगी सेनेकडून साहेता पाहिजेसी होईल तेव्हां तुम्हांस लेहून पाठवितील ते करणे आणि कार्य सिध होय ऐसे करणे येविशी अंतर पडो न-देणे' [म. इ. सा. खं. १५ ले. ३५१]. इतकी सिद्धता झाल्यानंतर बहुधा लवकरच पुरंदर घेतला असावा. परंतु, तसा स्पष्ट अगर ओझरता उल्लेख कोठेंच नाहीं.

मावळांतील देशमुख मोंगलास मिळाल्यामुळें त्यांना सचिवानें शिक्षा केल्या होत्या, त्याहि जेध्यांनीं याच वेळीं माफ करून घेतल्या. त्यांत कांहीं न्याय्य होत्या, तर कांहीं अन्याय्य होत्या. लढा सुरू झाल्यावर न्यायान्यायाचा धारवाडी कांटा टिकत नाहीं. येसाजी मालुसरे या सचिवाचे सरदारानें केलेल्या अन्याय्य शिक्षेबद्दल छत्रपतींनीं त्यांस चांगलेंच छेडलें आहे, 'रा॥ सर्जाराऊ जेधे देशमुख रोहिडखोरे याजकडील लोकाची मणासे त्या प्रांते होती. त्यावरी तू स्वारी करून कित्येकाची वस्तभात्र लुटून नेलीस ' आणि ' बापूजी खडकिया अफराद याची बाईल धरून नेली आहे. मनास येसी धामधूम करतोस ' ' ऐसे कराया तुजला काय गरज आहे ? कांहीं सबंध नसता लोकांची घरे लुटावी, बाइला धरून न्याव्या हे ढंग तुजला कां आठवले आहेत ? ह्यावरून वर जोर

नतीजा पावावा; परंतु, एक वेळ स्वामीनें क्षमा करून हे आज्ञापत्र सादर केलें असे; तरी ह्याउपरीं तऱ्हीं ऐशी बदराहा वर्तणूक करीत नव जाणें,' ह्यानंतर दोन्ही अन्याय्य कृत्यांचें परिमार्जन करण्याची आज्ञा केली आहे. [म. इ. सा. खं. १५ ले ३५०]

शंकराजी नारायणानें प्रयागजी दिनकरराव हातनोलीकर या पुंडास कबिलासह दस्त करून आणिला. तेव्हां तो कौल घेऊन सचिवाकडे आला. सचीवानें, त्याला चाळीस हजार दंड बांधून, त्याचा कबिला अटकेंत ठेविला होता. त्या बाबतींत जेध्यानें छत्रपतीस विनंति केली कीं, 'मिरासदार आहे. त्याचे हाते स्वामीकार्य विशेष होणार. तरी त्यांस जामीन घेऊन मोकळे करावे. आणि कार्यभाग सांगावा. ' दुसरें प्रकरण गुंजण मावळचा देशमुख हैबतराव शिळीमकर याचें. तो स्वामीच्या 'पायाशी' बेईमानी झाला होता, म्हणून 'दस्त झाला होता.' त्याबद्दलहि हातनोलीकराप्रमाणेंच जेध्यानें विनंति केली. तेव्हां, छत्रपतींनीं सचिवास आज्ञा केली कीं, "हैबतराव यांस, सर्जारावाचें व तुमच्या मते येऊजेल ? त्यांस जमान घेऊन हैबतरावाचा कबिला आपल्या कब्जांत एकादें जागा ठेवणे आणि हैबतरायांस सोडून मोकळे करून स्वामीकार्य घ्यावयाचे, ते घेत जाणे. जमावाचीं बळकटी करणें आणि काम सांगणें, अनमान न करणें." अशीच प्रयागजी दिनकररावासंबंधींची आज्ञा आहे. हीं सर्व पत्रें श. १६१३ च्या भाद्रपदांतील आहेत. अशा रीतीनें मावळांतील वतनदार व रयत मोंगलांस जाऊन मिळाली होती, ती मराठ्यांनीं आपणाकडे ओढली व आपली शक्ति वाढविली.

या वाढलेल्या शक्तीचा सचिवानें भरपूर उपयोग करून मावळांतील बहुतेक महत्त्वाचे गड मागेंपुढें हस्तगत केले. जेधे शकावलींत फक्त श १६१३ सालचे खालीं 'किल्ले पन्हाळा मोगलापासून घेतला. रा. रामचंद्रपंतीं व परशरामपंताबरोबर हशम पाठवून घेतला.' कर्नाटकांतून मदत आणून मराठे आपणांस नरम करीत आहेत, असें पाहून तिकडील आघाडी जोरानें लढविण्याचा औरंगजेबास निर्णय घेणें भाग पडलें. त्यानें यापूर्वी रायगड घेऊन मोकळा झालेला झुल्फिकरखान कर्नाटकांत घुसविला व तो चंदीस वेढा देऊन बसला. त्यामुळें राजारामांस स्थलांतर करावें लागलें. ही घटना श. १६१२ चे भाद्रपदांतील. तरीहि महाराष्ट्रांत मराठे जोर करू लागलेले पाहून त्यांचा कर्नाटकांतील संपूर्ण आसरा नाहींसा करण्याची कामगिरी हातांत घेतल्याखेरीज मोंगलांस गत्यंतरच नव्हतें. तेव्हां 'श १६१३ पौषांत कामबकस शहाजादे अस्तखान झुल्फुकाराचे मदतीस आले.'

अशा रीतीनें मोंगलाकडून चंदीचा वेढा बळकट होत चालला, तेव्हां महाराष्ट्रांतून अमात्यांनीं सेनापती संताजी घोरपडे व सचिवानें सरलष्कर धनाजी जाधवराव यांस चंदीचा वेढा उठविण्याकरितां कर्नाटकांत रवाना केलें. यांच्या बरोबर, पूर्वी 'मोगलाकडे असून' 'स्वामीचें राज्य म्हणजे देवाब्राह्मणांची भूमि-ह्या राज्याची अभिवृद्धि व्हावी आणि महाराष्ट्र धर्म रहावा ह्या उद्देशें स्वामीच्या पायाशीं एकनिष्ठता धरून' देशीं स्वामीकडे येऊन तिकडे एकनिष्टपणें सेवा केलेला, पा। फलटणचा देशमुख अमृतराव निंबाळकर हाहि आपल्या जमावानिशीं होता. या सर्वांनीं कर्नाटकांत खूपच हैदोस घातला. जाधवरावांनीं चंदीच्या वेढ्यांत

पश्चिमेच्या चौकीस असलेला मोंगलाचा सरदार इस्माईलमका यांजवर अचानक झडप घातली व चौकी मारून काढली. ह्यांत स्वतः इस्माइलखान धरला गेला व त्याकडील ५०० घोडे व २ हत्ती पाडाव केले. + सेनापती घोरपड्यानें चंदींस येतांना वाटेंत आडवा आलेला आलीमर्दांखान यास कांचीजवळ खूपच चोपून कैद केलें व त्याची १५०० घोडीं पागेस लावलीं.

याच वेळीं चंदीला वेढा देऊन बसलेले झुल्फिकारखान, आसदखान व शहाजादा कामबक्ष ह्यांच्यांत कांहीं मतभेद होऊन ते वर्दळीवर आले. ह्या भांडाभांडींत अखेर मार्गशीर्षांत चंदीचा वेढा उठविण्याचा झुल्फिकारखानानें निर्णय घेतला आणि शहाजाद्यास कैद केलें. शेवटीं पौष वा। ११ झुल्फिकारखान सल्ला करून वंधवसास (वांदिवासांस) गेला. असदखान व कामबक्ष हुजूर गेले.

असें झालें, तरी कर्नाटकांत धामधूम चालूच होती. इकडे महाराष्ट्राची समरभूमीहि रसरसत होतीच. 'मोंगलीं पुनश्च पन्हाळीयांस वेढा घातला.' यापुढील सालींहि कर्नाटकचें रण घुमतच होतें. तिकडे गेलेले सेनापती व सरलष्कर अद्यापि आलेले नव्हते, त्यामुळेंच कीं काय, मराठयांच्या महाराष्ट्रांतील हालचाली जराशा थंडावलेल्या दिसतात. कर्नाटकांत असतांना संताजी घोरपडे सेनापती व छत्रपतीं यांमध्यें मतभेद उत्पन्न होऊन 'संताजी घोरपडे, राजारामाशींहि बिघाड करून,' देशीं चाललेले पाहून त्यावरी धनाजीस 'नामजाद' केले. संताजीप्रमाणें त्याचा भाऊ बहिरजी घोरपडा व मोंगलाकडून मराठ्याकडे आलेला याचप्पा नायक हेहि, छत्रपतीवर

+ या कामगिरीबद्दल धनाजी जाधवराव यांस मौ. पाडळी व बोरगांव हीं गांवें इनाम मिळालीं.

यागी होऊन, त्यांचाच प्रदेश घेऊं लागलेले होते. शेवटीं याचप्पा तर पुनश्च झुल्फिकारखानाकडे जाऊन त्याचा चाकर झाला. यापूर्वीं याचप्पा नायक व बहिर्जी घोरपडे वेलुराजवळ होते. तेथें राजारामानें जाऊन त्याशी झगडा केला.

धनाजी जाधवराव इकडे येतांच पुनश्च महाराष्ट्र चेतला. श. १६१५ कार्तिक मासीं रा. रामचंद्रपंत आमात्य, रा. शंकराजी पंडित सचिव, धनाजी जाधव यांनीं जाऊन पन्हाळ्याचा वेढा उठविला. अशा रीतीनें शत्रूशीं लढत देत असतां, घरांतील केरकचरा काढून टाकून तें स्वच्छ करण्याची कामगिरीहि सचिवांस करावी लागली. ती अशी :

संताजी व बहिर्जी घोरपडे यांनीं केलेली स्वराज्यसेवा इतकी अमोल होती कीं, त्याची महति गावी तितकी थोडीच आहे. असें असतां हे उभयतां ऐनवेळी रुसून घरीं बसलेले कसे चालतील ? शेवटीं, शंकराजी पंडितांनीं उभयतांची समजूत घातली. प्रथम बहिर्जीचें समाधान करून त्याला कर्नाटकांत चंदावरचे मदतीस पाठविलें (श. १६१५ फाल्गुन) संताजीची समाधानी करण्यास जरा वेळ लागला. वास्तविक, संताजी हा रामचंद्रपंताचा मनुष्य. त्यांनींच त्याला छत्रपतीकडे शिफारस करून सेनापतीपद दिवविलें होतें. तेव्हां, त्यांनींच त्याची समजूत घालणें ठीक झालें असतें. पण दोघेहि कडक, त्यामुळें संताजीचें समाधान करण्यास शंकराजीपंतांस पुढें यावें लागलें. शेवटीं 'रा. शंकराजीपंत सचिव ह्यानी रा. संताजी घोरपडे ह्यांसी बोली केली कीं, फौजेनिशी जाऊन साहेब काम करावे रा. स्वामीजवळ मुद्दे घालूं नयेत. मर्यादेने राहोन वेढा उठवावा. बेमानी करूं नयेसे, बोली करून शपथ घेतली ब॥ एसाजी मल्हार

मुतालिक दिल्हे त्या बरोबर फौज हणमंतराव निंबाळकर सरलष्कर व सरदार मिळून २५००० स्वार दिले म॥ निलेच्या सदरेस बसोन उभयतांनीं दिवाण कारभार करून इमानें वर्तावें ऐसी बोली करून कार्तिकमासी (श. १६१६) रवानगी केली. त्याणी फौज-भारी करून भांडीयाच्या आवाजे कूच करून मजल दरमजल कर्नाटकांत गेले' (जे.श.) अशा रीतीनें सचिवांनीं घोरपडे बंधूंना पुन्हां स्वराज्यसेवेंत गुंतविण्याची महत्त्वाची कामगिरी केली.

कोरीगडचा पाडाव व सुटका

याखालीं कांहीं किल्ले घेतल्याची हकीगत येत आहे, ती कालानुक्रमानें देणें शक्य झालें तेथें देण्याचा प्रयत्न केला आहे; पण कांहीं ठिकाणीं ती आगेमागेंहि झालेली दिसेल. तरी त्यांत वर्ष सहा महिन्यापेक्षां जास्त फरक पडणार नाहीं. असो. मावळांत पौड-जवळ कुंवारी ऊर्फ कोरीगड आहे. तें आंबेघाटाचें संरक्षण करण्याचे दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें ठाणें असून तें सचिवांचे ताब्यांत होतें त्यावर मोंगलांची धाड येऊन त्यांनीं तो गड घेतला. पण मराठ्यांनीं त्यांस तो दीर्घकाल पचूं न देतां, त्यांच्या हातून हातो-हात कसा सोडविला, ही माहिती मोठी उद्‌बोधक आहे.

जेधे शकावलींत, श. १६१६ सालांत मास-तिथीचा उल्लेख न करतांच नोंद केली आहे. सनदा-पत्रांतील लेखांक, श. १६१७ मार्गशीर्ष वद्य २ चा असून त्यांत 'सालमजकुरी गनिमानें घेतला' असें म्हटलें आहे. शिवचरित्रसाहित्यांतील लेखांकाची मिती श.

१६१८ फा. व. ११ ही असून ' सा. गुदस्ता जुन्नरकर बेग यानी दगा देऊन कोरीगड घेतला ' असें सांगत आहे. तेव्हां जे. श.तील नोंद श. १६१६ त पडली आहे. ती १६१७ तील असावी अगर हा प्रसंग श. १६१६ च्या सरत्या सालीं घडला, असें धरून चालावें. कोणीच मिती न दिल्यामुळें साल निश्चित करणें अवघड झालें आहे. तेव्हां, कोरीगडचा प्रकार श. १६१७ च्या मार्गशीर्ष व श. १६१६ चा फाल्गुन ह्याच्या दरम्यान घडला, असें गृहीत धरून चालावें लागेल.

कोरीगड पंतसचीवाच्या ताब्यांत व जुन्नरचें ठाणें मोंगलाकडे अशी स्थिति होती. शंकराजी नारायणाचे शालक त्रिंबक शिवदेव (महाशब्दे) हे ' मुतालिक सचीव ' असून ते कोरीगडांवर होते. त्या समागमें यादव सामराज व महादाजी बाजी होते. अशा स्थितींत गडावरील ' रायाजी बहुलकर याच्या हाते भेद करून जुन्नरकर बेग मोगलाकडील येऊन किल्ला शिड्या, माळा लावून घेतला. ' यांत त्रिंबक शिवदेव व मोरो नारायण धरले गेले व आबाजीपंत लबेचा सबनीस होता, तो पडला. यादव सामराज व महादाजी बाजी कबीले सुद्धां पश्चिम दरवाजानें बाहेर पडून ' भोरपेंस ' गेले. किल्ला घेत असतांना जी झटापट झाली, तींत गिर्जोजी निंबाळकर व दिनकरराव वगैरे बरेचसे शिपाई पडले. पंतसचीवांस ही दग्याची बातमी कळतांच ते राजगडास आले व पुनश्च गड हस्तगत करण्याच्या खटपटीस लागले. मोंगलाच्या हातीं भेदानें गड आला, तरी तो टिकविणें कठिण होतें. कारण, बहुधा गड हातचा जातोसा पहातांच त्यावरील धान्यादिकांच्या सांठ्याचा होम केला असावा. शिवाय, झटापटींत मोंगलांचीहि बहुतत्र खराबी झाली असावी.

किल्ला गेला, तरी त्याभोंवतीं घिरव्या घालीत राहून मोंगलांची येणारी रसद मारण्याचा उद्योग मराठे अव्याहत चालवीतच होते. बाळोजी ढमाले पदातपंचसहस्री व नात्रजी नाईक बलकवडे जमाव हवाला हशम ह्या दोघांनी कोरगडाकडे जुन्नरहून येणारी रसद मारून मोठा पराक्रम केला. ' किल्ले कोरीगड साल मजकुरीं गनिमानें घेतला. त्याचें मदतींस मनसुरखान गनीम जमावानिशी किल्ले मजकुरास येत होता. त्या मार्गी हशमाचा लष्करचा जमाव गनिमाशी गांठी घातलीं आणि गनीमांस नतीजा पावून कुली-माघारा घातला ! तें समयीं मशार निल्हेनें—बाळोजी ढमाल्यानें—तरवारीची शर्थ करून स्वामी कार्यावरी ठार जाले. ' [स. प.तील माहिती पृ. १७५-७६ मधील पत्र श. १६१७ मार्ग. व. २ इ. १६९५ डिसें. ५]

याच प्रसंगाचें स्पष्टीकरण दुसरे ठिकाणीं आहे. ' नात्रजी नाईक बलकवडे जमाव हवाला हशम ह्यांणी साल गुदस्ता जुन्नरकर बेग दगा देऊन कोरीगड घेतला, ते समयीं मा।रनिल्हेनें हशमाचा जमाव करून किल्ल्याभवत्या घरव्या घालून गनिमाची मदत व सामान गडांवर चढवून दिलें नाहीं. जुन्नरीहून मदतीं व मनसुर-खानाचा लेक व स्वार व तोफेची, बेग घेऊन येत होता. त्यांस जावून ता। पौड खोरे येथें गनीमाशीं जमावानीशीं गाठी घालून कस्त केली. गनिमाची घोडीं पाडाव केली व कित्येक लोक युद्धीं ठार केले. तरवारीची शर्थ केली, मोगलांनीं गड घेतला, तरी त्यास अशा रीतीनें एकसारखें सतावून सोडल्यामुळें, त्याची रसद अगदीं बंद झाली. आंतील बाहेर व बाहेरील आंत

येण्याचें बंद झाल्यानें हे परकी किती दिवस दम धरणार हे दिसतच होतें.

शेवटीं, शंकराजीपंतीं मराठ्यांच्या नेहमींच्या रिवाजाप्रमाणें राजगडाहून कानांस कोन लागूं न देतां स्वारीची सिद्धता केली व गडांवर धाड घातली. 'रा।। शंकराजीपंत सचिव राजगडास आले. त्यांनीं पंताजी शिवदेव [सोमण] व चापाजी कदम भोरपकर व वरकड किल्याचे जमाव व दामाजी नारायेण याचा जमाव घेऊन कोरींस रवाना केलें. वेढा घालून किला जेर केला. बेगास निरोप देऊन फिरोन घातला.' 'रा।। त्रिंबकपंत व मोरोपंत वरकड लोक कबिले होते, ते सोडविले. रा।। कारवीस (कुवाटवीस ?) जाऊन बहुलकरास मार देवून बाले किल्ल्यावरी राजगडीं अटकेंत ठेऊन जुन्नरकरांस गप्प बसविले.'

तरी, राजपुरीच्या सिद्दीची वळवळ चाललीच होती. त्यानें कोरीगडच्या पेठेवर अचानक येऊन छापा घातला. मराठें कांहीं बेसावध नव्हते. त्यांनीं छापा परतवून हबशांस बरा नतीजा दिला. या कामीं मागें जुन्नरकराची सेवा करणारा नावजी नाईक बलकवडे यानें पुढाकार घेऊन त्यांची कणीक कशी तिंबली, हें त्याला त्याच्या बहादुरीबद्दल मौजे दारवली, त।। पौडखोरे हा गांव इनाम दिला यावरून दिसून येईल. त्याच्या सनदेंत वर्णन आहे, 'साल मजकुरीं हबशी गनीम जमावानीशी कोरीगडचें पेठेवर येऊन पेठ लुटून फन्ना केली. बंद धरून सावा घाट उतरत होता, हें वर्तमान रा।। त्रिंबक शिवदेव मुतालीक दि।। सुरनीस यास कळले. ते समयी नावजी नाईक पंत मशार निल्हें समागमे होते. मशार निल्हे लष्करच्या व हशमाचे जमावानीशीं कुर्डा घाटाखाली

उतरून गनीमाशी गाठी घालून नतीजा पावविला. गनिमाचे किले विधीव (?) केले. बंद सोडविले. ते समयी मशार निल्हेनें जमावानीशीं तरवारीची शर्थ केली' (शि. च. सा. खं ५ ले. ९३९ पृ १८०)

स्वातंत्र्ययुद्धाच्या काळाचें सूक्ष्मावलोकन करितां असें दिसतें कीं, गडकोट घेण्याच्या बाबतींत मोंगलांनीं महत्प्रयासें किल्ले जिंकून घ्यावेत आणि तेथें कांहीं स्थिरस्थावर करावी, तोंच मराठ्यांनीं अचानक साहसी हल्ला करून ते क्षणार्धांत परत हिसकावून घ्यावेत; असें एकसारखें चाललें होतें. हा खेळ शाहू-महाराज दक्षिणेंत येईपर्यंत चालूच होता. वर उल्लेखिलेला कोरी-गडचा प्रसंग घडण्यापूर्वी कोरीगडसंबंधीं कांहीं भानगड झाली असावी, असें वाटतें. सनदा-पत्रांतील पृ. १७१-७२ यांवर एक पत्र आहे. हें श. १६१४ आषाढ शु. ८ (इ. स. १६९२ जून १२) चें आहे. त्यांत गुणाजी सावंत पदाती पंचसहस्री म्हणतो, ' धामधुमीचे प्रसंगी आपण श्री भीमाशंकरच्या डोंगरीं होतों. त्याशीं कोरीगड कुलाबेकरांनीं व रा. सोनजी फर्जंद ह्याकडील लोकांनीं हस्तगत केला. ' म्हणजे हा मोंगलांकडून मराठ्यांनीं घेतला असा अर्थ केल्यास, तो घेण्याचा आणखी एक प्रसंग म्हणतां येईल. काय असेल तें खरें. याच वेळीं शितगडचीहि भानगड झाली. तें प्रकरण पुढें येणारच आहे.

छत्रपतींचें स्वदेशीं आगमन

सतत बारा वर्षे अव्याहत परिश्रम करूनहि औरंगजेब टेकीस येईना. त्यामुळें छत्रपतींनीं त्याचा कर्नाटकांतील मुख्य सेनापति झुलपुकारखान याजकडे समेटाचें बोलणें लाविलें असावें, असें स्पष्ट दिसतें. चिटणिसी बखरींत तर तसा स्पष्ट उल्लेखच आहे. चिटणिसांनीं संभाजी व राजाराम यांचीं चरित्रें, खंडोबल्लाळ व गोविंद खंडेराव या पितापुत्रांनीं केलेल्या टिपणावरूनच, सजविलीं असल्यानें त्यांतील विधानें कांहीं तरी नसून तीं ऐतिहासिक चिकित्सेस चांगलींच उतरतात. इतिहाससंग्रहांत छापलेला गोविंद खंडेरावाचा वाका बारकाईनें पाहिल्यास तो अव्वल दर्जाच्या पुराव्यांत दाखल करण्याच्या खास किंमतीचा आहे. त्यांतील विधानांना जेधे शकावलीची चांगलीच पुष्टि मिळते. छत्रपतींचा दासीपुत्र राजा कर्ण याची हालचाल जेधे शकावलींत दिली आहे. 'श. १६१९ ईश्वर संवछरे–श्रावण वदी ११ सोमवार राजा कर्ण मोगलाईत पाठविला' ही नोंद व गोविंदराव चिटणिसाच्या वाक्यांतील 'राजा कणास हफ्त हजारी मनसब व त्यात चंदीचें ठाणे द्यावे असा मोगलांनी करार केला होता त्या भरावरी सारे आपणाजवळ ठेऊन घेतलें.'

हें विधान एकत्र वाचिलें असतां, झुलपुकारखान व राजाराम यांत श. १६१९ च्या श्रावणांत समझोता झाला होता हें स्पष्ट होत आहे. पण, ही झालेली दिलसफाई पुढें टिकली नाहीं. याला अनेक कारणें झालीं. मुख्य कारण मोगल सेनापति झुलपुकारखान, सादतखान व चिंकलीजखान यांतील आपापसांतील चुरस होय. झुलपुकारखान सर्वाधिकारी जरी होता, तरी त्याला बाकीचे दोघे

वेळीं अवेळीं विरोध करीत असत. राजारामानें झुल्पुकारखानाच्या हातांत हात घातलेला त्यांना आवडला नाहीं. शेवटीं, मोंगलांनीं कांहीं तरी सबब सांगून झालेला करार मोडला व 'मार्गेसर मासी शुद्ध ५ मोगलानी चंदीस वेढा घातला,' चिटणिसाच्या म्हणण्या-प्रमाणें झुल्पुकारखानाच्या संमतीनें 'पौष वद्य नवमीस राजाराम पळोन येलुरास गेले' आणि 'पौष वद्य १२ संक्रांतीचे दिवसी जुल्पुकारखानें दगा देऊन चंजी चेनगडचे गवीनें चढोन, घेतली' चिटणिशी वाक्यांत हा प्रसंग विस्तृत दिला असल्यानें त्याला डावलून पुढें जाववत नाहीं.

"त्या उपरी महिन्या दो आंत चंदीचे किल्यापैकीं कृष्णगिरीस फितवा जाला. राजधानी आंत होती. त्यास ठावकीच नाहीं. संक्रातीचे दिवसी सण म्हणोन लोक पक्कान्न भोजन करीत आहेत तों दोन प्रहरा दिवसा तटास घल होती ते उघडोन त्यामार्गें दाऊदखानाचे निशाण किल्यावरी गेले आणि शहराकडील अंगें उभें करून किल्यावरील व गोटातील तोफा होऊं लागल्या तेव्हा कळले. राज-गड जागा बिलंद आहे तेथें राजश्रीचे कबिले व वरकड मातबरांचे त्यांत आम्हाकडीलहि सारी गेली. त्या किल्यावरी खाली दोरी टाकून जुल्पुकारखानाचे निशाण आपले लोकानी घेतले. सारे जाग्यांत राजगड सिरा याजवरी निशाण जुल्पुकारखाचे म्हणोन याणींच चंदी फत्ते केली असे हाके पादशाहपावेतो जाहले तमाम लोक किल्यांत शहरांत शिरल्यावरी खास जुल्पुकारखान किल्यात येऊन सुभानजी आठपाडकर राजश्रीजवळ मातबर होता तों त्या समयांत खानास भेटून आपणास जर सरफराज कराल तरी आपण मातबर व मातबराचे कबिले धरून देईन म्हणोन बोलला मग यांस

बहुत उमेदवार करून राज्याचे बंगल्यांत नबाब बसले त्याजपुढें बसविला त्यांणी सांगितलें त्यांणीं दाखवून दिलें त्यास धरून कैद केले." (पृ. १०-११)

छ. राजाराम साहेब चंदींतून निसटले होते तरी त्यांचा परिवार अडकलेला होता. त्यांचा पुत्र राजा कर्ण हा याच वेळीं देवी येऊन वारला. बाकीचीं बायका-मुलें गणोजी शिर्क्यांनीं नबाबास अर्ज करून सोडविलीं. अशा रीतीनें खाशांची सुटका केल्यानंतर जुल-पुकारखानानें आपलें खरें स्वरूप प्रकट केलें. ' गणोबा मामा झाडा देऊन सुटले. वगैरे झाडे होऊन किरकोळ सुटले. ते असे जमा होऊन थोर थोर याणी देशास आले. मातबर धरले. त्याची येला-जहाल केली बायका धरिल्या त्या बाटविल्या.'

रायगड प्रसंगीं मोगलांनीं केलेल्या विश्वासघातावर चंदीस कळस चढविला. शिवाजीमहाराजांच्या मृत्यूनें मराठशाही कोलमडली नाहीं, संभाजीमहाराजांचा वध करून ती टेकीस तर आली नाहींच, उलट ती जास्तच जोमदार झाली. अतएव तिचें मरण राजा नाहींसा होण्यांत नसून तें दुसरीकडे शोधलें पाहिजे, हें मोंगलांनीं पक्कें ओळखून रायगड व जिंजी यांच्या पाडावानंतर कर्त्या लोकांच्या अमानुष कत्तली संकेतानुसार—केल्या, यांत शंका नाहीं. या वेळीं बहुधा कर्नाटकांतील मोंगलाची चढाई बरीचशी यशस्वी झाली व छत्रपतींना उर्वरित परिवारासह स्वदेशीं परतावें लागलें. ' फाल्गुन वद्य ७ भौमवासरीं राजाराम खेलणियासि आले. धनाजी जाधव येलुरास जाऊन घेऊन आले. त्यावर बेदरबख्तास बादशाहे नाम-जाद केले.' यानंतर महाराष्ट्रांत सहा महिने राहून छत्रपती पुनश्च ' श. १६२० बहुधान्य संवछर मार्गसीर मासी चंदीकडे गेले.

खेलणीयाहून गेले. त्यांच्या पाठीवरी बेदरबख्त गेला. ' यापुढील त्याच्या कर्नाटकांतील हालचालीचा जे. श. त अगर इतर मराठी पत्रव्यवहारांत उल्लेख नाहीं. ' फाल्गूनमासी राजाराम मागती चंदी प्रातीकडून फिरोन खिलण्यास आले. गदकाजवली शाहाजादीयास लढाई दिल्ही. ' यानंतर ते पुनश्च कर्नाटकांत गेले नाहींत.

या वर्षांत बादशहानें स्वत: मोहीम चालविली व महाराष्ट्रांत अगदीं कहर उडवून दिला. छत्रपतींनीं कार्तिकांत दक्षिण महाराष्ट्र सोडला आणि मावळच्या बिकट स्थळाचा आश्रय केला. ' कार्तिक मासी........राजाराम पलोन फौजेबरोबरी राजगडास गेला. त्याच्या पाठीवरी जुलपुकारखान आला. त्यास पाठीवरी पीडा करावयास पाठविला. ' आतां जरा येथें थांबून छत्रपति महाराष्ट्रांत आल्यावर त्यांनीं राज्यकारभारांत जो एक महत्त्वाचा फरक केला व ज्याचा आमच्या चरित्रनायकाशीं संबंध पोहोंचतो, त्याकडे वळूं.

खांदेपालट व त्याचीं कारणें

छत्रपति देशीं आल्यावर रामचंद्रपंतादिकांनीं त्यांच्या गैरहजेरींत केलेल्या राजसेवेचा एकंदर आढावा पुढें ठेवून मोठ्या नम्रतेनें विनंति केली, " इकडे राजाराम साहेबास रामचंद्र पंत हुकमतपन्हा व परशरामपंत व शंकराजीपंत व सर्वत्र एकत्र होऊन विनंति केली ' स्वामीचे राज्य आजपर्यंत कळलें, तसें राखिले. आतां स्वामींनी बंदोबस्त करावा ' म्हटल्यावर, स्वामीनी उत्तर केले कीं, ' पूर्वीं तुम्हीच केलात, पुढेंहि तुम्हीच करणार ' या प्रमाणे बोलोन वस्त्रे देऊन सन्मान केला "

यानंतर छत्रपतींनीं ज्याच्या त्याच्या कर्तृत्वाप्रमाणें त्याचा मोठा सत्कार करून भरीव देणग्या देऊन संभावना केली. ज्या कारणां-

करितां छत्रपतींना स्वदेशाचा त्याग करावा लागला, तीं कारणें विद्यमान असून उलट बाह्यत: वर्धमान झालेलीच दिसलीं. 'मराठे कर्नाटकांतच पुरे करूं' ही औरंगजेबाची घमेंड नाहींशी होऊन, या मोहिमेचा सोक्षमोक्ष महाराष्ट्राच्या रणभूमीवरच होणार हें त्याला कळून चुकलें होतें. तो आतां आंतून पुरा पोखरला होता. त्याचें एक एक सामर्थ्य उणें होत चाललें होतें. तो स्वत: थकत चालला होता. त्याच्या सरदारांत चुरस लागून बेदिली माजली होती. आपल्या पश्चात्, आपण जें केलें, तेंच आपलीं मुलें करणार, हें तो जाणून होता. खजिना रिता होत चाललेला होता. दीर्घकालच्या मोहिमेनें त्याचे सैनिक कंटाळून गेले होते. त्यांचें शौर्य, धैर्य रसातळास जाऊन त्यांचा ' आव ' त्यांला केव्हांच सोडून गेला होता. तशांत, चंदीला झुलपुकारखानानें बादशहाकरितां अगर स्वत:चें ध्येय म्हणून जे अत्याचार केले, त्यामुळें बादशाही लष्करांतील हिंदूंचीं मनें विदीर्ण झालीं व मराठे तर त्वेषानें सूडबुद्धीचे पवित्रे चाळूं लागले. छत्रपतींनीं, घाबरून म्हणा अगर रक्तपात टाळण्याकरितां म्हणा, देशीं आल्यावर, समेटाचा केलेला प्रयत्न त्यांच्या हाताखालच्या वीर मुत्सद्यांनीं हाणून पाडला व मोंगलांच्या लढाईला 'उस्सेभी जादा' तोंड देण्याकरितां कंबर कसली. मोंगल उत्तरेंत जें करीत आले, तेंच त्यांनीं नेहमींच्या रिवाजाप्रमाणें मराठ्यांवर केलें. पण येथें ते चकले. महाराष्ट्र त्यांचें आव्हान स्वीकारून बाह्या वर सारून नव्या जोमानें आखाड्यांत मिशा थरारून बेगुमानपणें नाचूं लागला.

छत्रपतींनींहि समेटाचा हात मागें घेऊन आपल्या दरबारच्या पावलावर पावलें टाकण्याचे ठरविलें, त्यांनीं आपल्या गैरहजेरींत

ज्यांनीं जशी कामगिरी केली, त्यांना योग्य पारितोषिक देऊन गौरविलें. शंकराजी नारायणांना खालसा मुलखांत ' साहोत्रा ', परमुलखांत ' दाहोत्रा ' आणि आपली कऱ्हाड प्रांताची ' देशमुखी ' वतनी करून दिली. वतन म्हणजे वंशपरंपरेनें चालणारी भाकरी. अशी मोठी भाकरी शिवशाहींत फारच थोड्यांच्या वांट्याला आली आहे. अशी ही यावत्चंद्रदिवाकरौ टिकणारीं चिरंजीव वतनें देतांना, छत्रपतींनीं सचिवाच्या कामगिरीचा घेतलेला आढावा अत्यंत अभिमानास्पद आहे.

' मदार-उल महाम ' किताब मिळतो

राजाराममहाराजांनीं झगड्याच्या यशस्वितेकरितां मोंगलाई कारभारांतील अनेक रीतिरिवाजांचें अनुकरण केलें. त्यांतच त्यांनीं कार्यकर्त्यांना दिलेल्या बहुमानांच्या पदव्यांचा अंतर्भाव होतो. रामचंद्रपंत, धनाजी जाधव, संताजी घोरपडे, दमाजी थोरात यांना अनुक्रमें ' हुकमतपन्हा ' ' जयसिंगराव ' ' ममलकतमदार ' ' रुस्तुमराव ' या पदव्या दिल्या असून, त्यांचा उल्लेख तत्कालीन पत्रव्यवहारांत पहावयास मिळतो. त्याचप्रमाणें शंकराजी नारायण सचिव यांस ' मदार-उल महाम ' म्हणजे ' दौलतीचे आधारस्तंभ ' हा किताब असून त्याचा उल्लेख अस्सल पत्रांतून आला आहे. शि. च. सा. खं. ५ ले. ९३, शि. च. सा. खं. ६ ले. १२१,

व म. इ. सा. खं. १५ ले. १६१ यांत ही पदवी शंकराजी नारायणाच्यापुढें लाविली आहे. हीं दोन्ही पत्रें अस्सल असून तीं छत्रपति राजारामहाराजांनीं लिहिलेलीं आहेत. पहिलें पत्र श. १६१६ चैत्र व. ४ (इ. स. १६९४ एप्रिल ३) चें आहे. तेव्हां हें पदवीदान श. १६१६ सालीं झालें असावें, असें आम्हांस वाटतें. कारण, या मागें या पदवीचा कोठेंच आढळ होत नाहीं.

' साहोत्रा ' ' दाहोत्रा ' आणि ' देशमुखी ' वतनी होते—

नवीन वतन कोणासहि द्यावयाचें नाहीं, हा शिवाजीमहाराजांचा दंडक एकीकडे ठेवून राजारामहाराजांस प्रसंगांवर नजर देऊन नवीन वतनें करून द्यावीं लागलीं. त्यांत त्यांनीं शंकराजी नारायणास ' साहोत्रा ' ' दाहोत्रा ', आणि ' देशमुखी ' हीं तीन वतनें करून दिलीं. वतन म्हटलें कीं, तें वंशपरंपरेनें चालावयाचें. तशीं हीं तिन्ही वतनें होतीं. पैकीं ' साहोत्रा ' हा शंकराजीपंतांचा मुलगा जनार्दन शंकर यांस दिला व 'देशमुखी' खुद्द शंकराजीपंतांस दिली. पैकीं ' साहोत्रा ' अद्याप सचिव घराण्यांत चालू आहे. छ. राजाराम महाराष्ट्रांत आल्यानंतर कर्नाटकांतील लढाया बंद होऊन महाराष्ट्रांत बेसुमार रणकंदन सुरू झालें व शंकराजीपंतांची तलवार क्षणाचा विसांवा न घेतां एकसारखी तळपूं लागली. अशा वेळीं हीं वतनें छत्रपतींनीं करून दिलीं आहेत, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. वतनें बहाल करतांना त्यांनीं शंकराजी नारायणाच्या कामगिरीचा घेतलेला आढावा त्यांच्या खऱ्या कर्तबगारीवर चांगलाच प्रकाश पाडतो, तो असा—

रा. भि. श. २६ श. १६२१ आश्विन व॥ १०
इ. स. १६९९ आक्टो ८

लेखक—श्री राजाराम छत्रपति

ज्यांस पत्र लिहिलें तो—शंकराजी नारायण सचिव महारुलमहाम

१ तुम्हीं स्वामीच्या पायाशीं एकनिष्ठता धरून, स्वामी कर्नाटक प्रांतीं गेलें तें प्रसंगीं, तुम्हीं या प्रांतीं राहोन संपूर्ण राज्य ताम्रानें आक्रमिलें होतें, तें पुनरुक्त हस्तगत केलें. शत्रू पराभवातें पावविला व स्वामीसच जें प्रांतीं शत्रूनें संकट केलें, ते समयीं सैन्यसंभार पाठवून, स्वामीचें संकट निरसन केलें. स्वामींच्या राज्यानिमित्य श्रमसाहस अतिशयेंसी करून स्वामीस संतोषी केल्यानिमित्त, तुमचें वंशपरंपरेनें चालविणें स्वामीस बहुत अगत्य, याकरतां परगणे कऱ्हाड येथील देशमुखीचें वतन खासा स्वामीचें पुरातन होते, तें चिरंजीव राजा कर्ण यांसीं दिल्हे होते. ते दूर करून, हल्लीं तुम्हांवरी कृपाळू होऊन, तुम्हांस नूतन वतन वंशपरंपरेनें अजरामऱ्हामत करून दिल्हे असें. व या वतनांस हक्कलाजिमा व इनामती व हसाफती व शिक्का, नांगर, मानपान पूर्वीं चालल्याप्रमाणें तुम्हांस चालविण्याची आज्ञा केली असे. तरी तुम्हीं देशमुखीचें वतन आपलें दुमाले करून घेऊन हक्क लाजिमा व इनामति व इसाफती, मानपान, शिक्का, नांगर अनुभवून वतनाची सेवा करून सुखरूप राहाणें. या वतनासंबंधें तुम्हापासोन दिवाणांत शेरणी रुपये ६००० साहा हजार घेतलें असेत. हें वतन तुम्हांस व तुमचें वंशपरंपरेस सुरक्षित चालेल. या वतनांस

व म. इ. सा. खं. १५ ले. १६१ यांत ही पदवी शंकराजी नारायणाच्यापुढें लाविली आहे. हीं दोन्ही पत्रें अस्सल असून ती छत्रपति राजाराममहाराजांनीं लिहिलेलीं आहेत. पहिलें पत्र श. १६१६ चैत्र व. ४ (इ. स. १६९४ एप्रिल ३) चें आहे. तेव्हां हें पदवीदान श. १६१६ सालीं झालें असावें, असें आम्हांस वाटतें. कारण, या मागें या पदवीचा कोठेंच आढळ होत नाहीं.

' साहोत्रा ' ' दाहोत्रा ' आणि ' देशमुखी ' वतनी होते—

नवीन वतन कोणासहि द्यावयाचें नाहीं, हा शिवाजीमहाराजांचा दंडक एकीकडे ठेवून राजाराममहाराजांस प्रसंगांवर नजर देऊन नवीन वतनें करून द्यावीं लागलीं. त्यांत त्यांनीं शंकराजी नारायणास ' साहोत्रा ' ' दाहोत्रा ', आणि ' देशमुखी ' हीं तीन वतनें करून दिलीं. वतन म्हटलें कीं, तें वंशपरंपरेनें चालावयाचें. तशीं हीं तिन्ही वतनें होतीं. पैकीं ' साहोत्रा ' हा शंकराजीपंतांचा मुलगा जनार्दन शंकर यांस दिला व 'देशमुखी' खुद्द शंकराजीपंतांस दिली. पैकीं ' साहोत्रा ' अद्याप सचिव घराण्यांत चालू आहे. छ. राजाराम महाराष्ट्रांत आल्यानंतर कर्नाटकांतील लढाया बंद होऊन महाराष्ट्रांत बेसुमार रणकंदन सुरू झालें व शंकराजीपंतांची तलवार क्षणाचा विसांवा न घेतां एकसारखी तळपूं लागली. अशा वेळीं हीं वतनें छत्रपतींनीं करून दिलीं आहेत, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. वतनें बहाल करतांना त्यांनीं शंकराजी नारायणाच्या कामगिरीचा घेतलेला आढावा त्यांच्या खऱ्या कर्तबगारीवर चांगलाच प्रकाश पाडतो, तो असा—

रा. भि. श. २६ श. १६२१ आश्विन व॥ १०
इ. स. १६९९ आक्टो ८

लेखक—श्री राजाराम छत्रपति

ज्यांस पत्र लिहिलें तो—शंकराजी नारायण सचिव महारुलमहाम

१ तुम्हीं स्वामीच्या पायाशीं एकनिष्ठता धरून, स्वामी कर्नाटक प्रांतीं गेलें तें प्रसंगीं, तुम्हीं या प्रांतीं राहोन संपूर्ण राज्य ताम्रानें आक्रमिलें होतें, तें पुनरुक्त हस्तगत केलें. शत्रू पराभवातें पावविला व स्वामीसच जें प्रांतीं शत्रूनें संकट केलें, ते समयीं सैन्यसंभार पाठवून, स्वामीचें संकट निरसन केलें. स्वामींच्या राज्यानिमित्य श्रमसाहस अतिशयेसी करून स्वामीस संतोषी केल्यानिमित्त, तुमचें वंशपरंपरेनें चालविणें स्वामीस बहुत अगत्य, याकरतां परगणे कऱ्हाड येथील देशमुखीचें वतन खासा स्वामीचें पुरातन होते, तें चिरंजीव राजा कर्ण यांसीं दिल्हे होते. ते दूर करून, हल्लीं तुम्हांवरी कृपाळू होऊन, तुम्हांस नूतन वतन वंशपरंपरेनें अजरामऱ्हामत करून दिल्हे असें. व या वतनांस हक्क-लाजिमा व इनामती व हसाफती व शिक्का, नांगर, मानपान पूर्वी चालल्याप्रमाणें तुम्हांस चालविण्याची आज्ञा केली असे. तरी तुम्हीं देशमुखीचें वतन आपलें दुमाले करून घेऊन हक्क लाजिमा व इनामति व इसाफती, मानपान, शिक्का, नांगर अनुभवून वतनाची सेवा करून सुखरूप राहाणें. या वतनासंबंधें तुम्हापासोन दिवाणांत शेरणी रुपये ६००० साहा हजार घेतलें असेत. हें वतन तुम्हांस व तुमचें वंशपरंपरेस सुरक्षित चालेल. या वतनांस

हिंदु होऊन कोणी इस्कील करील त्यांस वाराणशीमध्यें गोहत्या व ब्रह्महत्या केल्याचें पातक असें. व मुसलमान होऊन इस्कील करील त्यांस मक्केमध्यें सुवर मारल्याचें पातक असें. ऐशीं पातकें जाणोन तुम्हांस वतन सुरक्षित चालवितील. जाणिजे. निदेश समक्ष मोर्तब असे.' [कैफियती यादी वगैरे पृ. २०२, २०३]. याच वेळेला 'साहोत्रा' हेंहि वतन करून देण्याच्यापूर्वीं तो 'खंडेराव दाभाडे याजकडील जमावाचें वेगमीस दिल्हा होता.' तो दूर करून श. १६२१ त शंकराजीपंताचा मुलगा जनार्दन शंकर यांस वतन करून दिला. [पे. द. भा. ३१ ले. ७५ पृ. ६६] कैफियत यादी पृ. २०३ श. १६२२ अ. आश्विन व।। १४ च्या वतनपत्रांत या साहोत्रा वतनाची स्पष्टता केली आहे. "राजदेशमुखी दर सदे चौरोत्रा व सरदेशकुलकर्ण दर सदे दुवोत्रा एकूण दिवाण दस्ताचें बेरजेस रयत निसबत दर सदे साहोत्रा, हें वतन छत्रपतीच्या ताब्यांतील नव्या जुन्या मुलुखांत चालत होतें. त्याचप्रमाणें शत्रूच्या ताब्यांतील प्रदेशावरहि दाहोत्रा नांवाचा हक्क मिळत असे आणि तोहि याबरोबरच वतनी करून दिला होता. साहोत्र्यांतील कलमांखेरीज 'राजपदी दर सदे चौरोत्रा' ही बाब दाहोत्र्यांत जादा आहे. 'साहोत्रा' व 'दाहोत्रा' शाहूमहाराजांचें कारकीर्दींतहि चालू होता.

छत्रपति राजाराममहाराजांचा मृत्यु

राजारामाला छत्रपतिपद ही सुळावरची पोळीच झाली. त्याला क्षणाचाहि विसांवा मिळाला नाहीं. कर्नाटकांतून सुटल्यापासून तर त्याची एकसारखी कुत्तरओढ होत होती. ही सर्व दगदग त्याला अल्पायुषी करून शिवशाही पुनश्च भवचक्रांत गुरफटण्यास कारणी-

भूत झाली. अखेर श. १६२१ त छ. राजाराम महाराज नवज्वरानें सिंहगड येथें दिवंगत झाले !

या नव्या संकटानें शिवशाहीला वांचविण्याकरितां वीर-कंकण हातीं बांधलेला महाराष्ट्र नामोहरम न होतां अधिकच चेतला व त्यानें मोंगलांचें युद्ध राजारामाचा अल्पवयी मुलगा दुसरा शिवाजी यास छत्रपतिपदावर बसवून नेटानें चालविलें. या शिवाजीची आई ताराबाई ही मोठी जहांबाज बाई असून मराठीशाहींतील राजकारणी स्त्रियांत अग्रगण्य होती. तिनें मराठी राज्याचीं सूत्रें हातीं घेऊन स्वातंत्र्ययुद्ध नेटानें पुढें चालविलें.

छत्रपति दुसरा शिवाजी

राजारामाच्या मृत्यूनंतर रामचंद्रपंतादिकांनीं त्याच्या सुतकांत पुणें प्रांतीं मोंगलांना असा कांहीं तडाखा दिला कीं, पुसूंच नका.

[राजारामानें शेवटीं जी जालनापुरापर्यंत स्वारी केली, त्या वेळीं त्यानें] " पुणें मुक्कामी पंचवीस हजार फौज व शंकराजी नारायण व परशराम त्रिंबक ठेऊन आम्हास बलकुबल (जरूर पडल्यास,) कुमक करावी " [६३]

[राजाराम मृत्यु पावल्यावर बादशाही फौजा आल्या, त्याच्या प्रतिकारार्थ] 'तेव्हा वजीरांनी पाठविल्या त्या कडवलीत फौजा आल्या म्हणोन अमात्य यांस सिंहगडी कळले. शत्रूसमीप लाखो फौजा घेऊन आले [एक] यजमान वारले एक कैदेंत. असो. धन्याचे पायाच्या प्रतापाचा आश्रय करून अमात्य रायानी धनसिंग जाधवराव सेना-

पति, संताजी घोरपडे ममलकत मदार रवाना केले .... बहादर शहाजंग व शंकराजी नारायण मदारूल महाम........हजार फौजेनिसी पुणें मुक्कामीं ठेविले. आपण सिंहगडचे माचीचे मैदानांत दाहा हजार फौजेनिसी राहिले. सेनापति [याणी] भीमा उतरून शास्तेखानाशी लढाईं दिली. ती अती तुंबल जाहली. महाराज असतां लढाया झाल्या, त्यापेक्षां अति वीरश्रीनें लढाई केली. शास्तेखान याचा नाश होऊन औरंगाबादेस परत गेला. बादशहास वाटलें कीं, " हिन्दूची पराकाष्ठा आहे " [पृ. ६९] हा उतारा बखरींतील आहे तेव्हां त्यांतील किरकोळ चुकांकडे दुर्लक्ष केलें पाहिजे. उदाहरणार्थांत यांतील संताजी घोरपडयाचा उल्लेख अस्थानीं होय-कारण यापूर्वींच तो मरण पावला होता[१]. असें जरी आहे तरी त्यांतील इतर मजकुराला गोळाबेरीज अर्थानें बाध येऊं नये.

त्यानें बादशाहाची पुनश्च धांग उतरली व त्यास, ' कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें' याचा प्रत्यय येऊन चुकला. याच वेळीं मराठी दरबारांत महत्त्वाची घटना जन्माला (घडून) आली. राजारामाच्या मृत्यूनंतर रामचंद्रपंत हुजूर गेले व शंकराजीपंत स्वस्थानीं परत आले.

[या पत्रांतील उतारें] [अत्रे पुरंदरेवाद] इ. १७०३ नोव्हें. १० " तो आमातेपंत विशाळगडास गेले. सचिवपंत हे जिल्हेस आले त्यास हकीकत सांगितली, त्यावरून बाळाजी विश्वनाथ सुभेदार सुभा पुणे यास कागद दिल्हे कीं पुरंधरे याची कथला कुलकर्णीची मनास आणून लेहून पाठवणें की, पत्रे घेऊन सुभ्यास गेलो सुभ्याची बसकार घ्याकी तेथून राजश्री शंकराजी पंताचे पत्र दुमाल घ्यावे, तो

'१. १६२९ ईश्वर संवछरे आषाड यासी संताजी घोरपडे यासी. नागोजी माने याणी माहादेवाजवळ दगा देऊन मारिले ' (जे. श.)

ते प्रतापगडास आले हे जिल्हेस आले यावर समक्ष गोताचा महजर घेऊन त्याजवळ जाऊन वर्तमान सांगितले " [ऐ. स. सा. सा. ३ पृ. ९७] "तेव्हां आत्रे याणी राजश्री शंकराजीपंत सचीव याला सांगोन आपला भाऊ गोमाजी विश्वनाथ पुरंदरे याला धरून नेऊन राजगडावर घातले आहे " [सदर पृ. ९८]

संभाजीमहाराजांचा पुत्र शिवाजी ऊर्फ शाहू मोंगलांच्या कैदेंत होता व राजाराममहाराजांचा पुत्र धा शिवाजी अल्पवयी होता. राजाराममहाराजांस ताराबाई व राजसबाई या दोन लग्नाच्या बायका व कांहीं उपस्त्रियाहि होत्या. ताराबाईचे पोटीं धा. शिवाजीचा जन्म जिंजी येथें 'श. १६१८ ज्ये. व. ४ मध्यें झाला. (जे. श.) राजसबाईलाही संभाजी नांवाचा मुलगा होता. याचा जन्म श. १६-२० ज्ये. व. ८ मध्यें झाला' (ग. प्र. श.) अशा स्थितीत मराठ-मंडळानें ताराबाईचा मुलगा शिवाजी याचें मंचकारोहण करून धनी केलें व शिवशाहीचा गाडा पुढें चालविला. हा शिवाजी अल्पवयी असल्यानें राज्यकारभाराची जबाबदारी त्याची आई तारा-बाई इजवर येऊन पडली. सर्वाधिकारी रामचंद्रपंत झाले.

पंतांचें वैशिष्ट्य: स्वत: ते कर्तृत्ववान् तर होतेच, पण त्यापेक्षां त्यांची योग्यता त्यांनीं अनेक कर्तीं माणसें निर्माण केलीं, या बाब-तींत फार मोठी आहे. सबंध मराठी राज्यांत शककर्ते शिवाजी-महाराज, रामचंद्रपंत व थोरले बाजीराव हे तीनच काय ते पुरुष आपणाभोंवतीं महत्त्वाची प्रभावळ निर्माण करूं शकले. हे तिघे व त्यांची प्रभावळ यांनींच मराठ्यांचा भगवा झेंडा अटकेपार नेला व जगाच्या इतिहासांत त्यांना महत्त्वाचें स्थान मिळवून दिलें. राम-चंद्रपंत व त्यांची प्रभावळ नसती, तर औरंगजेबाच्या तडाख्यांतून

शिवशाही वांचण्याची मुळींच आशा नव्हती. असो धा. शिवाजीला राज्याचे धनी करून मराठे मोंगलांशीं झगडूं लागले.

धनाजी, खंडोबल्लाळ, केसो त्रिमळ वगैरे जुन्या राजकार्य-धुरंधरांना परशराम त्र्यंबक, गिर्जोजी यादव, खंडेराव दाभाडे इ. नवीं माणसें येऊन मिळालीं व त्यांनीं आपल्या कर्तृत्वानें मोंगलांस ‘ पळतां भुई थोडी ’ केली. ताराबाईचे व पंतांचें तीन एक वर्ष ठीक चाललें, पण पुढें त्यांत फाटे फुटण्यास सुरुवात झाली. तिचा मुलगा शिवाजी व्रतबंध करण्याच्या वयांत आल्यावर ताराबाईनें त्याच्या मुंजीची गोष्ट पंताजवळ काढली. तेव्हां ‘ इतक्यांत घाई कशाला ? शाहूची मुंज अद्याप व्हावयाची आहे. तर दोघांच्याहि बरोबरच करतां येतील, ’ असें त्यांचें म्हणणें पडलें. पण त्यांचा हा सल्ला बाईला पटला नाहीं. अखेर हें मुंजीचें प्रकरण जो तो आपआपल्या परी ताणूं लागला. शेवटीं उभयतांत तडजोड झाली नाहीं व पंत राजसंन्यास घेऊन घरीं बसले. ही घटना श. १६२५ त जन्माला आली असावी. अर्थात् यापुढील राजकारणाशीं पंताचा, ‘ समयी गोष्टी सांगेन युक्तीच्या चार । ’ यापेक्षां जास्त संबंध राहिला नाहीं. पंत घरीं बसल्यावर परशराम त्र्यंबक व गिरगोजी यादव हे दोघेच ताराबाईचे मुख्य सल्लागार होते. परशरामपंत पंतांचें शिष्य होते, यांत शंका नाहीं. पण, गिरजोजी यादव हा त्याच्या शिष्यशाखेंत मोडत असेलसें वाटत नाहीं. हा बहुधा ताराबाईच्या मर्जीतला, म्हणूनच उच्चस्थानीं बसला असावा. यहुधा यांत कर्तृत्वाचा विशेष संबंध दिसत नाहीं.

दरबारांत अशी महत्त्वाची उलथापालथ झाली, तरी शंकराजी नारायणाचें स्थान अबाधित होतें. त्याचा औरंगजेबाशीं दणका-

दणकी करण्याचा क्रम उत्तरोत्तर वाढतच होता. मराठ्यांचें सामर्थ्य त्यांच्या गडकोटांत सांठविलें आहे व तें संपूर्ण ताब्यांत घेण्यावांचून गत्यंतरच नाहीं, अशी मोंगलांची खात्री होऊन चुकली होती. त्याचप्रमाणें मोंगलांनीं कितीहि आटापिटी करून तें ताब्यांत घेतले, तरी तें त्यास आपण पचूंच देणार नाहीं, इतका मराठ्यांचा आत्मविश्वास अनुभवानें बळावला होता.

तेव्हां मराठ्यांनीं एक नवीनच उपक्रम सुरू केला. कोणताहि गड वेढा देऊन वारेमाप नुकसान सोसल्यावांचून मोंगलांना मागेंहि घेतां आला नाहीं व आतांहि घेतां येत नव्हता. त्याच्या उलट मराठ्यांची स्थिती होती. जे किल्ले शेंकडों माणसें बळी देऊन व लाखों रुपयांचा कित्येक महिने चक्काचूर करून मोंगलांनीं जिकले, ते किल्ले एका रात्रींत मराठ्यांनीं घेतल्याचीं उदाहरणें आपल्यासमोर आहेत. त्यामुळें नुकसानी फारशी न होऊं देतां, मोंगलांचा दम पुरा झाल्यावर, त्यांजकडून मनसोक्त पैसा हाबकून गड सोडावयाचे असा नवाच गनिमी पवित्रा मराठ्यांनीं इतउत्तर टाकलेला दृष्टीस पडतो.

त्यांनीं मोंगलांना दीर्घकाल किल्ले पचूंहि दिले नाहींत. मोंगलांनीं किल्ले घेतले रे घेतले, कीं ते अकस्मात् मराठ्यांनीं एका रात्रींत छिनावून परत घेतलेच, म्हणून समजावें. हा सर्व खेळ शंकराजी नारायणाच्या जिल्ह्यांत विशेषत: चालू होता. सचिव व त्याच्या हाताखालचे मराठे यांनीं गडकोटांच्या लढाईंत मर्दुमकीची पराकाष्ठा करून स्वातंत्र्य टिकविण्याकरितां हाडाचीं काडें करून प्रसंगोपात देहार्पणहि केलें. मराठ्यांनीं बादशहास अगदीं हैराण करून सोडलें होतें.

सातारा

'श. १६२१ प्रभावी संवत्सरे मार्गस्वर मासी आवरंगजेबे वसंतगड घेऊन सातार्‍यास वेढा आपण जाऊन घातला.'

'श. १६२२ विक्रम संवत्सरे चैत्र शु॥ १३ सातारगड सुभानजी भाडवलकर याहि सलाह करून (सातारा) गड पातशहास दिल्हा'

परळी

'श. १६२२ विक्रम संवत्सरे + + + मासी पातशहानी परळीस जाऊन वेढा घातला.'

'आषाढ मासी आवरंगजबे सलाह करून परळी घेतली आणि भूषण गडानजीक माइणीवर स्वारी केली'

पनाळा

'श. १६२२ विक्रम संवत्सरे मार्गशीर्ष मासी जुलबुगारखान व बेदरबंख्त यानी पनालीयाला वेढा घातला. फाल्गुण शु॥ १३ आवरंगजेब पनालीयासि आले पर्वसासि ला जा केले (?)' श. १६२३ वृष संवत्सरे ज्येष्ट व॥ १४ द्रव्य ५५ हजार (रुपये) देऊन किला पनाळा घेतला. पातशाहा छावणी करावयासि बुधपाचेगांवास गेलें'

चंदन वंदन व नांदगीर

'श. १६२३ वृष संवत्सरे भाद्रपद मासी बहिरमखान जाऊन चंदन वंदन व नांदगीर सलाह करून घेतला'

खेळणा

'श. १६२३ वृष संवत्सरे मार्गस्वर मासी आवरंगजेब येऊन

खेळणीयासि वेढा घातला. गाजदीखानास मार्ग चालवावयासि ब्रह्मपुरीस ठेविलें.'

'श. १६२४ चित्रभानू संवत्सरे ज्येष्ट वद्य ७ खेळणा दोन लाख रुपये देऊन परशराम पंतापासून किला घेतला आणि पनाल्याजवळी वडगांव-आहे, तेथें छावणी केली. पावसानें लष्कर फार मेलें ?'

कोंडाणा ऊर्फ सिंहगड

'श. १६२४ पौष मासी पातशहा येऊन कोंढाणियासि वेढा घातला. तेच मासी नेमाजी सिंदा व केसोपंत नर्मदेपलीकडे जाऊन सिरोज मारली.'

'श. १६२५ सुभान नाम संवत्सरे वैशाख शु॥ नवमीस कोंढाणा सला करून घेतला. रुपये पन्नास हजार दिल्हे. मग पुणियामध्यें येऊन छावणी केली. तेच वरशी प्रजान्य जाऊन देशांत दुष्काळ पडला.'

'श. १६२१ आषाढ मासी कोंढाणा माळा लावून मऱ्हाठीयानी घेतला'

'माघ व॥ १ प्रतिपदेस नवाब जुलपुकार खानासमागमे राजश्री शाहू राजे जाळीतून काढून दिल्हे आणि पातशाहा कूच करून फालगून सुध ६ अहमदनगरास येऊन मुक्काम केला'

'श. १६२९ व्यय संवत्सरे चैत्र मासी कोंढाणा जुलपुकारखानाने द्रव्य देऊन कबज केला'

राजगड

'श. १६२५ सुभान नाम संवत्सरे कार्तिक शु॥ १४

पुणियाहून कूच करून पातशाहा जाऊन राजगडास वेढा घालून बैसले '

" माघ वद्य नवमीस राजगड पातशाहानी सला करून घेतला फालगूण मासी तोरण्यासि...'

राजगड प्रसंग—

श. १६२५ कार्तिक शु ।। १४ स्वत: अवरंगजेबानें राजगडास वेढा घातला. व पुढें तो माघ वद्य नवमीस सला करून घेतला. याच्या दरम्यानचें काळांत गडावर गडकऱ्यांनीं बादशाही फौजेसी चांगलीच टक्कर दिली. राजगड किल्ल्याच्या पद्मावती, सुहेला व संजीवनी अशा तीन माच्या असून त्या तिन्ही ज्या ठिकाणीं एकत्र मिळतात, त्यावर बाले किल्ला आहे. या तीनही माच्या तट, बुरूज इत्यादिकांनीं सुसज्ज असून मोठ्या मजबूत आहेत. किल्ल्याचें संरक्षक गडकऱ्यांपैकीं संताजीराव सिलंबकर व महिपतराव सिलंबकर हे दोघे होते. पैकीं, संताजीराव सुहेलेचे खास मोर्चावरील एक अधिकारी होते. श. १६२५ मार्ग. व. ७ च्या पत्रांत खास छ. शिवाजी महाराजांनीं संताजीरावास गौरवपर पत्र पाठविलें. ' अवरंगजेब किले राजगडास बिलगला आहे. मोर्चे चालवून यालगार—करितो. परंतु, त्याचा हिसाब न धरितां, शर्तींनसी नतीजा पाठवितां, म्हणून........शंकराजी पंडित सचिव याणी लिहिले व सांप्रत तुमचें मर्दानीचे वर्तमान राजश्री सोनजी फर्जंतू याणी लिहिलें........' ' पुढेहि एकच रितीनें अवरंगजेबास नतींजा पावऊन फत्तेचे वर्तमान लिहून पाठविणें. स्वामी तुमची सर्फराजी ? करतील. स्वामीकार्याविसी मशारनिल्हेचे आज्ञेप्रमाणें वर्तणे........तेणेप्रमाणें करीत जाणें ' हें पत्र

संताजीरावांनीं पाहिलेलें नसावें. कारण, या पत्रानंतर केवळ तीनच दिवसांनीं लिहिलेल्या पत्रांत ते सुहेलेचे खास मोर्चावर अवरंगजेबानें केलेला एलगार परतवीत असतां अकस्मात् भांड्याचा गोळा लागून स्वामीकार्यीं खर्चीं पडल्याचा उल्लेख आहे. ही दुःखद वार्ता राजगडास लागूनच असलेल्या तोरणा गडावर असलेल्या सचिवास कळतांच, त्यांनीं त्याचा मुलगा प्रतापराव यास सांत्वनपर पत्र पाठविलें. प्रांत मावळचा सुभेदार शामजी हरी यास पाठविलेल्या पत्रांत संताजीरावांनीं देह कसा धारातिर्थी ठेवला, तें पंत सचिव सांगतात. " म।। प्रतापजी (संताजी !) हैबतरांव सिलंबकर वतनामुळें राजगडवर नामजाद ठेविलें होतें. अशास किले मजकूरास अवरंजेबाचा परीघ आला. खासा मोर्चा माची सुवेला किले मजकूर तेथे तटानजिक भिडला आणि लगट केला.....तेसमई संताजीराव याणी हिमत धरून गनीमासी युद्धप्रसंग शर्तीनसी करून गनीम मारून काढीला तों अकस्मात गनिमाकडील भांडियाचा गोळा येऊन लागतांच स्वामीकार्यावरी ठार जाले. संताजीराऊ याणी शर्ती करावयाची, तैसी केली. गनीम मारून काढीला. मशारनुले स्वामी कार्यावरी खर्च जाले ' सचिवांनी त्याच्या पुत्राचा व स्त्रीचा ओला सत्कार केला. ' अशास संताजीराऊ थोर कामाचें मर्द व एकनिष्ठ होतें. त्यांनी आपला पुरुषार्थच संपादून घेतला. या करितां तुमचें सर्व प्रकारें चालविणें अगत्य आहे.' ' तरी आपलें माईचें बहुता रिती समाधान करून सांगणें प्रस्तुत खर्चास बराबरी नरस प्रभु रुपये ४० व तुम्हास मंदील व तुमचे मातेस पातळी जरी व चोळी पाठविली आंहे, हे घेणें. पुढेही वरचेवरी कबिल्याचा परामर्ष तो केला जाईल.' ' तुम्हास इनाम गांव

देण्याचा तह केला आहे. तरी, बारा दिवस जालिया उपरी मकाजी सिलंबकर यास पाठवून देणें, त्या बराबरी कोणता गांव इनाम द्यावा तो सांगोन पाठविणें. त्याप्र॥ सनद करून दिली जाईल. तुम्ही आपल्या दिलास सर्व प्रकारें जपणें. असो.' (म. इ. सा. खं. १७ ले. २९ व २४).

संताजीरावाच्या घराण्यांत परंपरागत पराक्रम चालत आला होता. यांचे बंधु सूभानजी राउ हे मागें १६२२ सालीं 'किले पुरंधरीचे धारेस भांडणी पडलें होते' त्यां वेळीं त्याची स्त्री व मुलें लहान होतीं. त्यांचे संरक्षणार्थ मौ. सोनवडी, ता. गुंजण मावळ, या गांवीं एक खंडी जमीन इनाम दिली होती. प्रतापरावानें पुढें त्याचे मातोश्रीचा योग्य परामर्ष घेतला. 'अशास त्याची (संताजी-रावाची) स्त्री गोदावरीबाई यांची साडीचोळी पाहिली पाहिजे. याकरितां यास साडीचोळीची मोईन (?) सालीना होन प॥ १०० एकसे रास केले असेत' 'जोवरी गोदाताई जिवंत आहे, तोपर्यंत साल दरसाल पाठवीत जाणें' प्रतापराव लहान होता, म्हणून तो पोख्त होईपर्यंत त्याची देशमुखी त्याची आई गोदाबाई हिनें करावी अशी सवलत दिली. शिवाय देशमुखीचे इनामावर तिजाई व हकावर चौथाई दिवाणांत घेत असत, तीहि याला सालोसालची माफ केली. देशमुखीच्या हक्कांत रयत निसबत वाढ. सेना पंच-सहस्रीचा अधिकार.

याच प्रसंगीं माची पद्मावतीचा सदर सरनोबत सिदोजी थोपटे हाहि मोठा पराक्रम करून खर्ची पडला. तो प्रसंगहि वीरोचित असाच आहे. 'चिमणाजी थोपटे याचा बाप सिदोजी थोपटे यास माची पदमावती, किले राजगड, येथील सदर सरनोबती

होती. त्यास अवरंगजेब पातशहा राजगडास वेढा घालून बैसला होता ते प्रसंगीं वेढीयात याणी (राहोन) कष्ट मेहनती केली. पातशाही मोर्चा सुवेलेच्या नरश्यास होता, तेथे सुलतानवाढवा जाला आणि बरसा घेतला ते समयी याणी युध शर्तीनसी केलें. त्यायुद्धां-मध्यें भांड्याचा गोळा लागोन जागीच ठार जाले. स्वामी कार्यावरी पडलें' पुढें यांच्या कुटुंबपोषणार्थ मौ. खानापूर ता. रोहिडखोरे व मौ. पिपरे खुर्द प्रां. शिरवळ येथें इनाम जमिनी दिल्या (त्रै. व ९ अं. ३ पृ. ६०–६२) राजगड प्रसंगीं शिलंबकर व थोपटे या मराठा सरदारांनीं केलेला पराक्रम औरंजेबाचे नाशास कारणी-भूत झाला.

श. १६२५ फाल्गु. शु. ४
इ. १७०४ फेब्रु. २७

' इनाम जमिन—खंडोजी थोपटे व सिदोजी थोपटे सर नाइक किले सिंहगड ' याणी विनंती केली कीं, ' किले मजकूरीची सर-नाइकी आपली वतनी आहे. ऐशास आपण या राज्यांत पूर्वीपासून कष्ट मेहनत केली आहे.'

' सिंहगड व राजगड या किल्यास औरंगशहा पातशहा वेढा घालून बैसला होता, ते समयी दोन्ही किल्यावरी वेढियांत राहोन कष्टमेहनती केली. आणि आपल्यास इनाम जमिन नाहीं.'

' मनास आणिता यांणी सिंहगडी व राजगडी वेढीयांत किल्यावरी राहोन कष्टमेहनत केली स्वामी कार्याचे एकनिष्ठ यांचे चालविणें अगत्य.' [स. प. पृ. १९०] [श. १६२५ फाल्गु. शु. ४ (२७।२।१७०४)] 'माळा लावून [बादलहानें] घेतला.'

लोहगड

'श. १६२६ पौष मासी लोहगड मराठ्यानी माळा लावून घेतला.'

या वेळच्या झगड्यांत मराठ्यांनीं एक नवीनच तंत्र उपयोगांत आणिलेलें दिसतें. शक्य तोंवर किल्ले लढवून बोहशहाची खराबी करावयाची आणि शेवटीं मोठी रक्कम घेऊन ते त्यास द्यावयाचे. या योगानें मराठ्यांनीं एका गोळीनें दोन पक्षी मारण्याचे श्रेय संपादिले. बादशाही फौजेची खराबी व त्याच्या खजिन्याला गळती लावणें हीं दोन्हीं कामें यांत साधत होतीं. आतापर्यंतच्या अनुभवावरून कांहीं झालें तरी मोंगल हातीं आलेलें किल्ले टिकूं शकत नाहींत, ही मराठ्यांची खात्री होऊन चुकली होती व शेवटीं तसेंच झालें.

शितगड—

हा गुणाजी सावत यानें 'गनीम मारून काढून हस्तगत केला. श. १६१४ आषाढपूर्वी (इं. स. १६९२ पूर्वी जून) गड घेतला, तेंव्हां त्यांत धान्यसंग्रह पहातां केवळ १॥ मण नागली होती. ही बातमी जुन्नरास कळली. तेंव्हा तेथील मोंगलांचा सरदार अलीबेगा जमावानिशीं जुन्नरींहून स्वार होऊन शितगडचें माचींस येऊन वेढा घालून बसला. त्यामुळें गडावर खालून मदत आणण्याचा मार्ग खुंटून, वरील लोकांची उपासमार होऊं लागली. गुणाजीनें जवळच्या कोरीगडच्या लोकांकडे जाऊन वेढा मारून काढण्याकरितां मदत मागविली, पण ती त्यांस मिळूं शकली नाहीं. तो बाहेरच होता. शितगडांवर त्याचा भाऊ राजाजी सावंत होता. 'मागें आलीबेगानें गडावरील लोक होतें, त्याशीं राजकारण केलें. आमचा भाऊ राजाजी सावंत होता. त्याशीं पांचशें रुपये देऊं केले.

लोकांनीं भक्षावयासी नाहीं, याकरतां धीर सोडीला. याकरतां पांचसे रुपये घेऊन गड द्यावा ऐसा निर्वाह अलीबेगाशीं केला. त्यांवरीं त्यानें पांचसें रुपये गडावरी पाठवून कौलगड घेतला. नेहमीच्या मुसलमानी पद्धतिप्रमाणें गड हातीं येताच 'कौल' न टिकतां जुन्नरकरानें राजाजी सावतांसह सर्व लोक कैद केलें व ५०० रुपयेही परत घेतलें.' अशा रीतिनें तेल व तूप जाऊन धुपाटणें मात्र हातीं आलें. पुढें गुणाजीनें महत्प्रयासें भावाची सुटका केली. अशा रीतीनें गड हातचा गेल्यावर शंकराजीपंतीं चांदजी कदम या सरदारांबरोबर जमाव देऊन तो परत घेण्यास पाठविला. त्याबरोबर गुणाजी सावंतही होते. त्यांनीं राजकारणाला राजकारण करून पुनश्च गड घेतला. अशा रीतीनें उजळमाथा झाल्यावर सावंतबंधूंनीं मागें झालेला 'लौकिक' दूर व्हावा म्हणून आपली एकंदर खरी खरी हकिकत सादर केली. वास्तविक प्रकार ध्यानांत घेऊन सावंत बंधूकडे अन्याय नाहीं असें पाहून पंतांनीं अभय दिलें. 'ऐसाशीं गनिमानें गडांस वेढा घातला. गडांवरीं भक्षावयासी नव्हतें. तें समयीं गनिमानें हुन्नर भरोन दगा दिल्हा. ये गोष्टीचा अन्याय तुमचा काय आहे ? हल्लीं तुम्हीं व राजाजी सावंत व वरकड तुमचें भाऊबंद एकनिष्ठेनें सेवा करीत आहां. तुम्हांस ये गोष्टीचा अन्याय लागणार नाहीं. एविषयीं समाधान असूं देणें.'

औरंगजेबाच्या हालचाली
व
त्याचा मृत्यु

मागील प्रकरणांत मराठे पवित्रा बदलून किल्ल्याचा जो खेळ खेळले, तो आपण पाहिलाच आहे. त्यापासून मोंगलास तात्पुरता आनंद झाला. पण मराठ्यांची द्रव्याची लंगडी बाजू त्यामुळें सावरली व तेच या तंत्रानें अंतीं विजयीं झाले, असें म्हणावें लागतें.

छ. राजारामसाहेब पुन्हा देशी आले, तेव्हां खासा औरंगजेब कृष्णाकांठीं ब्रह्मपुरीस छावणी करून होता. आणि तेथूनच तो हालचाली करीत होता. त्यानें श. १६२१ मार्ग० (इ. १६९९ नवें.-दिजं.त) वसंतगड घेऊन साताऱ्यास वेढा घातला. इकडे धनाजी जाधवानें). 'पौषांत ब्रह्मपुरीं असलेले बादशाही बुलंगे लुटले.' इतक्यांत फाल्गूनांत छ. राजारामसाहेब मृत्यू पावले व त्यांचे पुत्र दु. शिवाजी राजे यांची कारकीर्द सुरू झाली.'

यानंतर बादशहा मराठ्यांचे महत्त्वाचे किल्ले घेण्यांत आपलें शक्तिसर्वस्व खर्चूं लागला. त्या वेळीं मराठ्यांची न्याय्य बाजू म्हणूनच कीं काय निसर्ग त्यांची साथ करूं लागला. बादशहाचा मुक्काम माणनदीच्या कांठीं मायणीजवळच्या खवासपुरी असतां तिला पूर येऊन त्याचें लष्कर फार वाहवलें (श. १६२२ कार्तिक). येथूनच त्यानें सातारा, परळी वगैरे किल्ले घेतले आणि कोल्हापूर प्रांतीचे गड घेण्याकरितां ढाला फिरविल्या. 'त्यानें स्वतः पान्हाळ्यांस वेढा घातला.' (श. १६२२ फाल्गुन). तीन महिन्यांत तो घेऊन त्यानें या पावसाळ्याची छावणी बूध-पाचेगांवास केली.

श. १६२४ ज्ये. (इ. १७०२ मे-जून) विशाळगड ऊर्फ खेळणा घेतला आणि पन्हाळ्याजवळच्या वडगांवीं छावणी टाकिली. मराठ्यांचा पाठीराखा निसर्ग येथेंहि त्यांच्या मदतीस सज्ज होताच. पावसानें व गारगुंडा होऊन या छावणींत त्याचें लष्कर फार मेलें.

आतां मराठे फारच धीट झाले होते. त्यांनीं मोंगलाचा उत्तरेकडून येणारा मदतीचा प्रवाह बंद पाडण्याकरितां नर्मदापार होण्याचे प्रथम धाडस केलें. ' श. १६२४ पौष मासीं नेमाजी सिंदा व केसोपंत नर्मदेपलीकडे जाऊन सिरोज मारिली' (ग. प्र. श.).

यानंतरच्या बादशहाच्या हालचाली शंकराजी नारायणाचे जिल्ह्यांत सुरू झाल्या. श. १६२४ च्या पौषांत त्यानें कोंढाणा ऊर्फ सिंहगड यास वेढा घातला व तो श. १६२५ वैशाखांत (इ. १७०३ एप्रिल-मे) सला करून घेतला. या पावसाळ्याची छावणी पुण्यास झाली. हें साल खरपाडाचें होतें. पाऊस जाऊन दुष्काळ पडला व खरोखरच पांचावर धारण बसली. याचा तडाखा वऱ्हाड-खानदेशाला फार बसला. मराठे आतां मैदानी लढाया खेळूं लागले. ' श. १६२५ मार्ग. (इ. १७०३ नवें-दि.) मासीं नेमाजी शिंदे व केसोपंती सर्जाखानासी लढाई करून कैद केला. दोन हजार घोडे आकरा हत्तीं घेतलें तीन लाख रुपये घेऊन सोडून दिल्हा. ' ही लढाई पुण्याजवळ झाली कां दुसरीकडे कोठें झाली याचा खुलासा होत नाहीं. बादशहाचा किल्ले घेण्याचा नाद चालूच होता. त्यानें सालअखेर राजगड व तोरणा घेतले. या सालीं मराठ्यांनीं पुन्हां एकदां नर्मदापार स्वारी केली. ही पहिलीपेक्षां मोठी होती. ' श. १६२५ माघ मासीं (इ. १७०४ जा.-फे.) नेमाजी सिंदा व केसोपंत व परसोजी भोसले पन्नास हजार स्वार मिळोन

नर्मदा उतरोन कालाबागपावेतो गेले त्याचे पाठीवरी गाजदीखानास रवाना केले' (ग. प्र. श.). आतां मात्र बादशहा अगदींच निराश झाला, व तो काढता पाय घेऊं लागला. श. १६२६ वैशाखांत (इ. १७०४ एप्रिल-मे) त्यानें पुण्याचे उत्तरेस पंचवीस मैलांवर असलेल्या भिमेच्या कांठच्या खेड-कडूसावर लष्करचा तळ टाकला. हें प्रयाणाचे प्रस्थानच म्हणायचें. त्याची पाठ फिरतांच गेलेले मावळांतील गड सचिवानें घेण्याचा चंग बांधला. त्यानें याच सालच्या पौषांत लोहगड माळा लावून घेतला.

पावसाळा खेडकडूसवर काढून बादशहा पेडगांव ऊर्फ बहादूरगड येथें आला (कार्तिक). यानंतर सहा-सात महिने तो वाघीनगिऱ्याच्या बेरडावरच्या स्वारींत गुंतला होता. मराठे कांहीं स्वस्थ बसले नव्हते. त्यांनीं सिंहगड माळा लावून घेतला. या सालची पातशहाची छावणी वाघीनगिऱ्याचे पलीकडे तीन कोसांवर कृष्णेचे कांठीं झाली. पावसाळा संपतांच तो पेडगांवास आला (श. १६२७ पौष इ. १७०६ जाने.). मराठ्यांचे किल्ले घेण्याचें त्याच्या डोक्यांतून कांहीं जाईना. कोण ही चिकाटी व उत्साह! त्यानें पेडगांवाहून हातचा गेलेला सिंहगड घेण्याकरितां जुलपुकारखानास पाठविलें व आपल्या भात्यांतील रामबाणाची परीक्षा पहाण्याकरितां शाहूराजास जाळींतून काढून त्याजबरोबर दिलें आणि आपण अहमदनगरास मुक्कामास आला (श. १६२७ फाल्गु. इ. १७०६ फेब्रु-मार्च). आतां त्याला अंतकाळ दिसूं लागला व तो निरवानिरव करूं लागला.

निरवानिरव व पैगंबरवास

अशा रीतीनें अत्यंत निराश होऊन औरंगजेब नगरास आला. तेथें तरी, जें काय असेल, तें उर्वरित आयुष्य सुखांत जाईल अशी

त्याची अपेक्षा होती. पण पस्तीस वर्षें एकसारखा तडाख्यावर तडाखे देऊन दुखावलेला मराठी चवताळलेला वाघोबा येथेंहि डाव धरून धांवलाच. बादशहा नगरास आल्यावर एक महिन्याचे आंत 'श. १६२८ चैत्र मासी (इ. १७०६ मार्च–एप्रि.) धनाजी जाधव कूल फौजेनसी येऊन पातशाही लष्करासी मुकाबिला घेऊन लढाई केली.' पण बादशहाला दुःखांत सूख येवढेंच लाभलें कीं, जुलपुकारखानानें 'कोंढाणा द्रव्य देऊन कबज केला.' एकंदरींत रामबाण जरा तरी कारीगार झाला म्हणावयाचा.

मराठ्यांची चळवळ थांबत नाहीं. निदान घरचे भावी पेचप्रसंग तरी वारावे व आपल्यासमोर तरी चिरंजिवांची दणकादणकी होऊं नये, म्हणून त्यानें यानंतर मुलें दूर फेंकण्याचा उद्योग हातीं घेतला. थोरा-मोठ्यांचें सर्वच थोर. सामान्य लोकांनीं तिकडे लक्ष देऊं नये. अंतकाळीं सामान्य माणसें मुलेंबाळें जवळ करितात. पण येथें पहावें तों अगदीं त्याच्या उलट ! बादशहाला तीन मुलगे. पैकीं थोरला मुलगा मूअज्जम उत्तरेस होता व अजमशहा व कामबक्ष स्वारींत भाग घेत होते. अजमशहानें वैशाख शु॥ ११ (१२-४-१७०६) जुन्नरहून येऊन बादशहाची 'अहंमदनगरीं मुलाज़मत केली.' यानंतर बादशहानें बहुधा अंथरूण धरलेलें दिसतें. त्याच्यासमोर राज्यलोभाला बळी पडून आपण बापभावाचें काय केले, तो चलित चित्रपट उभा राहिल्यास आश्चर्य कसलें ! त्यानें मुलांना दूर फेंकण्याकरितां कामबक्षास विजापूर सुभा सांगून रवाना केलें (माघ व. १२), व लगेच चार-पांच दिवसांतच 'अजमशहास उज्जनचा सुभा देऊन रुसकत केलें' (माघ व. १२ १८-२-१७०७). शेवटीं 'माघ वद्य ३० अमावसेस सुक्रवारी

(२१-२-१७०७) दोन प्रहरा औरंगजेब अहमदनगरी परलोकास गेला.' दुसरे दिवशीं वाट चालूं लागलेला अजमशहा परत फिरून नगरास आला व ' फाल्गून शुद्ध एकादशी मंगळवारी (४-३-१७०७) अजमशहा सिंहासनीं बैसले.'

तिकडे विजापुरास कामबक्षानें बंडाचा झेंडा उभारला व मोंगल बादशाहींत यादवीला रंग चढला. अजमशहा ' फाल्गुन वद्य प्रतिपदा शनिवारीं (८-३-१७०७) कूच करून दिल्लीस चालिले' तो कांहीं दिवस औरंगाबादेस होता. त्या मुक्कामांतच त्यास ' श. १६२९ चैत्र सुध प्रतिपदेस जुलपुकारखान व राजा शाहू येऊन ' सामील झाले व ते सर्व कूच करून दिल्लीचा मार्ग आक्रमूं लागले.

मोंगल आपखुषीनें महाराष्ट्र खालीं करूं लागतात—

अजमशहाची पाठ फिरतांच मराठयांनीं चढाईस प्रारंभ केला. शंकराजीपंतांनीं मावळांतील किल्ले एकामागून एक सोडविण्याचा सपाटा चालविला. त्यांपैकीं कांहीं किल्ले त्यांनीं कधीं व कसे घेतले यांची नोंद करितां येते. स. प. पृ. १९३ मधील पत्र श्री राजा शिवछत्रपतींचें असून त्यांत ते राजगड घेण्याचे कामीं मदत करणाऱ्या गुणाजी सावंतास लिहितात ' तुम्ही जवामानिशी पंताजी शिवदेव या समागमे जाऊन राजश्री शंकराजी पंडित सचीव यांचे आज्ञेप्रमाणें कस्त करून किल्ले राजगड हस्तगत केला हें वर्तमान पंडित मा।। निल्हेनी हुजूर लिहिले त्यावरून तुमचे सेवेचा मशरा जाला ' [श. १६२९ ज्ये. शु. १ (२०-५-१७०७)]. याप्रमाणें पुरंदर हस्तगत केल्याबद्दल पुण्याचे शितोळे देशमुख याची इनाम तिजाई माफ केल्याचें आढळतें. शंकराजीपंत, मालोजी नरसिंगराव व गोविंदराव शितोळे देशमूख पा।। पुणें यांस लिहितात ' किल्ले

पुरंदर हस्तगत केला ते समयी तुम्हीं कष्ट मेहनत बहुतच केली निष्ठेस अंतर केले नाहीं. याकरितां तुम्हास इनाम गांवची व इनाम शेताची तिजाई माफ केली असे.' [स. प. पृ. १९३ श. १६२९ कार्ति. व. ३ (१-११-१७०७)]. याप्रमाणें सचिवानें आपल्या जिल्ह्यांतील खुद्द पुणें सोडून बाकीचा बहुतेक मुलूख राजा शाहू दक्षिणेंत येण्यापूर्वींच सोडविला.

सर्वच किल्ले लढून घ्यावे लागले असें नाहीं. कांहीं मोंगल किल्लेदारांनीं 'चले जाव'चा मार्ग स्वीकारून सोडून दिले असण्याचा बराच संभव आहे. विशाळगड मोंगल सुभेदारानें कसा खालीं केला हें 'शि. का. घ. प्रभानवली सरदेसाई' ले. १२, १३ व १४ त पहावयास मिळतें. हे सर्व लेखांक श. १६२९ चैत्र-वैशाखांतील आहेत. विशालगडावर ताम्राचे तर्फेनें उदितसिंग नांवाचा किल्लेदार होता. तो हा गड जंजिरेकर सिद्दी याचे स्वाधीन करून स्वदेशी प्रयाण करण्याचे विचारांत होता. ही कुणकूण गणोबा नाईक सरदेसाई, मामले दाभोळ व प्रभानवली, यास कळल्यावर त्यानें 'आपले मुतालिक कृष्णाजी भास्कर यास लेहोन उदितसिंगास उपदेश करऊन ते गोष्ट राहविली आणि त्यास आपला नायक तेथें ठेऊन किला कृष्णाजी भास्कर याचे स्वाधीन करून जावे ये गोष्टीचे दृढीकरण राजश्री कृष्णाजी परशराम (परशरामपंत प्रतिनिधीचा मुलगा) यास सांगोन केले' आणि करारमदार करून किल्ला कृष्णाजी भास्करानें आपले स्वाधीन करून घेतला. पुढें सरदेसाई यांनीं किल्ला छत्रपतीस नजर केला. म्हणजे आज हिंदुस्थानांतून काढता पाय घेण्याचा इंग्रजांनीं निर्णय घेतला, तेंच मोंगलानें केलें. कांहीं ठिकाणीं ते सरळ निघाले, तर

कांहीं ठिकाणीं त्यांनीं आडवा दांडू घातला. इंग्रजानें हेंच केलें नाहीं काय ? रायगडादि कोंकणांतील किल्ले जंजिरेकर सिद्दीस मिळाले, ते बहुधा याच वेळीं मिळाले असावेत. इतिहासाची पुनरावृत्ति होत असते, ती अशी. एवंच, राजा शाहूच्या सुटकेनें मराठ्यांत यादवी सुरू झाली नसती, तर दक्षिणेंतील मोंगल आपोआपच उठून जाते व मराठ्यांचा इतिहास वेगळाच रंगता. परंतु विधि-घटना तशी नव्हती, याला कोण काय करणार ? परमेश्वरी इच्छेनें काय घडलें, हें पुढील प्रकरणांत पहावयास मिळेल.

शाहू राजे यांची सुटका

शाहू राजे यांची सुटका

मराठ्यांशीं सतत सदतीस वर्षे अहमहमिकेनें झगडा देऊनहि आदिलशाही व कुतुबशाहीप्रमाणें शिवशाहीहि नामशेष करण्याची महत्त्वाकांक्षा अतृप्त ठेवूनच अखेर औरंगजेब पैगंबरवासी झाला. हें मागील प्रकरणांत आपण पाहिलेंच आहे. अपेक्षेप्रमाणें गादीबद्दल त्याच्या त्रिवर्ग चिरंजिवांत तंटा उभा राहिला व मोंगलाईत गृहकलह माजला. हा प्रसंग अटळ होता. अशा स्थितींत मराठ्यांना मोकळें रान करून दिल्यानें मोंगल साम्राज्याला आतांच गळती लागणार, याची मोंगल दरबारला चिंता लागून राहिली. औरंगजेबाचा कोणताहि मुलगा गादीचा वारस झाला तरी त्याला मराठ्यांचा शिरजोरपणा नको होता.

(त्यामुळें) मराठी कोंबड्यापुढें दाणे टाकून ती झुंजविण्याकरितां त्यांनीं त्यावर रामबाण सोडला आणि मोगली साम्राज्याच्या आयुष्यांत वाढ केली.

बादशहाच्या कैदेंत असलेला राजा शाहू मराठे जबरदस्तीनें सोडवूं शकले नाहींत आणि हाच न्यूनगंड अखेर त्यांस भोंवला. पट्टीचा मुत्सद्दी औरंगजेब, शाहू हा आपल्या भात्यांत रामबाण आहे, तो मराठ्यांनीं कितीहि चळवळ केली, तरी ती आपण मर्यादेच्या बाहेर जाऊं देणार नाहीं, हें जाणून होता. त्यानें हें शस्त्र कसें प्रभावी आहे, हें नुकतेंच अनुभविलें होतें. श. १६२७ माघ वद्य १ प्रतिपदेस नबाब जुलपुकारखानास समागमें राजश्री शाहू राजे जालींतून काहाडून दिल्हे आणि कोंढाणा घ्यावयास रवाना केलें. ' असें करण्याचा उद्देश हाच कीं, मराठे या आपल्या राजावर शस्त्र चालवितात का त्यांच्या हातांतून तें गळतें, तें पाहण्याचा होता. हा प्रयोग बराच यशस्वी झाला असण्याचा संभव आहे. अजमशहा तख्तावर बसला तो नबाब जुलपुकारखानाच्या मदतीनें आणि जुलपुकारखान तर मराठ्यांचें मर्म जाणण्यांत अग्रगण्य. तेव्हां त्यानें अजमशहास नर्मदेवर गेल्यावर सल्ला दिला कीं, ' आपल्या हिताच्या अटीवर राजा शाहूची सुटका करावी म्हणजे कांहीं काळ मोगली साम्राज्य टिकूं शकेल.' हें म्हणणें अजमशहास पटून त्यानें शाहू व त्याच्या बरोबरचे कांहीं लोक सोडून दिले. हा त्याच्या मुक्ततेचा नक्की दिवस मिळत नाहीं. कांहींच्या मतें अजमशहा व मुअजम यांची आग्र्याजवळ लढाई होऊन त्यांत अजमशहा मारला गेल्यावर, नवीन बादशहा मुअज्जम उर्फ बहादूरशहा यानें शाहूस बंधमुक्त केलें. ही लढाई इ. स.

१७०७ मे ३१ रोजीं झाली. कोणी का होईना शाहूला बंधमुक्त केलें व तो मोंगलांचा अंकित होऊन आपलें राज्य घेण्याकरितां दक्षिणेंत यावयास निघाला.

मोंगलांनीं शाहूला जरी सोडलें, तरी त्याचा लगाम आपले हातीं राखला होता. त्याची आई मा. येसूबाईसाहेब व भाऊ मदनसिंग अटकेंत ठेवून दिल्लीला बादशहानें आपणाबरोबर नेलें. तसेंच त्याची सुटका करितांना, त्यांनीं ज्यांत मराठयांचें स्वातंत्र्य नष्ट होईल अशा अटी लादल्या. शाहूनें ज्या अटींवर आपली सुटका करून घेतली त्या अटी म्हणजे शिवाजीमहाराजांनीं जयसिंगाशीं ज्या अटींवर पुरंदरचा तह केला होता, त्याची सुधारलेली आवृत्तिच होय. पण पुरंदरचा तह आपल्या ध्येयाआड येत होता म्हणून तो शिवाजीमहाराजांनीं मोडला व मोंगलाशीं स्वातंत्र्ययुद्ध पुकारलें. हें युद्ध मराठयांनीं कसें जिंकलें व मोंगली साम्राज्य कसें खिळखिळें केलें, याची पुसट ओळख वाचकांस आंतापर्यंतचे विवेचनांत झालीच आहे. अशा स्थितींत शाहूची सुटका करून मोंगलांनीं मराठयांवर मात केली व त्यांचे परिश्रम, स्वार्थत्याग, व वहिविलेल्या रक्ताच्या नद्या, मातीमोल करून टाकल्या.

सुटकेच्या वेळीं शाहूची उमर पंचवीस वर्षें वयाची म्हणजे तो पूर्ण समंजस असल्यानें त्यानें ज्या अटीवर आपली सुटका करून घेतली, त्याचे इष्टानिष्ट परिणामाची जबाबदारी खुद्द त्याच्यावरच पडते. त्याला इतरांना भागिदार करितां येत नाहीं. ज्या अटी स्वीकारून शाहूनें आपली सुटका करून घेतली, त्या अटी एकत्र आपणांपुढें नाहींत. त्यांपैकीं प्रसंगानें ज्या बाहेर आल्या, त्या अशा: १. मोंगलाचा तांबेदार म्हणून त्यानें राज्य करावें. २. त्याच्या ताब्यांत जो मुलूख

येईल, त्याचा जवळ जवळ त्यानें निम्मा वसूल मोंगलांस द्यावा. तो बादशाही नौकरांनीं त्याच्या मुलुखांत बसून वसूल करावा. यासच ' मोगलाई अम्मल ' म्हणतात. ३. बादशाहीवर प्रसंग येईल, तेव्हां तिच्या संरक्षणार्थ त्यानें आपल्या फौजेसह यावे. ती बुडवूं देऊं नये. इत्यादि अटींनीं युक्त ती बादशहानें शाहूस करून दिलेली ' स्वराज्याची ' सनद होय. दुसरी 'चौथ सरदेशमुखीची' सनद. तीहि असलीच बरबटलेली. ही सुटकेच्या वेळीं मिळाली व पुढें सैय्यद बंधूंनीं बाळाजी विश्वनाथ पेशवे व खंडेराव दाभाडे सेनापती यांच्या दिल्लीच्या स्वारींत तिचा जीर्णोद्धार केला असें आम्हीं मानतों. एवंच शाहूची सुटका करून मोंगलांनीं दक्षिणेंतून केलेलें ' चलेजाव ' थांबविलें व मराठयांचा स्वातंत्र्योत्साह ' यादवी 'कडे वळविला. या शाहूच्या सुटकेंत शंकराजी नारायणाचे मृत्यूचें गूढ सांठबिलें असल्यानें येथें त्याची स्पष्टता करावी लागली.

शाहू राजानें आपल्या सुटकेचा ' स्वामीचा भाग्योदय प्रसंग होऊन दक्षण प्रांते येणें जाले. ' असा उल्लेख करून मराठे सरदारांस पत्रें लिहिलेली आहेत. अशा पत्रांपैकीं कांहीं पत्रांत त्याचे मुकाम पहावयास मिळतात. श. १६२९ आषाढ वद्य ६ (इ. १७०० जुलै) ला तो मौ. चोरवड प्र।। उतराण येथें आहे. (म. इ. सा. खं. १५ ले. ३५८) येथेंच त्याला ' राजश्री परसोजी भोसले व चिमणाजी दामोदर ' हे मराठे सरदार ' शेनेसहवर्तमान येऊन भेटले. आणखीहि बाजे सरदार जे या प्रांते (खानदेशांत) होते ते तमाम भेटले. पुढें कूच करून मजल दर मजल येरजेत (?) आहे. ' [ऐ. कागदपत्रें नाणें घोल देशमुख ले. २१६ रामदास

व रामदासी] यानंतर धुळयाजवळ असलेल्या लांबकानी या गांवीं त्यानें फौजेची जमवाजमव करण्यांत बरेच दिवस घालविले. इ. स. १७०७ च्या आक्टो.ला खेडकडूसची लढाई झाली. व त्याला सेनापती धनाजी जाधव, चिटणीस खंडोबल्लाळ, बाळाजी विश्वनाथ, अंबाजीपंत पुरंदरे वगैरे येऊन मिळाले, व परशरामपंत प्रतिनिधी कैद झाले. वास्तविक खेडची लढाई हें केवळ नाटक होतें. सेनापतींनीं जी निसरडी क्रिया केली होती, तिच्या पूर्ततेकरितां लढाई केवळ नाममात्र झाली. जेथें सेनापतीच फितूर तेथें प्रतिनिधींची वळवळ कितीशी चालणार ? या नाटकाचें पर्यवसान प्रतिनिधीच्या पराभवांत झालें. शिवाजीमहाराजांचे पश्चात् संभाजी का राजाराम, हा प्रश्न सोडवितांना सेनापती हंबीरराव मोहिते संभाजीकडे वळल्यामुळें मुत्सद्दी फिके पडले, तेंच नेमकें येथें झालें. लष्कर जिकडे तिकडे जय, हा राजकारणी त्रिकालाबाधित सिद्धांत केव्हांही सिद्धच आहे. आतां ताराबाईच्या पक्षांत शंकराजी नारायण सचीव हेच काय ते जबाबदार व जमावदार मुत्सद्दी उभे होते. त्याचें पुढें काय झालें तें पाहूं.

यादवीनें रणशिंग फुंकलें—

मोंगलांनीं चौखूर वाफटणारें मराठी तट्टू काबूंत आणण्याकरितां मोठया धूर्तपणानें ऐन मोक्याच्या वेळीं मनमानेसारख्या अटी घालून व महत्त्वाचे ओलीस घेऊन शाहू राजे यांची सुटका केली, हें मागें येऊन गेलेंच आहे. हा त्यांचा डाव कल्पनेबाहेर यशस्वी होऊन मोगलांनीं महाराष्ट्र खालीं करण्याचा निर्णय घेतांच त्याचीं एकामागून एक ठाणीं घेण्याचा मराठयांचा उद्योग स्थगित झाला. आणि या नूतन निर्माण झालेल्या यादवील येऊन ते

विलगले. औरंगजेबाच्या स्वर्गस्थ आत्म्यानें समाधानीचा सुस्कारा टाकला. शाहू खानदेशांत येतांच तिकडील भागांतील बहुतेक मराठे सरदार त्यास सामील झाल्यामुळें त्याच्या भोंवतीं फौजेचा चांगलाच जथ जमला. ही बातमी मा. ताराबाई व तिचे मदतनीस यांस कळतांच, या संकटाला तोंड कसें द्यावें याची चर्चा सुरू झाली. ताराबाईचें म्हणणें पडलें कीं, संभाजीमहाराजांचे पश्चात् बहुतेक सर्व शिवशाही मोगलांनीं जिंकली होती. आतां जी शिवशाही दिसते, ती छ. राजारामसाहेब व मीं मिळविलेली आहे, यावर शाहूराजाचा बिलकुल वारसा येऊन पोहोंचत नाहीं. हा तिचा दावा, तिनें आपल्या सरदारांस पाठविलेल्या कित्येक पत्रांत स्पष्ट केला·असून तो अगदींच कांहीं व्यर्थ म्हणतां येत नाहीं, त्यांत पुष्कळ अर्थ भरला आहे हें कोणाहि विचारवंतास, एकंदर परिस्थितीचा आढावा घेतल्यावर मान्य करावें लागेल. या बाबतींत पे. द. भा. २६ ले. १२९ मध्यें रामचंद्रपंत अमात्याचा मुलगा भगवंतराव यानें एका विशिष्ट प्रसंगीं काढलेले उद्गार आपल्यापुढें आहेत. ‘ पेसजी कैलासवासी माहाराज (राजाराम महाराज) याणीं राज्य सोडविले, वृक्ष लाविले, आईसाहेबानी पालण केले. लेकाने (रामराजानें) बुडविले ऐसे न करावे. पूर्वीची आईसाहेब तीच आमची स्वधर्म रक्षिती यैसे असेल, तरी राजनीतीनें जुना पाया पाहून सत्यधर्मे राज्य करावे. ’ हा तिचा दावा सर्व महाराष्ट्र मंडळास पटला नाहीं, हें सांगणें नकोच. प्रथम कांहीं दिवस हा शाहू खराच कीं तोतया, याची परीक्षा करण्यांत गेले. ताराबाईंनी आपल्यापुरता हा खरा शाहू नसून तो कोणी तोतया आहे हा निर्णय जरी घेतला, तरी तिला या बाबतींत फारसे अनुयायी मिळाले

नाहींत. अखेर शाहूला विरोध करावयाचें ठरलें व त्या दिसेनें पावलें पडूं लागलीं.

परशरामपंत प्रतिनिधी, शंकराजीपंत सचीव, धनाजी जाधवराव, खंडोबल्लाळ चिटणीस वगैरे कार्यकर्त्यांपुढें मोठा पेच पडला व त्यांना इकडे आड नी तीकडे विहीर झालें. वरील यादींत रामचंद्रपंताचें नांव कां वगळलें हें मागील विवेचनांत ओझरतें येऊन गेलेंच आहे. येथें याची अधिक स्पष्टता करीत आहोंत. ' पेशजी कैलासवासी पंत + + + मातुश्री + (बा) रा पंधरा वर्षें रिकामेच होते. तथापि दरमहा रोजमरा देत होती. वराता सरदारांवर व सोंधवे बिदनुरावर देत होती, दरबारी पालणपोषण करून किले रांगणें याचे मु॥ ठेविली होते. रा। परशरामपंत व गिरजोजी बावा (यादव) कारभार राज्याचा करीत होते. मागती कालसमयेपरत्वे धणियाची कृपा जाली. ते समई राजश्री पंतास सरंजाम दिला. मातुश्रीनी उभारणी करून पाठबल देऊन सर्व साहित्यानिसी चाकरी सेवा घेतली हे मातुश्रीस व सर्वांस ठावके आहे. आमचे हातून सेवा घेतली आहे, आम्ही पाहिले आहे.' (पे. द. मा. २६ ले. ११२) आम्हीं मागें रामचंद्रपंताचा घरीं बसण्याचा काळ श. १६२६ (इ. १७०४) दिला आहे. तो अंदाजी जरी आहे, तरी तो साधार ठरावा. तेथून बारा पंधरा वर्षें पंताच्या अज्ञातवासाचा काळ मोजून नंतर त्यावर मातुश्रीची कृपा होणें शाहूराजाच्या सुटकेच्या काळाशीं केंव्हांहि शक्य होत नाहीं. म्हणजे शाहूच्या सुटकेनंतरच्या बऱ्या-वाईट राजकारणांशी रामचंद्रपंताचा मुळीच संबंध येत नाहीं, असें आम्हांस वाटतें. असो.

परशरामपंतादिकांनीं शफता घेऊन शाहूला विरोध करण्याचें ठरविलें. जाधवरावांनीं पळवाटीची शपथ घेतली,तर खंडोबल्लाळनें मुळीं घेण्याची टाळलीच. पूर्ण शफत घेतलेले परशरामपंत व शंकराजीपंत एवढेच काय ते प्रमुख दिसतात. हे दोघे कार्यकर्ते होते, हें सोळा आणे सिद्ध आहे. तेव्हां त्यांनीं केवळ भिडेनें शफत घेणें म्हणणें, म्हणजे त्यांच्या कर्तृत्वाला कमीपणा आणण्यासारखें होईल. वारसा हक्क हा वास्तविक गौण मुद्दा होता तो एकटांच पुढें येता, तर यादवीला बगल देऊन प्रकरण तडजोडीवर येण्यास अडचण पडती ना. खरा प्रश्न होता—शाहू राजानें सुटकेच्या वेळीं स्वीकारलेल्या अटीचा. या अटी कोणाहि स्वातंत्र्ययुद्धांत भाग घेणारांना मान्य होणें शक्य नव्हतें. त्या मान्य करणें म्हणजे आपल्या ' तत्त्वाला ' मूठमाती देणें होय. औरंगजेबाशीं छ. तह करण्यास तयार असतांहि ज्या कार्यकर्त्यांनीं त्यांस विरोध केला, त्यांनीं मराठ्यांच्या स्वातंत्र्याला बाध आणणाऱ्या अटी पतकरून आलेल्या शाहूस राजीखुषीनें मदत करणें शक्य नव्हतें. आणि हेंच प्रमुख कारण परशरामपंत व शंकराजीपंत यांना शाहूला विरोध करण्यास खरें कारणभूत झालें व तें त्यांनीं थेटपर्यंत टिकविलें.

आषाढांत शाहू राजे खानदेशांत होते. तेथून ते पुढें सरकत सरकत चालले. पुण्याच्या उत्तरेस पंचवीस मैल अंतरावर असलेल्या भिमेच्या कांठच्या खेडकडूस गांवीं प्रतिनिधी, सेनापती या ताराबाईच्या प्रमुखांशीं लढाई झाली. तींत प्रतिनिधींचा मोड झाला, व सेनापती धनाजी जाधवराव शाहूस उघड जाऊन मिळाले. हें इतकें होत असतां शंकराजी नारायण आपल्या जिल्ह्यांतच कायम होते. यांनी शाहूविरुद्ध हालचाल केली नाहीं अगर केली असल्यास

नमूद नाहीं. खेडकडूसची लढाई निर्णायक ठरून, शाहू राजे मराठी राज्याचे मालक होण्याची खात्री दिसूं लागली.

पंत सचिव 'ब्रह्मीभूत'

होऊन देह विसर्जन करितात. हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या इतिहासांत प्लासीच्या लढाईस जें महत्त्व आहे, तेंच महत्त्व मराठ्यांच्या इतिहासांत 'खेड-कडूस'च्या लुटपुट्या लढाईस द्यावें लागतें. ताराबाईच्या तर्फेनें लढण्यास आलेला सेनापती धनाजी जाधवराव लढाईच्या आधींच शाहू राजास मनानें अनुकूल झाला होता. केवळ ताराबाईस दिलेली अर्धवट शपथ कशी तरी पाळण्याकरितां त्यानें लढाईचा निव्वळ फार्स केला. नाहींतर, त्या लढाईंत शाहू पक्षाच्या चिंधड्या उडण्यास वेळ लागताना. ऐनवेळीं सेनापतींनीं लढाईंतून अंग काढून घेत-ल्यामुळें परशरामपंत प्रतिनिधीला लढाईंत पराभव पत्करून पोबारा करावा लागला, व शाहूस विजयश्रीनें माळ घातली आणि त्या-बरोबरच मराठशाहीचें निर्भेळ स्वातंत्र्य लयास गेलें. परमेश्वराची मर्जी दुसरें काय? सेनापतींनीं पवित्रा बदलला, प्रतिनिधी मार खाऊन पळाले. राहतां राहिले ताराबाईच्या पक्षाचे जबाबदार सचिव शंकराजीपंत. खेडकडूसनंतर शाहूला शंकराजीपंताशीं-दोन हात करण्याचा प्रसंग येणार होता. वाटेंतील त्यांच्या ताब्यां-तल्या जिल्ह्याला बगल देऊन त्यांस पुढें जाणें शक्य नव्हतें. खेड-कडूसवर शाहूनें भीमा ओलांडली व शंकराजीपंताच्या जिल्ह्यांत प्रवेश केला. खेडकडूसच्या लढाईची नक्की मिती देण्याचें साधन अद्याप उपलब्ध झालें नाहीं. केवळ अंदाजी तीं शके १६२९ आश्विन अखेर (इ. १७०७ च्या ऑक्टोबरच्या दुसरा आठवड्यांत) झाली असें मानलें जातें. पण तो केवळ तर्क—त्याला निश्चित मानणें धोक्याचें आहे. असो.

खेडहून शाहू राजे निघाले व तो शिरवळास आले आणि त्यांनीं तेथून नजीकच्या रोहिड किल्ल्यावर असलेल्या शंकराजीपंतास आपणास येऊन भेटण्यास आज्ञा केली, असें का. सं. प. या. पृ. १८८ वरील शकलावलींत म्हटलें आहे. परंतु, यावर कितपत भरंवसा ठेवावा, हा मोठा प्रश्न आहे. तो समाधानकारक सोडविण्यास विद्यमान साधनें अपुरीं पडतात व जादा संशोधनाची जरूरी भासते. शिरवळवरून शाहूनें शंकराजीपंतास भेटीस येण्याची जशी आज्ञा केली, तसेंच त्यानें आपलें सैन्य राजगड घेण्याकरितां पाठविलें. शिरवळहून रोहिडा सुमारें आठ मैल व राजगड दहा मैल. या वेळीं शंकराजीपंतांनीं शाहूला अडविलें असतें, तर त्याचें पुढील वेळापत्रक खास गडगडतें व यादवीला रंग चढता. परंतु पुढील पेंचप्रसंग विचारांत घेऊन ' मरण रुचे वीराला परि न रुचे ' या मार्गाचा त्यानें अवलंब केला. ज्या सेनापती धनाजी जाधवरावास शंकराजीपंतांनीं अनेकदां हुकूम देऊन औरंगजेबाची हड्डी नरम केली, त्या आपल्या दुय्यमाबरोबर दोन हात करावयाचे, आणि ते कशाकरितां, तर मराठशाहीचे निर्भेळ स्वातंत्र्य गमावणाऱ्या शाहूकरितां! अशा नाजुक प्रसंगीं त्यांनीं स्वधर्मास अनुसरून देहविसर्जन करण्याचा वीरोचित राजमार्ग पत्करल्याबद्दल त्यांस विचारी लोक धन्यवादच देतील.

शाहू राजाचा निरोप येतांच शंकराजीपंतांनीं आत्महत्या केली व आपला ग्रंथ आटोपून त्याचा पुढील मार्ग सुखकर केला. असें शकावली म्हणते–परंतु, हें म्हणणें तिजपेक्षां श्रेष्ठ दर्जाच्या पुराव्यापुढें टिकत नाहीं. शंकराजी पंताचें देहावसान श. १६२९ कार्तिक शु. १२ (इ. स. १७०७ सप्टें.२७)स झालें. यानंतर शाहू राजे यांनीं चंदन-

चंदनचे मुक्कामीं शंकराजीपंताचा अल्पवयी मुलगा नारो शंकर यास सचीव पदाचीं वस्त्रें देतांना जी सनद करून दिली, तींत म्हटलें आहे कीं, ' किल्ले वंदन येथील मुकामीं तुम्हाकडून राजश्री त्रिंबक शिवदेव मुतालिक सुरनीस यांणीं येऊन विनंति केली कीं, शंकराजी नारायण यांणीं आंबवडीयाचे मुक्कामीं देह विसर्जन केले '. म्हणजे त्यांचा मृत्यु रोहिड्यास न होतां आंबवड्यास 'देह विसर्जन' करून झाला, यांत शंका नाहीं.

देह-विसर्जनाचा प्रकार—

ज्याप्रमाणें शंकराजीपंताचा रोहिड्यास मृत्यु झाला हें म्हणणें पुराव्यानें टिकत नाहीं, त्याप्रमाणें त्यांच्या मृत्यूचें कारणहि टिकत नाहीं. कसें तें पहा. शाहूचें सैन्य राजगडास आलें त्या वेळीं त्यांचा मुक्काम रोहिडयास अगर राजगडास होता. वीरगडी हें नेहमींच धार्मिक वृत्तीचे असतात. कारण, ते एकसारखे जीवनमरणाचा खेळ करीत असल्यानें, त्यांना देहाचें क्षणभंगुरत्व पटण्यास वेळ लागत नाहीं. एकदम त्यांची वैराग्यवृत्ति उचल खाते व ते परमार्थमार्गांत रमून जातात. तसेंच शंकराजीपंताचें झालें. ताराबाईसमोर दूधभातावर हात ठेवून केलेली क्रिया, शाहूनें सुटकेकरितां मराठशाहीच्या निर्भेळ स्वातंत्र्याचें केलेलें बलिदान, स्वकीयासींच दोन हात करण्याचा येणारा प्रसंग, इत्यादि कारणांनीं त्यांच्या मूळच्या वैराग्यवृत्तीनें एकदम उचल खाल्ली व त्यांनीं सर्व सोडून देऊन एकदम श्रीक्षेत्र आंबवड्याचा रस्ता सुधारला.

तेथें ते गुप्तरूपानें महिना दोन महिने होते, अशी एक मावळ भागांत आख्यायिका प्रचलित आहे, तींत बरेंच तथ्य दिसतें. आख्यायिकांनाहि इतिहासकारास पचवावें लागतें, हें तज्ज्ञांस तरी

सांगावें लागणार नाहीं. आख्यायिका या परंपरनें सांगितल्या जातात आणि त्या बरेच वेळां अव्वल दर्जाच्या पुराव्याचे कसोटीला उतरतात. असो.

यासंबंधींची पुढील सनद पहा. इ. १७०७ मे १०

'स्वस्ति श्रीराज्याभिषेक ३३ सर्वजितनामसंवत्सरे वैशाख वद्य पंचमी, इंदुवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी यांणी, समस्तराजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री नारो शंकर पंडित सचीव यांसी आज्ञा केली ऐसीजे–किल्ले वंदन येथील मुकामीं तुम्हाकडून राजश्री त्रिंबक शिवदेऊ मुतालिक सुरनीस यांणीं येऊन विनंति केली कीं, **शंकराजी नारायण यांणीं आंबवडीयाचे मुकामी देह विसर्जन केलें**. नारो शंकर लहान, यांजकरितां त्यांजकडे किल्ले, कोट, दौलत स्वामीची आहे; याचा बंदोबस्त व्हावा. दौलतीत कर्जवाम होऊन बहुत खराबीत आहे; म्हणोन विनंति केली. ऐसीयास शंकराजीपंत इमानी. आम्हीं पादशहास हस्तगत होऊन त्याचे सैन्यांत होतों. तीर्थस्वरूप कैलासवासी काकासाहेब महालसुद्धां कर्नाटकप्रांतीं, इकडे राजश्री रामचंद्रपंतानी व शंकराजीपंतानीं सरदाराह्मी सरबरा करून, ठाईं ठाईं. किल्लोकिल्ला लढाया देऊन, कर्नाटकांत फौजा रवाना करून, तिकडील बंदोबस्त राखून, गेले किल्ले महामर्दीनें जातीनिशी मेहनत करून घेऊन स्वामींचें राज्य रक्षिलें. त्यांचें वंशाचे चालवणें स्वामीस बहुत आवश्यक आहे. त्यांचा जिल्हा, मामला, वतनें इनामगांव त्याप्रमाणें चालविले पाहिजे. त्याजवरून हल्लीं स्वामी कृपाळू होऊन, शंकराजी नारायण यांजकडे सुरनिसी चालत होती ते मृत्यु पावले, याजकरितां त्यांजकडून दूर करून, तुम्हांस सुर-

निसी अजरामहामत करार करून वस्त्रें बहुमान दिल्हा असे. तुम्हांस जातीस तैनात सालिना बरहुकूम माजी होन पातशाही १०००० दहा हजार करार केले असेत. याचेऐवजीं तुम्हांकडे सरंजाम गांव चालत आहेत, ते व इतलाख नेमणूक पावत आल्याप्रमाणें पावत जाईल. व वतनें, इनामगांव पेशजीपासून चालत आल्याप्रमाणें तुम्हांस व तुमचें पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालविले जाईल. जिल्हा, मामला, किल्ले, कोट किल्लेकोटाचा खर्च व दरमहांचा ऐवज सालाबाद नेमणुकेप्रमाणें पावतींत जाणे. तुमचे जिल्हेतील किल्लेकोट सुटतील, ते तुम्हाकडे ठेविले जातील. पादशाईमुळें तुम्हांस कर्जवाम जाले आहे, याजकरितां स्वामीचें राज्य तोंवर तुमच्या जिल्हे मामल्याची वंशपरंपरेनें घालमेल होणार नाहीं. येविशी श्रीशंभू महादेव यांची शफतपूर्वक अभय असे. तुम्हीं इमाने इतबारे यथान्यायें, वडिलाचे वेळेस लोक स्वामीकार्यास आले आहेत, त्यांचे व प्रजेचे पालग्रहण करीत जाणे, स्वामी तुमचे सेवेचे कर्तृत्व पाहून, उत्तरोत्तर उर्जित करतील जाणिजे, बहुत काय लिहिणें तरी सुज्ञ असा. मोर्तब तेरीख १७ सफर सुरसन समान मया व अल्फ' (इसवी सन १७०७–८) [पे. द. स. पत्रांतील माहिती इतिहास संग्रह ले. ३६ पृ. १८८–८९] ही नक्कल आहेत, यांत शंका नाहीं. यांतील कालनिर्देश गणिताच्या कसोटीला उतरत नाहीं. पण मजकूर विश्वसनीय मानण्याकडे प्रवृत्ति होते. अस्सल हातीं आल्याखेरीज शेवटचा निर्णय देणें बरोबर नाहीं.

जिकडे तिकडे स्थिरस्थावर झाल्यावर त्यांनीं या क्षेत्रीं संन्यास घेण्याचें ठरविलें आणि तो बेत एकदम अमलांतहि आणला. संपूर्ण संन्यासदीक्षेला कालाची अनकूलता नव्हती. कारण त्याला

उत्तरायणाची जरूरी असते. दक्षिणायनांत फक्त 'आतुर संन्यास'च घेतां येतो. त्यामुळें त्यांनीं आतुर संन्यास घेतला. हा विधी बहुधा कार्तिक शु. ११ च्या पुण्य दिनीं झाला असावा. आंबवड्यास जंगलांत श्रीनागनाथाचें शिवस्थान असून, तें जागतीज्योत म्हणून मावळांत पूर्वापार समजलें जातें. श्रीनागनाथाच्या परिसरांत नैर्ऋत्य कोनास पंचगंगा नांवाचें तीर्थ आहे. हें तीर्थ व महाबळेश्वरावरील पंचगंगातीर्थ यांत पूर्ण साम्य आहे. आतूर संन्यास घेतल्यावर ब्रह्मीभूत शंकराजीपंतांनीं जीवंतपणींच पंचगंगा तीर्थांत देहविसर्जन करून आपलें पारलौकिकसार्थक केलें. एवंच, त्यांनीं हिरकणी खाऊन आत्महत्या केली हें म्हणणें बाष्कळ असून, त्यांनीं स्वधर्मानुसार वंद्य मार्गानें परलोकसाधन केलें, यांत शंका नाहीं.

श्रीनागनाथाच्या पूर्वेस शेंसवाशें कदमांवर त्यांची समाधी आहे. त्यांच्या वंशांत त्यांना पूर्वापार ब्रह्मीभूत म्हणत आले असून त्यांच्या स्मृतिचिन्हास ' समाधी ' म्हणतात. ' छत्री ' अगर ' वृंदावन ' म्हणत नाहींत. संन्यासी व सत्पुरुष यांच्या स्मृतिचिन्हासच समाधी म्हणतात. इतर 'छत्री' अगर 'वृंदावन' नांवानें ओळखलीं जातात. आतूर संन्यास घेऊन जिवंत समाधी घेतल्याचा उल्लेख ऐतिहासिक साधनग्रंथांतहि पहावयास मिळतो. छ. शाहूमहाराज यांचे आश्रित विश्वनाथ जोशी राईलकर म्हणून होते. त्यांची अवतारसमाप्ति राजवाडे खं. ६ पुरंदरे रोजनिशी पृ. ७० वर दिली आहे. " श. १६७३ भाद्र. शु॥ दशमी मंगळवारीं विश्वनाथ जोशी राईलकर यांणी आतुरसंन्यास घेऊन पुण्याच्या संगमी जीवंतच नदींत जाऊन जलसमाध घेतली. वारले. "

उपसंहार—

एकंदरींत, मराठ्यांच्या इतिहासांत जे वीरश्रेष्ठ नरपुंगव होऊन गेले, त्यांतील प्रथम श्रेणींत ब्रह्मीभूत शंकराजी नारायण यांची गणना होते. यांनीं शिवशाहीच्या निर्भेळ स्वातंत्र्याकरितां जे परिश्रम केले, त्यांची अस्पष्ट कल्पना आतांपर्यंतच्या विवेचनांत येऊन गेलीच आहे. या त्यांच्या लोकोत्तर जीवनास साजेशीच त्यांनीं आपली जीवनयात्रा, ज्या विशिष्ट तत्त्वाकरितां देह झिजविला त्याला यत्किंचित् बाध येऊं न देतां, सनातन वैदिकधर्मानुसार वीरोचित मरण पतकरून, उज्ज्वल कीर्तिमंदिरावर रत्नखचित सुवर्णकळस चढवून, संपविली. यांचें चरित्र म्हणजे ब्राह्मणधर्म व क्षात्रधर्म यांचा समन्वय करून ‘ अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठत. सशरं धनुः । इदं ब्राह्म मिदं क्षात्रं शापादपि शरादपि ॥’ या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें, राजकारणी ब्राह्मण समाजास कित्त्यादाखल उपयोगांत आणण्याच्या किमतीचें खास आहे. तें हल्लींचा आमच्या समाजांत पसरलेला न्यूनगंड घालविण्यास अंजनवत् उपयोगी पडल्यास, आम्ही आपल्या परिश्रमाचें योग्य चीज झालें असेंच समजूं. अशा या वीरशिरोरत्नाच्या चिंतनांत आयुष्यांतील दीर्घकाल घालविण्यास ज्या दयाघन श्रीप्रभु रामचंद्रजींनीं सामर्थ्य दिलें, त्यांचें चिंतन करून तूर्त लेखणीस रजा देतों. ‘जय जय रघुवीर समर्थ । ’

परिशिष्ट (अ)

देवाब्राह्मणांची सेवा

—०—

हातघाईच्या लढाईंत सामील असलेल्या सैनिकांचा असा अनुभव आहे कीं, त्या वेळीं त्यांच्यापुढें पुत्रकलत्रादि कोणी येत नाहींत त्याला फक्त परमेश्वरच दिसत असतो आणि त्याची नामस्मरणपूर्वक कृपेची याचना करून, तो बेहोष होऊन रणभूमीवर तांडव करीत असतो. गोळ्यांचा:सारखा:पाऊस पडत असतो, आपल्या भोंवतालचे सहकारी पटापट मरून पडतात आणि आपल्या अंगावरून स्पर्श न करतां गोळ्या सूं सूं करीत जात असतात अशा वेळीं आपण जे जगलों ते परमेश्वरी कृपा म्हणूनच, अशी त्या सैनिकांची भावना असते. अंतकाळीं परमेश्वराचा निजध्यास लागणारा जीव शेवटीं त्याच्या स्वरूपांत विलीन होतो, असें शास्त्रवचन आहे. अर्थात् सैनिक धारातीर्थी देह ठेवतांना जर त्याच्या रोमरोमीं परमेश्वरच संचार करितो, तर अशाला स्वर्गप्राप्ति कां होणार नाहीं ? सदतीस वर्षांच्या स्वातंत्र्ययुद्धांत अतर्क्य अशा अघटित घटना जन्माला आल्या. वास्तविक, मोंगलांच्या अफाट सामर्थ्यापुढें मराठे म्हणजे कोणत्या झाडाचा पाला ! असें असतां त्या दीर्घकालांत त्यांनीं ज्या करामती केल्या, त्यामागें कोणीतरी गूढ शक्ति प्रेरक होती यांत शंका नाहीं. आज आम्हांला कांहींहि वाटो, पण त्या लढ्यांत ज्यांनीं साक्षात् भाग घेतला, त्यांपैकीं छत्रपतीपासून सामान्य सैनिकापर्यंत प्रत्येक-जण वरपांगीं नव्हे—अंत:करणापासून असें मानीत आला कीं आपणाला हें जें यश लाभत आहे, तें देवाब्राह्मणांच्या आशीर्वादाचें

फळ होय. हें मानवी कर्तृत्व खास नव्हे. त्यामुळें या काळीं देव, ब्राह्मण, सत्पुरुष यांचा प्रत्येकांकडून शक्तीनुसार परामर्ष घेतला जाई. त्यांची हेळना कोणींच केली नाहीं. तशांत, शंकराजी नारायणाचें सर्व आयुष्य जीवनमरणाच्या तारेवरच्या नाचांत गेलें. त्यामुळें त्यांनीं आपल्या सामर्थ्यानुसार राज्याच्या अभिवृद्धीकरितां आशिर्वाद देणाऱ्या देवाब्राह्मणाचा परामर्ष घेतला आणि भ्रष्टप्रतिज्ञ न होतां धर्मशास्त्र व युद्धनीति यांना अनुसरून नश्वर देहाचें विसर्जन केलें. म्हणून, आम्ही या प्रकरणांत त्यांनीं केलेल्या धर्मकृत्यांची माहिती साधार देत आहोंत. आमचा असा तर्क आहे कीं, शंकराजी नारायणानें रामदासीच दीक्षा घेतली होती, म्हणूनच त्यांच्या घराण्यांत रामोपासना अखंड चालू आहे. ते रामभक्त होते याला त्यांच्या संस्कृत मुद्रेंतील श्लोकहि दुजोरा देईल. आज भोर येथील पंतसचिव भक्तियुक्त अंतःकरणानें रामजन्मोत्सव साजरा करीत आहेत, त्याचा प्रारंभ शंकराजी नारायणांनींच केला असावा. पण यास योग्य पुरावा मिळत नाहीं.

माळशिरसचा ‘ भूलोबा ’—

शंकराजी नारायणाच्या जिल्ह्यांत जीं जागृत देवस्थानें होतीं, त्यांची व्यवस्था त्यांनीं केल्याचे दाखले मिळतात. ते पाहिले असतां त्याची आपल्या धर्मावर केवढी श्रद्धा होती, याची प्रचीति येते. धावडशीकर ब्रह्मेंद्रस्वामींनीं ज्याचा जीर्णोद्धार केला तें मौ.माळशिरस, तालुका पुरंदर, जि.पुणें, या गांवाच्या उत्तरेस असलेलें श्रीभुलेश्वराचें देऊळ मुसलमानपूर्वकालीन असून तें आज त्या काळच्या उत्कृष्ट शिल्पाचा नमुना म्हणून दाखवितां येतें. हें देवालय ब्रह्मेंद्रस्वामींनीं बांधलें असा उल्लेख अज्ञानानें कांहींनीं केला आहे. परंतु तसें नसून

तें हेमाडपंती आहे. ब्रह्मेंद्रस्वामीनें त्याचा जीर्णोद्धार केला एवढेंच. या भूलोबाची पूजा-अर्चेची व्यवस्था, सचिवानें त्यांचे जिल्हेंत तें असल्यानें केली. प्रथम सालास एक होन मोईन व नंदादीपास तेल करून दिलें. त्यावर 'श. १६२१ आषा. शु. २ (इ. १६९९ जून १९) च्या सनदेनें देवास नैवेद्याकरितां सालिना मोईन कैली कोठी मापे गहूं ८३॥। पावणे चारी मण देवविली असेति. प्रतिदिवसी ८८८= निठवे प्रमाणे सालिना करून दिले.' (पे. द. भा. ३१ ले. ७४) 'याशिवाय वे मलारभट यासी श्री भुलेश्वर येथें ' प्रतिवर्षी ' होन पा॥ २४ चोवीस द्यायसाची मोईन करून राजश्री पंडितराऊ व स्वामीनें पत्र करून दिली तींहि चालविली.' (पे. द. भा. ३० ले १)

शिरवळचा रामदासी मठ—

' श्री समर्थ रामदास स्वामीचें साक्षात् शिष्य ह. भ. प. बाजी गोसावी हें भले योग्य रघुवीरभक्त याचें मठी प्रत्यहि कथा उच्छाह होतो. त्यास दीपास तेलाची मोईन केलीय नें राज्याची अभिवृद्धि आहे. याकरितां मटास तेलाची मोईन दररोज टाक तेल ८८।· पावशेर रास मोईन केली. ही व्यवस्था शिष्यपरंपरेनें चालविणें ' (श. १६२६ अश्वि. वद्य १४ स. सं. का. प. ले. ४९९) यानंतर लवकरच बाजी गोसावी यास देवाज्ञा झाली. म्हणून ही मोईन पुढें 'त्यांचें पुत्र रामाजी गोसावी याजकडें चालविण्याचें ताकीदपत्र दिलें.' (श. १६२८ भाद्रपद व. ९) या पत्रावरून तेलाची मध्यंतरीं मूळ मोईन वाढवून पावशेराचें आच्छेर केलें. व आणखी रोख रुपये २५ दरसाल देण्याची व्यवस्था केली. (सदर (ले. ५०२-२)

मठ सज्जनगड—

'देवस्थान परमथोर व स्वामी सत्पुरुष बहुत थोर. हें राज्य देवब्राह्मणांचे आशीर्वादें आहे. म्हणून मठाचें खर्चाकरितां मौजे सोनगांव सा। निब प्र॥ कऱ्हाड हा गांव इनाम दिला.' (श. १६१८ मार्ग. व. ६.)

श्रीसमर्थांचे पुतणे—

'श्रीसमर्थांचें पुतणे व रामीरामदासांचे पुत्र रामचंद्र गोसावी यांस मौ. जांब प॥ आंबाड हा गांव छ. राजाराम महाराजांनीं इनाम दिला.' (श. १६१६ फाल्गू. शु. २) तेव्हां त्यांनीं शंकराजीपंतास तो चालविण्याचें कळविलें. तसेंच 'त्या प्रांते स्वारी शिकारीस लष्कर जातें त्याजकडून सदर गांवास उपद्रव लागूं नये व गांव लाभवून सुखरूप रहात ते गोष्ट करणें म्हणून ताकीद दिली.' (श्री. सं. का. प. भाग ९ ले. २)

उद्धव गोसाव्यास प्रार्थना—

श्रीसमर्थशिष्य उद्धव व दिवाकर यांत गैरसमजुतीमुळें वितुष्ट येऊन उद्धव गोसावी नाशकास जाऊन उपवास करीत राहिले. तेव्हां शंकराजीपंतांनीं त्यांना प्रार्थनापूर्वक त्यांचे शिष्य चिंतामणी गोसावी याबरोबर पत्र व निरोप सांगितला कीं, "सज्जनगड श्रीचें स्थळ आहे येथे येऊन श्री स्वामीच्या पादुकांचें दर्शण घेऊन पारणे करावे जे आभिष्ट असेल ते श्री दयेनें सिधीस पावतां उशीर काये आहे" (स. सा. का. प. ले. ५२८ टाकळी मठ पृ. १०९-११०).

महाबळेश्वराचें हनुमानाचें ताट कांहीं कारणांनीं मोडण्याचा प्रश्न उद्भवला, तेव्हां दिवाकर गोसावी यांनीं मुद्दाम राघो शंकर

नांवाचा मनुष्य शंकराजीपंताकडे पाठविला आणि कळविलें कीं, ' श्री चे ताट मोडावयाचें नाहीं वस्तेची वस्त सिध करावी लागत आहे. त्याचें द्रव्य पाठविलें पाहिजे. " या पत्राप्रमाणें पंतांनीं ताटाचें एकूण वजन शेर ८८ आठ याची किंमत दर शेरास पंचवीस रुपयांप्रमाणें मंजूर केलें व त्याचा हिशेब कळविला.

श्रीखंडेराव जेजुरी—

मौ. कोराले बु।। या गावीं श्रीकडे कांहीं इनाम जमीन छ. शिवाजीमहाराजांपासून चालत आलेली होती. ती जमीन तशीच पुढें चालविणेबद्दल सचिवानें ताकिदपत्र दिलें; व त्याचा उल्लेख रामचंद्र नीलकंठ प्र।। सुप्याचे सुभेदारास लिहिले पत्रांत करितात.

श्रीदेव चिंचवड—

चिंचवड देव संस्थान मराठ्यांनीं दिलेल्या देणग्यांवरच वाढीस लागलें. याला छत्रपति व त्यांचे सरदार यांनीं इनामें दिलीं आहेत. त्याप्रमाणें मौ. माण, कर्यात मावळ, हा गांव शंकराजी नारायणाकडून इनाम मिळालेला दिसतो. यदाकदाचित् मूळ देणें छत्रपतिंचें व मावळचें अधिकारी सचिव म्हणून त्यांनीं दिलेली भोगवटा सनद ही असेल. प्रांत मावळें त।। लोहगड येथील सुभेदार काकाजी नारायण यांस शंकराजी नारायण सदर गांवासंबंधी लिहितात,

' श्रीदेव वास्तव्य चिंचवड यांचे आशीर्वादे महाराज राजश्री छत्रपति स्वामींची राज्याभिवृद्धी जाहली हे देवाब्राह्मणांच्या आशीर्वादाचें राज्य याकरितां मौ. माण तर्फ कर्यात मावळ हा गांव कुलबाब कुल कानु खेरीज हक्कदार व इनामदार इनाम दिल्हा ' (श. १६१५ फा. शु. ३)

रामचंद्र नीळकंठ हे बाळाजी विश्वनाथ सरसुभेदार प्रांत पुणे यास लिहितात.

श्री वास्तव्य चिंचवड यांस, इनाम मौजे हिंजवडी तर्फ कर्यात मावळ हा गांव दिल्हा आहे. तमाम गुरे मौ. वाकड तर्फ हवेली प्रांत मजकूर या गांवाच्या रानास चरायास जातातो, म्हणून मौजे मजकूरच्या मोकदमास दोरवणीचा तगादा महालीचे कारकून करितात. त्यास राजश्री स्वामींनी यास इनाम मौजे मजकूर दोरवणी (ढोरवणी ?) देखील दिल्हा आहे. रदबदल मना केली असे. तरी तुम्ही एकंदर तगादा न करणें फिरोन बोभाटा येऊं न देणें छ. २१ जिल्हेज. निर्देश समक्ष- (श. १६२१ ज्ये. व. ८) [पेशवे द. स. प. माहीती ले. १ प्रकरण २ पृ. १२२].

मौ. आंबवडे येथील श्री नागनाथ—

शंकराजी नारायणानें ज्या श्रीनागनाथसंनिध दिगंत कीत मिळवून नश्वर देह विसर्जन करून परमार्थाचें साधन केलें त्याच्या पूजा-अर्चेची पूर्वापर व्यवस्था होती. मावळावर शंकराजीपंतांची सत्ता प्रस्थापित होतांच, त्यांनीं त्या व्यवस्थेला उजळा दिला. माहादाजी सामराज ता।। मावण, यानें विनंती केली कीं, 'मौ. आंबवडे येथे देव श्री नागेश आहे. याचा पूर्वीपासून नजिक गूल सेत मोईन आहे व सेत बा।। इनाम टक्के ३ आहे. हे चालविणें यावर अनाजी आपदेव, सर सुभेदार, मा।हास प्र।। पुणें म्हणतात, 'यैसियास गोसावी याचें सुभेमध्यें श्री देव आहे तरी सालाबाद कारकीर्दी दर कारकीर्द चालत आले आहे त्या प्रमाणें चालविलें पाहिजें. येणेकरून गोसावी याचेहि बरवे आहे तरी हे गोष्टीस अनमान सहसा केला न पाहिजें देव कृत्य आहे.' [शि.

च. सा. खं. २ ले. २२४] [श. १६१२ आषाढ व. ११—
इ. १६९० जुलै २३]

म्हाळोबा गोसावी, वास्तव्य मौ. जेजुरी—

श्रीक्षेत्र जेजुरी येथील श्रीखंडेरायाची जशी व्यवस्था लाविली त्याप्रमाणें गडावर वास्तव्य करून असणाऱ्या श्रीच्या सेवेकऱ्यांचाहि परामर्ष घेतला. शंकराजी नारायण सचिव गंगाजी नारायण सुमेदार व कारकून वर्तमान व भावी सुभा प्रा। पुणे यास लिहितात, ' रा. म्हाळोबा गोसावी वास्तव्य मौ. जेजुरी यासी वरसासन गला महाल मापे खंडी १ येक पूर्वीपासून राजश्री स्वामीपासून भोगवटा चालत आला आहे. ' ' साल दरसाल वउंश परंपरा चालत आलें आहे. तेणेप्रमाणें चालवित जाणे. नूतन पत्राचा आक्षेप न घेणें ' इ. १६९३ फेब्रु ३ (पे. द. भा. ३१ ले. ५४).

दासोबा गोसावी क।। आंबे जोगाई—

मराठयांचें लष्कर मोंगलांच्या मुलुखावर, पेचावर तोड, म्हणून वारंवार स्वाऱ्या करीत असे. लष्करच तें त्याला सुमार कसा असणार? त्यामुळें मोंगलाईतील देवाब्राह्मणाला त्याकडून कधी कधी पीडा होत असे. श. १६१४ त सचिवाची फौज क।। जोगाईच्या अंब्यापर्यंत गेली व त्याजकडून तेथील सुप्रसिद्ध गीतार्णवाचे कर्ते दासोपंत गोसावी यांजकडे चालत असलेल्या मौ. कानडी प।। आंबेजोगई या गांवास आजार पोहोंचू लागला. तेव्हां श. १६१४ अ. भाद्र. व. ११चे पत्र मोकदमानी व रयाती मौ. कानडी प।। आंबे जोगाई यास पत्र पाठवून इनामाचा बंदोबस्त केला. सदर पत्रांत सचिव म्हणतात, ' मौ. मजकुरी वेदमूर्ति राजश्री दासोबा

गोसावी वास्तव्य क।। आंबे यास इनामगाव पुरातन चालिला आहे. तेणेप्रमाणें हाली राजश्री छत्रपति स्वामीने गोसावी यासी चालविला आहे. येविशी आलाहिदा पत्रे मौजे मजकुरास सादर आहेत. तेणेप्रमाणें चालविणें जो खंडणीचा आकार होईल तो याकडे वसूल देवऊन सुखरूप राहात जाणे कोणेविशी चिंता न करणे मौ. मजकुरास लष्करचा उपद्रव लागतो म्हणून त्यालाही आलाहिदा आज्ञापत्रे असेती त्यावरून ते उपद्रव देणार नाहीं अभय असे ' (शि. च. सा. ख. ५ ले. ८०१).

चाकण ब्रम्हे:—

वे. कृष्णभट बिन केशवभट ब्रह्मे, वास्तव्य कसबे चाकण, याकडे कसबे चाकण व को इंदोरी येथें इनाम चालत होता. या बाबतींत सचिव दामाजी नारायण सुभेदार प्र।। जुनर यास इनाम चालविणेबद्दल लिहितात. श. १६१४ मार्ग. शु. १४ (म. इ. सा. खं. १५ ले ४४७. (इ. १६९४ फेब्रु १७) [स. प. मा. पृ. १७३]

निंब येथील 'सदानंद' समाधि—

क।। निंब प्र।। वाई येथें सत्पुरुष सदानंद गोसावी याची समाधी आहे. त्या समाधीकडे पूर्वापार मौ.इडमिडे स।। हवेली (वाई) हा गांव चालत होता. त्या गांवास मराठयांचे लष्कराकडून उपद्रव होत असे. त्याकरितां सचिवानें आपले सरदारांचे लष्करास त्यास उपद्रव न देणेबद्दल ताकिदपत्र दिलें. श. १६१९ भाद्र. व. ७. यानंतर लवकरच हा भाग संपूर्ण मराठयांचे सत्तेखाली आल्यावर अमात्य व सचिव यांनीं मठपति रा।। भवानगीर गोसावी यास इनाम दिला. श. १६१९ कार्ति. व. ७ यावर छत्रपतीच्या हुकुमावरून ' मौ. मारी सरदेशमुखी व देशमुखी व सरदेशकुलकर्ण

व बाजेवतन एकंदर गोसावी याचे गांवी वसूल न घ्यावा ' म्हणून अनाजी जनार्दन देशाधिकारी व देशलेखक, प्रांत वाई, यास कळविलें. तसेंच श. १६१८ श्रा. शु॥ १४ च्या राजपत्रांत परशराम त्र्यंबक यांच्या लष्करापासून सदर गांवास त्रास पोहोंचत होता, त्याबद्दल त्यास सांगणेबद्दल छत्रपति सचिवास आज्ञा करितात (म. इ. सा. खं. १५ ले. १६१).

कऱ्हाडचे ब्राह्मणास सैदापूर ऊर्फ शिवापूर अग्रहार—

मौ. सैदापूर याचे शिवापूर नांव ठेवून तो गांव कऱ्हाड क्षेत्रींचे ब्राह्मणास रामचंद्रपंत अमात्यांनीं अग्रहार करून दिला. (श. १६१९). त्याबद्दल आपले मान्यतेचें पत्र सचिवानें प॥ कऱ्हाडचा देशाधिकारी मल्हारजी सोनदेऊ यास दिलें (श. १६२१ ज्येष्ठ शु. १) [शि. का. घ. कऱ्हाड गिजेर ले. ७५].

परिशिष्ट (आ)

कोंकणांतील ब्राह्मण राजकारणांत ओढले

महाराष्ट्राच्या इतिहासांत मुसलमानपूर्व काली, मुसलमान–काली व शिवशाहींत जे ब्राह्मण राजकारणांत चमकले त्यांत कोंकणातील चित्तपावन ब्राह्मण आढळत नाहींत. अल्पसंतुष्ट वृत्तीचे हे ब्राह्मण शेतीवर गुजराणा करून जाज्वल्य ब्राह्मणी धर्म आचरून जागा धरून राहिले. कोण आला व कोण गेला ह्याची त्यांनीं कधींच

पर्वा केली नाहीं. परंतु संभाजीच्या मृत्यूनंतर महाराष्ट्र यवनाक्रांत झाला व कोंकणांत दबा धरून बसलेला सिद्दी वळवळ करूं लागला. त्यानें आपल्या परधर्मीय प्रजेवर उघड हत्यार उपसलें. तेव्हां कोंकणांतील चित्तपावनादिं ब्राह्मणसमाज खडबडून जागा झाला व त्याला राजकारणांत उडी घेण्याची आवश्यकता वाटूं लागली. इकडे मराठयांना राजकारणाचें क्षेत्र जसजसें वाढत चाललें तसतशी राजकारणी पुरुषांची उत्तरोत्तर वाण भासूं लागली; आणि त्यांनीं येईल त्या कर्त्या पुरुषांचा गौरवपूर्ण संग्रह करण्यास सुरुवात केली. तशांत कोंकणांतील प्रदेशांत सचिवाचा अंमल चालू असल्यानें त्यांनीं तेथील उदयोन्मुख राजकारणी ब्राह्मण हाताशीं धरून त्यांना महत्पदास चढविलें.

बाळाजी विश्वनाथ भट, पंताजी शिवदेव सोमण, महादाजी कृष्ण जोशी हे सचिवाच्या पदरचे असून त्यांची स्वातंत्र्ययुद्धांतील कामगिरी वाखाणण्याजोगी आहे. पंताजी शिवदेव हा शंकराजी नारायणाचा प्रमुख साहाय्यकर्ता असून त्यांनीं मावळांतील गडकोट घेतांना जिवाची पर्वा न करितां शिपाईगिरीची शर्थ केली. शाहू महाराजांचे कारकिर्दींत हा 'राजाज्ञा' झाला व त्यानें शंकराजी नारायणाचे पश्चात् त्याच्या अल्पवयी मुलाचा उत्कृष्ट कारभार चालवून धन्य म्हणून घेतलें.बाळाजी विश्वनाथ, पहिला पुणें प्रांताचा सुभेदार म्हणून चमकला.त्यावर तो सरसुभेदार झाला व श. १६२२ (इ. १७००) त तो नामजाद सभासद झाला. तिसरा महादाजी कृष्ण जोशी चासकर जोशाचा पूर्वज. श. १६१४ (इ. १६९२) सालीं छे. राजाराम महाराज चंदीचे वेढ्यांत अडकले असतां त्यांस सोडविणेकरितां महाराष्ट्रांतून रामचंद्रपंत अमात्य यांनीं संताजी घोरपडे

सेनापति आणि शंकराजीपंत सचिवानें धनाजी जाधव सरलष्कर यांना त्याचे मदतीस पाठविलें. त्याबरोबर ‘ शंकराजी पंडित सचिव याणी चंदीस वेढा पडिला होता त्या समई फौजा देऊन ’ महादाजी कृष्ण जोशी यांस पाठविलें. त्यांनीं तेथें ‘ कष्टमशागत बहुत केली याकरितां चंदीचे मुकामी मौ. खवली तर्फ मजकूर हा गांव पुत्र पौत्रादि जलतरुपाषाणासहित इनाम दिल्हा.’ हा एक-दमच या वेळीं पुढें आला नसून त्याचा राजकारणाशीं संबंध छ. शिवाजी महाराजांपासून आहे. ‘महादाजी कृष्ण व गोविंद कृष्ण हे स्वामीचें पुरातन सेवक तीर्थरूप राजश्री थोरले कै. स्वामीपासून बहुत निष्ठेनें सेवा केली. व राजश्री संभाजी राजे काका याची सेवा केली. याउपरी तीर्थरूप राजश्री कै. स्वामी (राजाराम) चजीस असतां ताम्राचें संकट प्राप्त जाहलें ते समयीं महादाजी कृष्ण. हे संताजी व धनाजीरावासमवेत फौजा घेऊन गेले. ते समयीं विशेषात्कारे सेवा केली. याकरितां यावरी राजश्री कै. स्वामी कृपाळू होऊन चंजीचे मुकामी यासी मौ खवली ता॥ परळी प्रं॥ मजकूर हा गांव इनाम देऊन सनदा दिल्ह्या’.

ज्या कामगिरीकरितां गांव इनाम मिळतो ती कामगिरी विशेषच असली पाहिजे. हें सांगणें नको.

परिशिष्ट (इ)

रोहिडखोऱ्यांचें देशपांडेपण

साहोत्रा, दाहोत्रा व खटाव परगण्याची देशमुखी हीं वतनें छ. राजारामानें शंकराजी नारायणांस दिली हें आपण मागें पाहिलेंच आहे. या वतनांखेरीज रोहिड खोऱ्याचें देशपांडपणाचें वतन यानें संपादन केलें. या संपादण्याचा काळ नक्की नाहीं. पण तो स्थूल-

मानानें ठरवितां येतो; त्यावरून हें वतन छ. दु. शिवाजीच्या वेळेस प्राप्त झालें. पण त्या संबंधीची खटपट राजाराम चंदीस असल्यापासूनच चालली असावी असें वाटतें. या वतनाचे मागें इतिहास आहे. तो असा.

चां. से. का. प्रभू समाजांतील कित्येक घराणीं मुसलमानी अमलाच्या अगदीं आरंभीं उत्तर कोंकणांतून सह्याद्री ओलांडून लगतच्या मावळांत उतरलीं व त्यांनीं त्या भागांत कुलकर्णें व देशकुलकर्णें हस्तगत केलीं. हा समाज लेखकवृत्तीवर आज कित्येक शतकें महाराष्ट्रांतील कोंकण विभागांत आपला चरितार्थ चालवीत आहे, हें इतिहासज्ञास तरी नव्यानें सांगण्यास नको. कोंकणांतील गुप्ते-उपनामक एका गृहस्थानें रोहिड खोऱ्याचें देशपांडपण ब्राह्मणी राज्यांत संपादन केलें व तें त्या घराण्यांत कित्येक पिढ्या चालल्यानंतर नरस प्रभू निपुत्रिक असल्यानें, तत्कालीन रिवाजाप्रमाणें हें सरकारजमा झालें; आणि तें त्या खोऱ्याचे देशमुख जेधे हे गुमास्ता ठेवून चालवूं लागले. गुमास्त्याचे मार्फत एक दोन पिढ्या तरी जेध्यांनीं या वतनाची सेवा घेतली असावी. नरस प्रभूचा आपण दत्तक पुत्र आहोंत, तेंव्हां सदर वतन आपलेकडे चालावे, म्हणून दादाजी नरस प्रभू यानें जेध्यानें नेमलेल्या गुमास्त्याविरुद्ध दिवाणांत फिर्याद गुदरली, यांत दादाजी खोटा झालेला दिसतो कारण, दादाजी व त्याचा मुलगा कृष्णाजी हे हयात असतांनाहि गुमास्ताच वतनांची सेवा करीत आहे. पुढें हें खालीं असलेलें देशपांडपण सर्जाराव जेध्यांनी शंकराजी नारायणास शके १६२७ च्या सुमारास करून दिलें.

राजवाडे खंड १५ त गुप्ते देशपांड्यांचे कित्येक कागद छापले आहेत. त्यांतील बरेचसें चिकित्सेच्या कसोटीस उतरत नसल्यानें,

ते विश्वसनीय मानतां येत नाहींत. त्यांतील कांहीं शुद्ध बनावट असून कांहीं कैफियतवजा एकतर्फी आहेत. या दोन्ही प्रकारच्या कागदापत्रांतून हें वतन शंकराजी नारायणानें सत्तेच्या बळानें प्रभूवर अन्याय करून संपादिलें व तो अन्याय, शाहूची सत्ता दृढमूल झाल्यावर, योग्य प्रायश्चित्त दिल्यावांचून राहणार नाहीं असें पाहून त्यानें आत्महत्या केली, असा सूर निघत आहे. हा सूर, ज्यांना ऐतिहासिक कागदपत्रांतहि खरे-खोटेपणा असतो व तो तपासूनच त्यांतून सार काढावयाचें असतें हें माहीत नाहीं, अशा विद्यमान इतिहासकारांनीं कायम ठेविला आहे. पण, सचिवानें हें वतन रास्त मार्गानें, जसें संपादन करावयास पाहिजे, तसेंच संपादलें अशी पुराव्याची योग्य छाननी केल्यानंतर आम्ही म्हणत आहोंत. तसेंच, या वतनाकरितां शंकराजी पंडितानें आत्महत्या केली असें म्हणणारे म्हणत असले, तरी इतिहासकारानें तेंच गृहीत धरून चालणें म्हणजे आपल्या कोत्या ज्ञानाचें प्रदर्शन करणेंच होय. एवंच शंकराजी नारायणाच्या वीरोचित देहपातावर जे निष्कारण सिंतोडे उडविले जातात, ते कसे निरर्थक आहेत हें दाखविण्याकरितांच येथें याचा विचार करावा लागला.

परिशिष्ट ५ (ई)

परिवार

शंकराजी नारायणांना दोन बायका व तीन मुलगे होते असें विद्यमान कागदपत्रावरून दिसतें; पैकीं, वडील स्त्री येसुबाई व धाकटी भिकूबाई. जनार्दन शंकर, महादाजी शंकर व नारो शंकर हे त्रिवर्ग चिरंजीव; यांच्या मुलींची नोंद कोठेंच नाहीं. यावरून,

त्या नसतील असें मात्र म्हणतां येणार नाहीं. वडील स्त्री येसूबाई ही शामभट महाशब्दे यांची मुलगी, हें निश्चित दिसतें. कारण, सचिवाच्या मुतालीक त्र्यंबक शिवदेव यास अस्सल पत्रांत नारो शंकरचे मामा म्हटलें आहे. महाशब्द्यांचे वंशावळीवरून पाहतां त्र्यंबक शिवदेव हा या घराण्यांतील आहे, यांत शंका नाहीं. 'शामभट' व 'शिवदेव' एकच.

ज्याला साहोत्रा वतन छ. राजाराम-महाराजांनीं प्रथम वतनी करून दिलें, तो शंकराजीपंताचा ज्येष्ठ पुत्र जनार्दन शंकर श. १६२० पर्यंत हयात होता. यानंतर तो थोड्याच दिवसांत वारला असावा, कारण श. १६२१ पासून साहोत्रा खुद्द शंकराजीपंताकडेच आला. या जनार्दन शंकराची मराठशाहीची सेवा आपणापुढें नाहीं. दुसरा पुत्र महादजी शंकर हाही बापाचे हयातींतच राजकारणांत पडलेला दिसतो. मौ. चांबळी गांवच्या उत्पन्नांत वांटेकरी असणारा महादाजी शंकर तो हाच असें मानण्याकडे प्रवृत्ती होते. महादाजी शंकर याला शंकराजीपंताचा दत्तक पुत्र म्हटलें आहे. पण, भा. इ. सं. मंडळांच्या त्रै. मा. त सचिवाच्या नाशिकच्या उपाध्यायाची आलेली नोंद व पुढें नारो शंकर व महादाजी शंकर यांत 'खाजगी'चें झालेलें वाटप पहातां, महादाजी शंकर हाही औरसच पुत्र असावा असें वाटूं लागलें. धर्मशास्त्राप्रमाणें दत्तक घेतल्यानंतर औरस पुत्र झाल्यास तो मुख्य वारसदार होतो; व दत्तक हा $\frac{1}{6}$ लाच भागीदार ठरतो. पण, राजवाडे खं. १५ मधील ले. हे जर बनावट नसतील, तर 'खाजगी'त आणि तोहि वतनांत नारो शंकरच्या बरोबरीनें महादाजी शंकरास वांटा मिळाला आहे. पण महादाजी शंकर वडील असतां 'दौलत' धाकट्या व अल्प-

वयी नारो शंकरास वडिलाच्या पश्चात् छ. शाहू महाराज करून देतात, याची संगती कशी लावावी? पण, या बाबतींत असा एक तर्क करण्यास जागा आहे कीं, नारो शंकर वडील स्त्रीचा पुत्र म्हणून तो 'दौलतीचा' मालक केला गेला असावा. एवंच महादाजी शंकर हा दत्तक की औरस याचा नक्की निर्णय देण्यास जादा संशोधनाची आवश्यकता आहे. तिसरे चिरंजीव नारो शंकर हे वडिलांनीं समाधी घेतली, तेव्हां केवळ दोन वर्षांचे होते. पण शंकराजी पंताची स्वराज्यसेवा विचारांत घेऊन छ. शाहू महाराजांनीं सचिवपद रा. श. ३३ मध्यें नारो शंकर यास दिलें व त्याचा कारभार त्र्यंबक शिवदेव मुतालीक व पंताजी शिवदेव यांजकडे दिला.

व्यक्ति सूची

[नांवापुढील आंकडे पृष्ठांक आहेत.]

स्थल सूची

सचिव घराण्याचा वंशवेल

प्रल्हादपंत

|

मुकुंदपंत

|

नारोपंत

|

१ शंकराजी नारायण--सचिव घराण्याचे आद्यसंस्थापक
चरित्रनायक

|

२ नारोशंकर

३ चिमणाजी नारायण (दत्तक)

|

४ सदाशिव चिमणाजी — ५ रघुनाथ चिमणाजी

|

६ शंकरराव ऊर्फ बाबासाहेब

|

७ चिमाजी ऊर्फ नानासाहेब (दत्तक)

|

८ रघुनाथ ऊर्फ नानासाहेब (दत्तक)

|

९ चिमणाजी ऊर्फ नानासाहेब (दत्तक)

|

१० शंकरराव ऊर्फ रावसाहेब

११ रघुनाथराव ऊर्फ बाबासाहेब — १ गंगूताईसाहेब (प्रथम कुटुंब) श्रीं. विंचूरकर घराणें पुणें.
२ लक्ष्मीबाईसाहेब (द्वितीय कुटुंब) ऊर्फ बाईसाहेब श्री. पुराणिक घराणें पुणें
श्री.सौ.तान्हुबाई

१ काशीताई २ सदाशिवराव ३ भागिरथीबाई जान्हवीबाई*
शरीरसंबंध श्री. बुद्धियाळकर इनामदार बेळगांव
मृत —सौ. सरोजिनीबाई श्री.विंचूरकर घराणें पुणें.
(कन्या)

१ स्नेहलता मृत २ रामनाथ मृत ३ आनंदराव बापूसाहेब ४ नारायणराव रावसाहेब ५ पद्मावती राजे.S
सौ. दुर्गादेवी ऊर्फ वहिनीसाहेब पुंडले घराणें गांव रावेत जि. पुणें.

१ विमलाराजे २ कमलाराजे ३ लीलाराजे ४ रेणुकाराजे मृत ५ श्री. चिमणाजीपंत ऊर्फ आबासाहेब

या चरित्रांत ठिकठिकाणीं सचिव घराण्यांतील पुरुषांच्याबद्दल जो जो उल्लेख आला आहे, त्यावरून होणारा वंशवेल हाच

---

* शरीरसंबंध राजे शामराज राम रायान राजवंत बहादुर (है.द.) मृत.
S शरीरसंबंध श्री. बाळासाहेब पटवर्धन राजे, कुरुंदवाड (सी.)

ग्राह्य मानला पाहिजे असें नाहीं माझ्या समजुतीप्रमाणें व वाचनांत आल्याप्रमाणें तो मजकूर घातलेला आहे. तसेंच निरनिराळ्या ठिकाणीं जरी या घराण्याच्या वंशावळी मिळतात, तरी त्या संशोधनाच्या कसोटीला उतरतीलच असें नाहीं. एकंदरींत वंशवेलीच्या बाबतींत पाहतां एकमत होऊं शकत नाहीं, म्हणून आम्ही या घराण्यांत परंपरेनें चालत आलेली वंशवेल घेतली आहे. भोरचे सध्यांचे अधिपति हिज हायनेस राजा श्रीमंत रघुनाथराव शंकरराव पंडित पंत सचिव, के. सी. आय्. ई. यांचें चरित्रांतील खंड १ मधील, चित्रानुक्रमणिकेनंतर छापली असलेली ती ही वंशवेल होय.

———

शंकराजी नारायण शकावली

श. १५७० (इ. स. १६४८) नारोपंत शं. ना.चे वडील— यास सुधागड किल्ल्याची सबनिशी मिळते.

श. १५९९ (इ. स. १६७७) शं. ना. मोरोपंत पिंगळे पेशवे याजकडे नौकरीस राहतो.

श. १६०४ (इ. स. १६८२) रामचंद्रपंत अमात्याकडेसच नौकरीस राहतो.

श. १६०५ च्या सुमारास यास ‘ राजाज्ञा ’ पद मिळतें.

श. १६११ (इ. स. १६८९) खऱ्या कर्तृत्वास प्रारंभ.

श. १६१२ वैशा. (इ. स. १६९० एप्रि.-मे) सर्जाखानाशीं लढाई, वाईचा कोट घेणें वगैरे उद्योग.

श. १६१२ आश्वि. शु. १० (इ. स. १६९० आक्टो. २) सचिवपदप्राप्ति.

श. १६१२ (इ. स. १६९०) ‘मदार–उल–महाम’ किताब मिळतो.

श. १६१३ (इ. स. १६९१) जिंजीचा वेढा उठविण्या- करितां महाराष्ट्रांतून धनाजी जाधव सर लष्कर यांस पाठवितात.

श. १६१५ (इ. स. १६९३) बहीरजी व संताजी घोरपडे यांची समजूत काढून त्यांस पुनश्च स्वामीकार्यी प्रवृत्त करितात.

श. १६१६–१७ हातचा गेलेला कोरीगड हस्तगत करण्याचा उद्योग.

श. १६२० (इ. स. १६९८) शं. ना. हुजूर जातात व त्यांची मोहिमेची कामगिरी रामचंद्रपंताकडे सांगितली जाते.

श. १६२१ आश्वि. (इ. स. १६९९ स प.) साहोत्रा, कऱ्हाडची देशमुखी वगैरे वतनें मिळतात.

श. १६२१ छ. राजाराम महाराजाचे मृत्यूनंतर शंकराजीपंत पुनश्च मूळ ठिकाणीं येतात व रामचंद्रपंत हुजूर जातात.

श. १६२७ (इ. स. १७०५) रोहीडखोऱ्याचें देशपांडपण जेधे देशमुखापासून घेतात.

श. १६२९ चैत्र ते कार्तिक (इ. स. १७०७ मार्च ते नव्हंबर) अखेर मावळांतील सिंहगड, पुरंदर, राजगड, तोरणा वगैरे बहुतेक मावळांतील किल्ले शं. ना. नें परत घेतले.

श. १६२९ (इ. स. १७०७ आक्टोबरांत) खेड-कडूसचे लढाईनंतर राजा शाहू शं. ना. चे जिल्ह्यांत प्रवेश करितात.

श. १६२९ कार्ति. शु. १२ (इ. स. १७०७ नवं. २७) 'अतूर संन्यास' घेऊन मौ. आंबवडे येथें श्री नागनाथाजवळ देह विसर्जन करितात.

श. १६३० वैशा. (इ. स. १७०७ मे) नारो शंकर यास सचीवपदाची सनद मिळते.
